


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २ सप्टेंबर २०२३


# काँग्रेसचा हिंदूविरोधी 'छुपा अजेंडा' उघड ?

**आधुनिक केसरी**

**राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते व गांधी परिवाराचे पुजारी आचार्य प्रमोद कृष्णम आणि मणिशंकर अय्यर या दोन नेत्यांनी काँग्रेस पक्षाचा हिंदू विरोधी असलेला छुपा अजेंडा उघड केला आहे. या निष्ठावंत नेत्यानी पक्षाला दिलेला 'घराचा आहेर' महाग पडणार आहे. त्यामुळे पक्ष नेत्यांची झोप उडाली आहे. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने हा विषय लावून धरला तर पक्ष संकटात सापडू शकतो, याची भीती वाटू लागली आहे. मग आता या गांधी परिवाराच्या पुजाऱ्यांचे करावयाचे तरी काय ? पक्ष त्यांचेवर कारवाई बडगा उगारणार काय ? अथवा पक्षात लोकशाही म्हणून त्यांचा बचाव करणार!**

स्वातंत्र्यापासून काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष बुरखा घालत असला तर त्यांची भूमिका हिंदू विरोधी राहिलेली आहे. काँग्रेस पक्षात इंदिरा गांधी यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यानंतर त्यांच्या हुकूमशाहीच्या विरोधात पक्षात त्यांचे विरोधात मोठा गट निर्माण झालेला होता. पक्षाचे विभाजन झाले होते.

त्याचप्रमाणे राहुल गांधी यांचेकडे पक्षाचे नेतृत्व आल्यानंतर पक्षाची वाताहात झाली. इतकेच नव्हे, अनेक नेते पक्ष सोडून गेले.या त सुनील जाखड, गुलाब नबीआझाद, कपील सिब्बल, हेमत बिस्वा सरमा, जोतिरादित्य सिंधिया आणि हार्दिक पटेल आदी आहेत. तसेच केंद्रात मोदीचे सरकार आल्यानंतर त्यांच्या विरोधात नेते जसवंतसिंह, संजय जोशी, यशवंत सिन्हा, अरुण शौरी, शत्रूघ्न सिन्हा, कीर्ती आझाद,नवजोत सिंग सिंघू, यांनी भाजपा सोडला. आता तर सुब्रह्मण्यम स्वामी मोदींना लक्ष्य करत आहेत! काँग्रेस कार्यकारी समितीची निवड १९२० प्रथम नागपूर अधिवेशनात करण्यात आली. तेंव्हा विजयराधचार्य हे प्रमुख होते. १९९८ नंतर पक्षाच्या कार्यकारी समितीची निवडणूक घेण्यात आल आलेली नाही. त्यामुळे २०१७ मध्ये निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाला निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. २०१९ मध्ये काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात शिवसेनेशी मैत्री होत असताना





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


संजय निरूपण यांनी पक्षाची कार्यकारी समिती बरखास्त करावी, अशी मागणी श्रीमती सोनिया गांधी यांचेकडे केली होती. आता पक्षाने २०२३ -२०२४ विधानसभा आणि लोकसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेऊन कार्यकारी समितीच्या ३० सदस्याची निवड केली. यातून काँग्रेस पक्षात 'ऑल इज वेल' चालले आहे, असेच दाखविण्याचा प्रयत्न आहे. पक्षातील नाराज नेत्यांनी पक्ष नेतृत्वाला पत्र दिले होते. या पक्षातील नाराज जी.-२३ असे म्हंटले जाते. पण नेतृत्वाने दखल घेतली नाही. यातील नाराज नेते आनंद शर्मा, शशी थरूर, मनीष तिवारी यांना संधी दिली गेली. विशेष म्हणजे, पक्षात गांधी परिवाराची पूजा केली जाते. राष्ट्रीय अध्यक्ष खडगे यांचे त्यांच्या सल्याशिवाय कोणतेही निर्णय घेवू शकत नाहीत. त्यामुळे गांधी परिवारातील सोनिया गांधी, राहूल गांधी, प्रियंका वाड्रा या तिघांना कार्यसमितीत घ्यावे लागले. राजस्थानमध्ये मुख्यमंत्री अशोक गहिलोत,व सचिन पायलट यांचे दोन गट आहेत! पक्ष गहिलोत विरोधात कारवाई करण्यास असमर्थ ठरला. पक्षातील गटबाजी परिणाम होऊ नये, म्हणून पायलट यांना कार्यकारी समितीत घ्यावे लागले, असे दिसतेय! तसेच इतर पक्षातून आलेले तरून नेते अल्का लांबा,कन्हैया कुमार यांच्या सारख्याला मानाचे व महत्वाचे पदावर संधी दिली गेली. यामुळे काँग्रेस पक्षात कुजबुज सुरु झाली आहे.

यावरुन पक्षातील नेते नाराज दिसत आहेत. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाल्नंतर याचे कारणे शोधण्यासाठी ए.के. अन्थोनी समितीची स्थापना केली होती. या समितीने काँग्रेस पक्ष हिंदू विरोधी अधिक घेत असल्याने पक्षाचे पराभवाचे कारण स्पष्ट केले होते. गांधी परिवाराने समितीच्या अहवालाला कचऱ्याची कुंडी दाखविली. काँग्रेस नेते पक्ष धर्ननिरपेक्ष म्हणत सांगत असले तरी पक्षाच्या नीती आणि करणीमध्ये फरक आहे. आज ज्येष्ठ नेते अन्थोनी यांचा मुलगा अनिल अन्थोनी हा भाजपात गेला आहे!पक्षाचे राष्ट्रीय नेते राहूल गांधी यांना अमेठी मतदार संघातून पराभूत होणार दिसतात त्यांनी केरळच्या वायनाड या मुस्लिम बहूल मतदार संघ निवडाला लागला. आज तर गांधी परिवारासाठी वरदान असलेले अमेठी व रायबेरली लोकसभा मतदार संघ सुरक्षित वाटत नाहीत. स्वातंत्र्यापासून काँग्रेसची नीती हिंदू व्देषी भूमिका राहिली आहे! धर्माच्या नावावर देशाची विभागणी करणे, हिंदू कोड बील,जम्मू काश्मीर- साठी स्वंतत्र घटना, मुस्लिम हितासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणे, देश विरोधी अतिरेकी कारवायाला समर्थन देणे, तसेच राम मंदिर उभारणीला विरोध करणे हिंदु समाजाला अतिरेकी व मुस्लिम ब्रदरहूड तुलना करणे. हिंदू व हिंदुत्व शब्दाचा गैरसमज पसविणे, तीन तलाक, नागरिकता संशोधन कायदा,पक्षाने मुस्लिम विरोधी म्हणून अपप्रचार केला.या पक्षाला मुस्लिम बांधवाची मुळीच चिंता नाही,त्यांना व्होट बँकेची आहे! काँग्रेसने मुस्लिम समाजाला कधीच राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न कधी केलेला नाही. पण मोदी सरकार आल्यानंतर 'सबका साथ सबका विकास, सबका प्रयास' हे धोरण राबविण्याची घोषणा केली. आज शासकीय पातळीवर धर्माबाबत भेदभाव केला जात नाही.भाजपा राज्यातील एकादा घटनेला धार्मिक रंग देवून हा पक्ष मुस्लिम व दलित विरोधी आहे, असा अपप्रचार केला जातोय! पण काँग्रेसशासित राज्यात मात्र अश्या घटना घडतात त्यावर मौन पाळतात!तसेच भारतात मुस्लिम समाज सुरक्षित नाही, असा गैरसमज पसरविला जातोय!! खर तर!जगात भारत एकमेव राष्ट्र आहे,की देशात सर्व धर्माचे लोक राहतात! सुखाने राहतात! ते सुरक्षित आहेत! हे सामान्य मुस्लिम बांधव मान्य करतो. पण काँग्रेस पक्षाच्या हिंदू विरोधी अजेंडा प्रकाश टाकला आहे. गांधी परिवारावर निष्ठा असलेले व ज्येष्ठ प्रवक्ते आचार्य प्रमोद कृष्णन यांनी पक्षात चालेल्या देश व हिंदू विरोधी भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. राजकारणात असत्य बोलले पाहिजे काय? पक्षात सत्य बोलण्याची ताकद असली पाहिजे. ते म्हणाले, काँग्रेस पक्ष हा त्याग, बलिदानातून उभारला गेला. पण पक्षाची विटंबना अशी की,या पक्षात आता देश विरोधी व हिंदू विरोधी लोकांनी पक्षात घुसखोरी केली आहे. यांचे पक्षाचे विचारसरणीशी देणे- घेणे नाही. त्यांनी पक्षावर कब्जा केला आहे! या नेत्यांना हिंदू व भगवा,भारत माता,व वंदेमातरम या शब्दाचा तिरस्कार आहे! भारत मातेच्या तुकडे करण्याची भाषा करणारे पक्षाचे मोठे नेते म्हणून 'भारत जोडो' यात्रेत सहभागी होतात, हे दुर्देव आहे. पण अश्याच नेत्यांना पक्षाच्या महत्वाच्या पदावर बसविले जात आहे. त्यामुळे आज काँग्रेसला 'देशद्रोही' आरोपाचा मुकाबला करावा लागत आहे. हे शहरी नक्षलवाद विचारांने प्रभावित असलेले नेते पक्षाला डाव्या विचार- सरणीच्या मार्गाने पक्षाला नेण्याचा प्रयत्न करत आहेत. विरोधी पक्षातील नेते काँग्रेस नेतृत्वावर शिव्या घालतात,टीका करतात! तेच आता काँग्रेस पक्षामैत्रीचे नाटक करत आहेत! काँग्रेसला मोदी नेतृत्वाचा पराभव करावयाचा असेल, तर या बाबीचा विचार करावाच लागेल, असा सल्ला आचार्यांनी दिला. पक्षात त्यांच्या वेषभूषा व गंध लावण्यावर टिप्पणी केली जात आहेत.आचार्याचे हे 'कडवे बोल असले ते सत्य आहे, त्यांनी सांगण्याचे धाडस केले आहे. दुसरे गांधी परिवाराची पूजा करणारे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी केलेल्या विधानाची चर्चा सुरु आहे. अय्यर हे परराष्ट्र विभागात नोकरीस होते. १९८९ मध्ये त्यांनी नोकरी सोडून काँग्रेस विचारधारेशी जोडले गेले. ते गांधी परिवाराचे निष्ठावंत नेते ओळखले जातात! पण त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे पक्ष अनेकवेळा अडचणीत आला, त्यांनी मोदीविषयी ''नीच' शब्दाचा प्रयोग केला होता. तसेच चहा विकणारा देशाचा पंतप्रधान होवू शकत नाही, असे विधान केले होते. त्यामुळे ऐन निवडणुकीत काँग्रेस बँक फूटवर गेला. त्यामुळे काँग्रेसने त्यांना पक्षातून निलंबित केले होते. इतकेच नव्हे! त्यांचे पाकिस्तानविषयी प्रेम दिसून येते. त्यांनी पाकमध्ये मुलाखतीत मोदींना पराभूत करण्यासाठी पाककडे याचना केली होती. राष्ट्रप्रेमी माणूस हे सहन करणार नाही. अय्यर यांच्या वाचाळपणामुळे गांधी परिवाराने त्यांना आडगळीत टाकलेले होते. अय्यर यांचे २१ऑगस्ट २३ रोजी आत्मकथा असलेले 'मेमोयर्स ऑफ ए मेवरिक ':( १९४१- १९९१ पुस्तक) प्रकाशित झाले. यावेळी श्रीमती सोनिया गांधी यांचे सोबत ज्यांची वादग्रस्त पुस्तके आहेत, ते हमीद अन्सारी व सलमान खुर्शीद यांचेसह अनेक नेत्यासमोर अय्यर यांनी भूमिका मांडली. त्यामुळे काँग्रेस पक्षासह विरोधी पक्षात चर्चा सुरु झाली. भारतात भाजपाचे पहिले पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी नसून काँग्रेसचे पी. व्ही. नरसिंह राव भाजपाचे होते! कारण ते लालकृष्ण अडवाणीचे ऐकत असत! कारण त्यांनी काँग्रेसच्या 'धर्मनिरपेक्ष' तत्वाला छेद दिला. त्यांनी काँग्रेस पक्षाच्या दिवंगत पंतप्रधानवर टीका केली. त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे गांधी परिवार खूष झाला असावा ! कारण गांधी परिवाराने काँग्रेसचे पंतप्रधान म्हणून नरसिंहराव यांची कधी सन्मान केला नाही! मृत्यूनंतरही त्यांचा अवमान करण्यात केला. तत्कालिन पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी अयोध्यातील राम मंदिराचे कुलूप उघडले,त्यांनी मोठी चुक केली! असे म्हणाले आहेत. मोदी सरकारची पाकिस्तान नीतीबद्दल त्यांनी टीका केली. पाक हे शत्रू राष्ट्र नाही, पाकची जनता भारताला शत्रू मानत नाही. मोदी सरकारला शेजारी राष्ट्राशी कसे संबंध ठेवले पाहिजे,हेच माहित नाही. तेंव्हा भारताला विश्व गुरू मानणे हेच हस्यास्पद आहे,असे ते म्हणाले.ते केंब्रीज विद्यापीठ हे स्वतः चे घरासारखे वाटते! शिक्षण व कायदे तज्ज्ञ ब्रिटीश 'मैकाले'चा मुलगा मानतात! गांधी परिवार नीती 'युज ॲन्ड थ्रू' नीती आहे.पक्षाने अय्यर यांना सात वर्षापासून पक्षाच्या बाहेर ठेवले आहे. पण मी चांगली फलंदाज करत आलो. आजही फटकेबाजी करू शकतो. पण मला मैदानाबाहेर ठेवले गेले.आजही मी फलंदाजी तयार आहे! असा इशारा त्यांनी पक्षाला दिला. अय्यर हे गांधी परिवाराचे ज्येष्ठ नेते असले तरी ते वाचळवीर आहेत! त्यामुळे काँग्रेस पक्षाला त्यांची गरज नाही. त्यांची पाकधार्जिणे आणि हिंदू व्देषाची मानसिकता आहे!त्यावर'हसावे का रडावे? हेच काँग्रेसला समजत नाही!काँग्रेसचे चीन आणि कम्युनिस्ट पक्षाचे छूपे प्रेम आहे. अय्यर हे भारत व चीन युध्दाच्या वेळी लंडनमध्ये शिकावयास होते. तेंव्हा ते कम्युनिस्ट विद्यार्थी संघटनेते नेते होते. त्यांनी चीन सैनिकांच्या मदतीसाठी पैसे गोळा केले होते! याचा स्पष्ट उल्लेख भाजपाचे ज्येष्ठ नेते माधव भंडारी यांच्या 'डाव्यांचा खरा चेहरा' पुस्तकात आहे. काँग्रेस नेते राहूल गांधी परिवार भारत - चीन सीमा प्रश्नावरुन मोदी सरकारला लक्ष्य करत! चीनने भारतीय जमिनीवर कब्जा केला आहे, असे ओरडत असतात. त्यांचा देशातील सरकारवर, सैन्यावर विश्वास नाही, असे दिसेतय! ते भारताची बदनामी करत आहेत. यासाठी त्यांना चीनकडून आर्थिक मदत मिळते आहे. खर तर पं. नेहरू यांच्या कार्यकाळात चीनचे तर भारतीय ४३ हजार चौ. कि. जमिनीवर कब्जा व पाक व्याप्त काश्मीरचा प्रश्न निर्माण केला.त्यावर पक्ष बोलणार नाही! काँग्रेस आणि चीन कन्युनिस्ट पक्षात २००८ मध्ये गुप्र समझौता (एमओयु) केला होता. याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. तसेच गांधी २०१७ चीनचे राजदूत लुओ झाओहूई यांना गुप्तपणे भेटले होते. स्व. राजीव गांधी प्रतिष्ठानसाठी चीनकडून पैसा घेतला जातोय! त्यावर गांधी परिवाराची दातखिळी बसते! या गांधी परिवाराचे ना राष्ट्रावर प्रेम, ना! भारतीय घटनेवर ना! लोकशाहीवर विश्वास आहे! देशात काँग्रेस पक्ष आजपर्यंत तुष्टीकरण व हिंदू व्देषी राजकारण सत्ता मिळत आलेला आहे.या पक्षाचे धर्मनिरपेक्षचे गुपीत पक्षाच्या दोन निष्ठावत नेत्यांनी उघड केले आहे. पक्षाचा खरा चेहरा समोर आला आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

शिवाय आपल्या गगनयान या मोहिमेसाठी पण याचा उपयोग होणार आहे. या मोहिमेत अंतराळवीरांना अवकाशात पाठवणे, त्यांना प्रशिक्षण देणे यासाठी ही चंद्रमोहीम खूप उपयोगाची ठरणार आहे. एवढ्यात काहीतरी विचारण्यासाठी पिंकीने हात वर केला. ती म्हणाली, ' सर, या मोहिमेतील लँडरला ' विक्रम ' हे नाव देण्यामागे काही खास कारण आहे का ? '


' बरोबर, अगदी महत्वाचा प्रश्न विचारलास, ' डॉ राव म्हणाले. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ विक्रम साराभाई यांना भारताच्या अवकाश कार्यक्रमाचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांचे योगदान आणि कामगिरी प्रचंड आहे. त्यांच्या स्मरणार्थ या लँडरला त्यांचे ' विक्रम ' हे नाव देण्यात आले आहे. आणि या ' विक्रम ' ने आपले सगळे टप्पे यशस्वीपणे पार करून चांद्रभूमीवर यशस्वीपणे नियोजितपणे सॉफ्ट लँडिंग केले. हाही एक विक्रमच आहे. त्यामुळे या यानाचे ' विक्रम ' हे नाव अगदी सार्थ ठरले. या लँडरचे बहुतेक सगळे भाग विविध भारतीय कंपन्यांनी आणि तंत्रज्ञांनी बनवले आहेत. त्यामुळे हा लॅण्डर म्हणजे भारताचे स्वरूपच आहे असे म्हणायला हरकत नाही. या मोहिमेत भारतभरातील शास्त्रज्ञांचा सहभाग आहे. त्यामुळे हा एक नवा भारत आहे.

' श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. ' सर, या मोहिमेत कोणत्या प्रमुख शास्त्रज्ञांचा सहभाग होता ?' एका विद्यार्थ्याने डॉ राव यांना विचारले.

' उत्तम प्रश्न. डॉ राव म्हणाले. त्यांची नावं तर मी सांगणारच आहे पण या प्रसंगी मला डॉ विक्रम साराभाई यांच्यासोबतच डॉ होमी भाभा, सतीश धवन, डॉ ए पी जे अब्दुल कलाम, के सिवन इ. मान्यवरांची सुद्धा तीव्रतेने आठवण होते आहे. आपण सर्वांनी प्रक्षेपण पाहताना पाहिलंच असेल की त्यावेळी एस सोमनाथ यांच्या नावाचा वारंवार उल्लेख होत होता. ते सध्या इस्त्रोचे प्रमुख आहेत. शिवाय डॉ एस उन्नीकृष्णन अय्यर, डॉ. पी वीरमुथुवेल, एस शंकरन, एस मोहनकुमार, ए राजराजन, कल्पना कालहस्ती यांचाही प्रमुख वैज्ञानिकांत समावेश आहे.प्राचीन भारतीय ऋषीमुनींनी विश्वाचा वेध आपल्या अंतर्दृष्टीने घेतला. त्यातून विश्वहिताचे पाठ देणारी उपनिषदे प्रकटली. आज आपले भारतीय वैज्ञानिक आपल्या अजोड कामगिरीने याच विश्वाचा आधुनिक विज्ञानाच्या नजरेतून वेध घेत आहेत. भारतातील प्राचीन ज्ञानसृष्टी आणि अर्वाचीन विज्ञानसृष्टी यांचा सुरेख मेळ भारताला आणि जगाला निश्चितपणे प्रगतीपथावर नेईल.



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

## मी कोण आहे; या पेक्षा मी कसा आहे हे महत्वाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते, माझ्यासारखे कोणी काही करूच शकले नव्हते, माझ्याकडे एवढा पैसा होता, मी सर्वांत अधिक व्यवसाय केला होता वगैरे वगैरे.... ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या मी चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे ? आणि ते सुद्धा का ? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते. आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचे सोने करण्याचे भान आपल्याला असणे आवश्यक असते. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो.

## वळण...

आधुनिक केसरी

रस्त्याचं वळण, अक्षरांचं वळण, माणसाचं वागण्या-बोलण्याचं वळण, आयुष्याचं वळण ,यशाचं वळण, घटनेचं वळण, केसांचं वळण, आजाराचं वळण, खाण्यापिण्याचं वळण असे कितीतरी वळण माणसाच्या आयुष्याशी निगडीत आहेत. या सगळ्या वळणाशी माणूस बांधला गेला आहे. शरीराला ,मेंदूला ,मनाला जर चांगले वळण असेल तर माणूस निरोगी राहू शकतो. वळण वाकडे असेल तर ते सर्वांनाच त्रासदायक होते. रस्ता वळणावळणाचा असेल तर गाडी चालवणाराला त्रास होतो ,तो वैतागतो. मग आपल्या शरीराला, इंद्रियाला चांगले वळण नसेल तर आरोग्याला त्रास होतो. आरोग्याला त्रास झाला की मनाला त्रास होतो. मनाला त्रास झाला की जीवन जगायला त्रास होतो. वळण हे दोन्ही प्रकारचे आहे. चांगले व वाईट. यशाचं वळण असेल तर फलदायी असते, सुखकारक असते. पण वाईट वळण असेल तर ते सर्वांना तापदायक होतात. वळण कितीही वाकडे असले तरी आपण ते सरळ आहे असे समजून चालावे. पण सवयींचे वळण वाकडे असून चालणार नाही. समजणे आणि असणे फरक आहे. "पदरी पडलं आणि पावन झालं"असा बळजबरीचा राम राम नको. दाताने नखं कुरतडणे हे अतिशय खराब वळण आहे.थुंकणे, खोकणे ,शिंकणे याचेही वळण असावे. अक्षराला सुद्धा चांगले वळण असेल तर ते अक्षर वळणदार असते. वाचायला आणि दिसायला छान वाटते. साचलेल्या पाण्याला देखील वळण काढून द्यावे लागते. एखाद्या घटनेला वेगळं वळण लागण्याआधीच ती घटना समजून घ्यावी. साध्या जखमेत गॅंग्रीनचे वळण लागण्यापूर्वीच ती जखम दुरुस्त व्हावी.. भेटू या वेगळ्या वळणावरती..

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.१४

## श्री नवनाथ माहिती....

आधुनिक केसरी

नाथ संप्रदायाचा उगम कोठे झाला, ह्याबद्दल मतभेद आहेत. ह्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पाया म्हणजे शिव हेच अंतिम सत्य असून तोच पिंड बह्मांडाचा आधार होय, ही भूमिका.. नाथांचे नवनाथ कोण ह्याविषयी अभ्यासकांत एकमत नाही. नाथपंथीयांना सिद्घी प्राप्त असून ते अनेक प्रकारचे चमत्कार घडवून आणू शकतात, अशी समजूत आहे. भारतात आणि महाराष्ट्रात ह्या पंथाला महत्त्वाचे स्थान आहे ज्ञानेश्वर हे नाथपंथाशी संबद्घ होते. ज्ञानेश्वरांना नाथ संप्रदायाची शिकवण त्यांचे वडील बंधू निवृत्तिनाथ ह्यांच्याकडून मिळाली होती. त्यामुळे वारकरी संप्रदायाशी नाथपंथाचा संबंध आला. नाथ संप्रदाय वर्णव्यवस्थेला मानत नाही. भारतातील वेगवेगळ्या धर्मपंथांशी नाथपंथाचा कोणत्या तरी स्वरूपात संबंध आलेला दिसतो. बौद्ध धर्माच्या भारतातील शेवटच्या काळात महायान पंथात तांत्रिक कर्मकांड रूढ झाले होते. त्याचाच वारसा नाथ संप्रदायाने पुढे चालवला असे म्हणता येईल. या संप्रदायाच्या रूपनाथ येथील मंदिराशेजारी सम्राट अशोकाचा शिलालेख सापडला आहे.नाथांचे मूळ गुरू आदिनाथ म्हणजे शिव असून याचा दत्त संप्रदायाशी देखील अगदी निकटचा संबंध आहे. नाथ परंपरेप्रमाणे नवनाथांपैकी अनेकांना या संप्रदायाची दीक्षा दत्तात्रेयाकडून मिळाल्याचे दिसून येते. तांत्रिकदृष्टया जरी दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्व असले तरी दोन्ही संप्रदायांकरिता अत्यंत पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. नाथांच्या परंपरेमध्ये अनेकदा हा संप्रदाय म्हणूनच नाथमत, अवधूतमत, अवधूत संप्रदाय, सिद्धमत इत्यादी नावांनी देखील ओळखला गेला आहे. नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून प्रामुख्याने मच्छिन्द्रनाथ आणि गोरक्षनाथ या गुरुशिष्यांचे नाव घ्यावे लागेल. या दोहोंचा जन्म, त्यांचे चमत्कारांनी भरलेले आयुष्य, त्यांनी केलेले कार्य या विषयांशी संबंधित अनेक कथाही जनमानसात प्रचलित आहेत. मत्स्येन्द्रनाथांनी त्यांच्या मासळी- आईच्या पोटात असतानाच शिव-पार्वती संवाद दैवयोगाने कानी पडल्यावर प्राप्त करून घेतलेले ज्ञान, गाईच्या शेणाच्या ढिगातून गोरक्षनाथांचा झालेला जन्म, मत्स्येन्द्रांना खाव्याशा वाटलेल्या वडयाकरिता गोरक्षनाथांनी आपला एक डोळा काढून देऊन दाखविलेली पराकोटीची गुरुभक्ती, मंत्रजप करताना हाती असलेल्या मातीच्या पुतळ्यामध्ये प्राणसंचार होऊन गोरक्षनाथांकडून गहिनीनाथांचा झालेला चमत्कृतीपूर्ण जन्म अशा त्यांच्या असंख्य कथा महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजल्या आहेत.

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

ऐश्वर्यं वैभवं मेऽस्तु मामकानां च सर्वदे|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| ८१ || हे सर्वदे, माझे आणि प्रियजनांचे ऐश्वर्य आणि वैभव (अक्षय) असावे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


ब्रह्मविद्या चिनगी उड़ी, लगी कर्म घर आग ।
कर्म वासना जर गई, चेतन चेतन जाग ।।१०।।
(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/१०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रम्हविद्येची ठिणगी पडल्याने कर्माच्या घराला आग लागली. ज्यामुळे समस्त कर्माशय भोग तसेच वासना नष्ट होऊन गेल्या आणि आत्मा प्रकृती-संघाता पासून अलग होऊन आपल्या शुध्द चैतन्यमय स्वरूपाने जागृत होऊन चेतन परब्रम्हाची उपासना करू लागला.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी





सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


एकदा का निदिध्यास लागला की मनाचा उत्कर्ष होतो. आपली साधना योग्य मार्गावर आहे. याची जाणीव होते. जन्ममरणाचे दुःख रहात नाही. जीव आणि परमात्मा यांचा कायमचा सहवास लाभावा यासाठी जीवनात निर्गुण परमात्म्याच्या ध्यास मनामध्ये ठेऊन मानव जन्मामध्ये परमोच्च बिंदू गाठायचा असेल तर स्वतः स्वतः शी एकरूप झाले पाहिजे. पंचभूतांच्या बनलेल्या संपूर्ण विश्वाला व प्रपंचाचा भ्रम नाहीसा करत स्वस्वरूपाचे दर्शन झाले तर स्वानंदघन परमात्म्याच्या ठिकाणी वास होतो.यासाठी सद्गुरूच्या मार्गदर्शनाची गरज असते. आपणचं आपल्याला ओळखले पाहिजे.

यालाच "आत्मदर्शन" असे म्हणतात.

## आपल्याला सद्गुरुचा आधार वाटावा

आधुनिक केसरी

वेळप्रसंग येईल तसे वागणे उचित आहे, आणि त्याबद्दल मनावर परिणाम होऊ देऊ नये. परमात्म्याच्या चिंतनात मन गुंतले असताना अवांतर गोष्टींचा परिणाम त्यावर होत नाही. जेवढे झेपेल तेवढेच करावे. अभ्यास करावा पण काळजी न करता. सर्वस्वी भार भगवंतावर ठेवून निवांत असावे. आपल्या मनाचे स्वास्थ्य बिघडू न देता आनंदात रहावे. वृत्ती आवरून आवरत नाही; ती परमात्म्याकडे लावली म्हणजे आवरते. रामइच्छेने सर्व चालते असे लक्षात ठेवावे. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले त्या स्थितीत समाधान मानावे. अंतःकरणात सुप्त असलेले भगवंताचे प्रेम जागृत होण्यासाठी काही निमित्त लागते. तीर्थयात्रा आणि साधुसंतांची भेट हेच ते निमित्त होय. श्रीरामचंद्रही तीर्थयात्रेला जाऊन अनेक संतांची दर्शने घेऊन आले. संतांच्या अहंकाराला जिवंत राहताच येणार नाही. कारण 'परोपकार' करायला लावणार 'पर'च ठिकाणावर नाही, तर मग 'दुसऱ्याकरिता मी काही केले' ही भावना व्हायला आधारच कुठे राहिला ? विषयाच्या लालसेने सत्समागम करणे हा खरा सत्समागम नव्हे. संत कधीकधी आपल्याला विषय देतात खरे, पण एकंदरीत आपल्याला विषयाचा वीट आणण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो. संताच्या घरी नुसते पडून राहिल्यानेही शुद्ध भाव येईल. भगवंताच्या नामातच संतसंगती आहे, कारण नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय, आणि नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय. तपश्चर्येचे सर्वांत शेवटचे फळ काही असेल तर परमेश्वराच्या ठिकाणी अनन्यभावाने शरण जाण्याची बुद्धी होय. ती बुद्धी आपल्याला झाली पाहिजे. एकदा शरण गेल्यावर आपण उरूच शकत नाही; त्यालाच शरणागती म्हणतात; आणि हीच परमार्थातली अत्यंत श्रेष्ठ गती आहे. आपण आपल्या सद्गुरूचे आहोत असे छातीठोकपणे सांगत चला. काही नाही केलेत तरी चालेल, पण आपले सद्गुरू आपल्या मागेपुढे आहेत अशी दृढ भावना असावी. मला सुखदुःख दोन्ही नाहीत. पण तुम्ही दुःखी झालात तर मला दुःख होते. तेव्हा तुम्ही मनाला दुःखच होऊ नये असे वागा. प्रपंची माणसाच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे. ती जाणीव ठेवूनच 'भगवंताचे नाम घ्या' असे मी सांगतो. जे मी सुरुवातीला सांगितले तेच शेवटी सांगतो; तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

अहंकार जाण्यासाठी साधनच करावे लागते. आणि ते साधन गुरू सांगत असतात. म्हणून, त्याच्या आज्ञेप्रमाणे वागले म्हणजे आपले हित होते. ब्रह्म हे काही कुठे शोधायला जावे लागत नाही. ते आपल्या जवळच असते; पण ते दुसऱ्याने आपल्याला दाखवावे लागते. हेच काम सद्गुरू करीत असतात. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्म, अवतार घेऊन वसुदेवाच्या पोटी आले. परंतु, वसुदेव त्यांना आपला मुलगाच समजत होते तोपर्यंत, प्रत्यक्ष परमात्मा घरी असूनही ओळख पटली नाही. तेच, नारदांनी जेव्हा सांगितले की, 'श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल, ' तेव्हा खरी ओळख पटली.तेच, नारदांनी जेव्हा सांगितले की, 'श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल, ' तेव्हा खरी ओळख पटली. आता हे जरी केवळ आपल्याला दाखविण्याकरिता असले...

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

नहीदृशं संवननं त्रिषु लोकेषु विद्यते ।दया मैत्री च भूतेषु दानं च मधुरा च वाक् ॥सरलार्थ - दया, मानवमात्राच्या ठिकाणी मंत्रीभाव, दान आणि मधुर भाषण, या गोष्टीसारखे माणसांना वश करण्याचे साधन तीन्ही लोकांत नाही. स्पष्टीकरण - माणसे आपल्याला वश होतात, आपले काम प्रेमाने करतात, त्याला वरील चार गोष्टी कारणीभूत होतात. आपण लोकांशी मित्रभाव धरला नाही, तर आपलाही कोणी मित्र होणार नाही. दया ही तर अंतःकरणात हवीच. तिचा प्रभाव पडतो. आणि सरते शेवटी आपली गोड वाणी ! नुसत्या या एका गुणामुळेच आपली अर्धी कामे होतात. जो कटू बोलत राहील, लोकांवर खसवस करील, त्याच्यापासून सगळेच दूर राहतील.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, ३ सप्टेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 3 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-36 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5



# लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्रभरात उद्रेक

आधुनिक केसरी

**जालना : जिल्ह्यातीच्या अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा मोर्चावर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याची घटना शुक्रवारी घडली होती. शनिवारी या घटनेचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले. तसेच शरद पवार यांनी या ठिकाणी भेट दिली. त्यावेळी त्यांनी असा आरोप केला की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पाळला नाही.**

एकनाथ शिंदे सरकारने शब्द पाळला नाही त्यामुळे आंदोलन सुरु झाले. मात्र आंदोलन बळाचा वापर करुन चिरडण्याचा प्रयत्न झाला. पोलिसांनी हवेत गोळीबार करुन आंदोलकांना हुसकावून लावले. मोठ्या संख्येने पोलीस आंदोलनस्थळी आले. एका बाजूने चर्चा सुरु ठेवली तर दुसऱ्या बाजूने लाठीहल्ला केला. आंदोलकांना माझा सल्ला आहे की त्यांनी शांततेत आंदोलन सुरु ठेवावे कारण हे आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न होतो आहे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. शरद पवार यांनी आज जालना या ठिकाणी भेट दिली. त्यानंतर त्यांनी ज्या अंतरवरली सराटी गावात आंदोलकांवर लाठीचार्ज झाला त्या गावालाही भेट दिली. तसेच मनोज जरांगे पाटील यांनाही ते भेटले. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी



शब्द पाळला नाही असा आरोप केला आहे. जालना जिल्ह्यातल्या अंतरवली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर लाठीचार्ज करुन हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होतो आहे. पोलिसांनी लाठीचार्ज करतानाचे व्हिडीओ समोर आले आहेत. मराठा आंदोलकांचे हे म्हणणे आहे की पोलिसांनी शांततेत आंदोलन सुरु असताना लाठीचार्ज करण्यास सुरुवात केली. तर दुसरीकडे पोलिसांचं म्हणणं हे आहे की आधी दगडफेक सुरु झाली त्यामुळे आम्हाला लाठीचार्ज करावा लागला. या घटनेचे तीव्र पडसाद राज्यभरात उमटत आहेत. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी बसची जाळपोळही करण्यात आली.

## काटशेवरी फाटा येथे रास्तारोको आंदोलन

सुलतानपूर : जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण सकल मराठा समाजाच्या वतीने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर शुक्रवारी पोलिसांनी लाठीहल्ला केल्याची घटना घडली. या लाठीहल्ल्या मध्ये शेकडो आंदोलनकर्त गंभीर रित्या जखमी झाले. या घटनेचा निषेध करण्यासाठी खुलताबाद तालुक्यातील खुलताबाद फुलंब्री राष्ट्रीय महामार्गावरील कटशेवरी फाटा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. ग्रामीण भागातील आंदोलनकर्त्या भावा बहिणीवर अमानुषपणे मारहाण करणाऱ्या व मारहाणीचे आदेश देणाऱ्या या दोघांवरही कारवाही करण्यात यावी व सकल मराठा समाजाला न्याय मिळावा अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने खुलताबाद तहसील चे नायब तहसिलदार याना निवेदनाद्वारे केली आहे.

# सरकारच्या आदेशानेच लाठीचार्ज : नाना पटोले

## 'इंडिया आघाडी'वरुन जनतेचे लक्ष वळवण्यासाठी लाठीचार्ज

**मुंबई :** देशभरातील महत्वाच्या पक्षांचे नेते मुंबईत इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी आले असताना या बैठकीचा संदेश देशभर जाऊ नये व इंडिया आघाडीच्या बैठकीपासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी सत्तेतील भाजपाने जालन्याची घटना घडवून आणली. आरक्षणाची मागणी करणाऱ्या मराठा समाजातील निर्दोष बांधवांवर लाठीचार्ज करण्यात आला. हा लाठीचार्ज सरकारच्या आदेशानेच झाल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.
माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, जालन्यातील घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध करत आहे. पोलिसांनी लहान मुले, महिलांवरही लाठीहल्ला केला, त्यात अनेक लोक जखमी झाले आहेत. राज्यात तणावाची स्थिती निर्माण झाली आहे, हे सर्व सत्तेतील हुकुमशाही व्यवस्थेचा परिणाम आहे. सरकारच्या आदेशाशिवाय पोलीस एवढे धाडस करणार नाहीत. निर्दयीपणे लोकांवर पोलिस हल्ला करण्यात आला. या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. निरपराध लोकांवर हल्ला करुन विरोधकांवर आरोप करण्याचे पाप भाजपा करत आहे. आगीत तेल ओतण्याचे काम भाजपाचे आहे, काँग्रेसचे नाही. काँग्रेस नेहमीच शांततेच्या मार्गाने सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करत असते. देशात जातनिहाय जनगणना केल्याशिवाय सर्व समाज घटकांना न्याय मिळणार नाही. काँग्रेस पक्षाची तीच भूमिका असून जातनिहाय जनगणना करण्यास भाजपाचा मात्र विरोध आहे. सत्तेत आल्यावर २४ तासात आरक्षण देण्याच्या वल्गणा देवेंद्र फडणवीस यांनीच केल्या होत्या. धनगर समाजाला आरक्षण देतो, मराठा समाजाला आरक्षण देतो अशी आश्वासने फडणवीस यांनीच दिली होती मग आता काय झाले, सत्तेत येऊन वर्ष झाले अजून का आरक्षण दिले नाही. ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा घोळ सुद्धा फडणवीसांनीच घातला आहे आणि विरोधकांवर उलटे आरोप करतात, याला चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात. जनतेने भाजपाचा खरा चेहरा ओळखला असून बदमाश भाजपाला सत्तेतून बाहेर काढण्याचा निर्णय जनतेने घेतलेला आहे.

# आदित्याय नमो नमः।

# सूर्याकडे झेपावले इस्रोचे यान

आधुनिक केसरी न्यूज

चांद्रयान-३ च्या यशस्वी मोहिमेनंतर भारतीय अंतराळ संस्था ( इस्रो ) आता सूर्याकडे झेप घेत आहे. सूर्याच्या अभ्यासासाठी 'आदित्य एल१' अंतरयान श्रीहरिकोटा येथून आज ( २ सप्टेंबर ) ११ वाजता प्रक्षेपित होत आहे. लाँचिंगच्या १२७ दिवसांनी यान एल-१ अचूक कक्षेपर्यंत पोहचेल. यानंतर सूर्याच्या अभ्यासाद्वारे आकाशगंगेतील तसेच इतर विविध आकाशगंगांमधील ताऱ्यांबद्दल बरीच माहिती मिळवता येईल, असे 'इस्रो'ने सांगितले आहे. 'पीएसएलव्ही सी५७' हा शक्तिशाली वाहक 'आदित्य एल१' यानाला घेऊन अंतराळात झेपावणार आहे. पृथ्वीपासून सुमारे १५ लाख किलोमीटरवरील 'एल१' (सूर्य-पृथ्वी लॅग्रॅन्जिअन पॉइंट) येथील सौर वारे आणि सूर्याचे प्रभामंडल यांचे दूरस्थ निरीक्षण करण्यासाठी 'आदित्य एल१'ची रचना करण्यात आली आहे. पृथ्वी आणि सूर्य यांचे गुरुत्वीय बल संतुलित राहतील, असे पाच बिंदू (लॅग्रॅन्जिअन पॉइंट) आहेत. त्या बिंदूंवरून सूर्याचा अभ्यास करणे विशेष व महत्त्वाचे असते. त्यातील 'एल १' या बिंदूचा वापर 'आदित्य एल १' या मोहिमेत केला जाणार आहे. सूर्यामुळे उद्रेकाच्या अनेक घटना घडतात. तो सौर मंडळामध्ये प्रचंड प्रमाणात ऊर्जा उत्सर्जित करतो. अशा प्रकारच्या स्फोटक सौर घटना घडल्या तर पृथ्वीजवळच्या अवकाशात विविध प्रकारचे परिणाम संभवतात, असे संशोधकांचे मत आहे. सूर्याच्या अभ्यासासाठीच्या मोहिमेची घोषणा इस्रोने २००८ मध्ये केली. आतापर्यंत नासा, युरोपियन स्पेस एजन्सी अशा मोजक्या देशांतील संशोधन संस्थांनी अंतराळातील सौर मोहिमा केल्या आहेत. दरम्यान, सूर्याच्या बाह्य भाग फोटोस्फिअर येथील तापमान ५५०० अंश सेल्सिअस असते. तर, सूर्याच्या केंद्रबिंदूचे तापमान १.५० कोटी अंश सेल्सिअस आहे. त्यामुळे कोणतेही यान सूर्याच्या जवळ जाऊ शकत नाही.

अंतराळ क्षेत्रात भारत नवनवे टप्पे पार करत आहे. चांद्रमोहिमेच्या यशानंतर भारताने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी सौरमोहीम हाती घेतली आहे. भारताची अंतराळ संशोधन संस्था इस्रोने आज सकाळी ११.५० वाजता आदित्य एल-१ हे अवकाशयान सूर्याचा अभ्यास करण्यासाठी पाठवलं आहे. दरम्यान, चांद्रयान-३ कडून एक मोठी माहिती मिळाली आहे. प्रज्ञान रोव्हरने चंद्राच्या पृष्ठभागावर १०० मीटर अंतर पूर्ण केलं आहे. प्रज्ञान रोव्हर सध्या चंद्रावरील लँडिंग साईट शिवशक्ती पॉईंटपासून १०० मीटर दूरवर संशोधन करत आहे.
इस्रोने चांद्रयान-३ चा एक नवीन फोटो शेअर केला आहे. यामध्ये प्रज्ञानचा मूनवॉक दाखवण्यात आला आहे. आता चंद्रावर अंधार पडू लागला आहे. चंद्रावर जेव्हा पूर्णपणे काळोख असेल तेव्हा प्रज्ञान रोव्हर आणि विक्रम लँडरचे काम थांबेल. कारण लँडर आणि रोव्हरवर सोलार पॅनल बसवले आहेत. त्यामुळे यावरील उपकरणं केवळ सूर्यप्रकाशातच काम करू शकतात. तसेच चंद्रावर सूर्यास्त झाल्यानंतर तिथले तापमान उणे २०३ अंश सेल्सिअस इतकं होईल. चंद्रावर १४ दिवस रात्र आणि १४ दिवस उजेड असतो.
इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ शनिवारी म्हणाले, चांद्रयान-३ मधील रोव्हर आणि लँडर उत्तम काम करत आहेत. चंद्रावर आता रात्र होणार आहे. त्यामुळे यावरील उपकरणे आता निष्क्रिय होतील. सध्या तिथे रोव्हरचे काम सुरू आहे. रोव्हरद्वारे आम्हाला बरीचशी माहिती मिळाली आहे. आम्ही येत्या एक-दोन दिवसात आपल्या अवकाशयानावरील उपकरणं निष्क्रिय करण्याची प्रक्रिया सुरू करणार आहोत, कारण दोन दिवसांत तिथे गडद अंधार पडेल. विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरच्या माध्यमातून इस्रोला मिळणारे फोटो, व्हिडीओ आणि तिथली माहिती इस्रो सोशल मीडियावर शेअर करत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये विक्रम आणि प्रज्ञानने चंद्राच्या पृष्ठभागाचे, तिथल्या खंदकांचे आणि मातीचे फोटो इस्रोच्या बंगळुरूतील मुख्यालयाला पाठवले आहेत. तसेच चंद्रावरील तापमानाची माहितीदेखील इस्रोला मिळाली आहे. त्याचबरोबर चंद्रावर पाण्याचा शोध घेतला जात आहे. इस्रोने दोन दिवसांपूर्वी एक व्हिडीओ शेअर केला होता. या व्हिडीओत प्रज्ञान रोव्हर जागेवर गोल फिरताना दिसतोय. इस्रोने हा व्हिडीओ शेअर करत म्हटलं की सुरक्षित मार्गाच्या शोधात रोव्हर फिरवण्यात आला. प्रज्ञान रोव्हरच्या या रोटेशनचा व्हिडीओ विक्रम लँडरवरील इमेजर कॅमेऱ्याने शूट केला आहे. इस्रोने हा व्हिडीओ शेअर करत म्हटले आहे की, हा व्हिडीओ पाहून असे वाटते, चांदोमामाच्या अंगणात एखादं लहान मूल (प्रज्ञान रोव्हर) खेळतंय आणि आई (विक्रम लँडर) हे सगळे प्रेमाने पाहत आहे, तुम्हालाही असे वाटते ना?



# आदित्य एल-वनचे धवल यश : भावी संधी आणि आव्हाने



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**पीएसएलव्ही या उपगृहाद्वारे श्रीहरीकोटा येथून आदित्य एल 1 चे यशस्वी उड्डाण करण्यात आले. सकाळी 11.50 या सुनिश्चित वेळेवर त्याचे काटेकोरपणे लाँचिंग करण्यात आले. आता 4 महिन्यानंतर आदित्य एल 1 सूर्याच्या कोरोना या पाचव्याबाह्य पटलासमीप पोहोचेल आणि आपले संशोधन कार्य सुरू करेल. अशा प्रकारे ही अंतराळातील सौर अभ्यास करणारी प्रगत प्रयोगशाळा आहे. भारताचा एक आर्थिक महासत्ता म्हणून उदय झाल्यामुळे भारताला अनेक सामर्थ्यस्थाने प्राप्त होत आहेत. विशेषतः अंतराळ संशोधन हे त्यापैकी एक महत्वाचे सामर्थ्य होय. सध्या भारताचा जी. डी. पी. 7.8 टक्के पेक्षा वाढला आहे, तसेच युरोपातील अनेक पाश्चात्य देशांचे उपग्रह अंतराळात सोडल्यामुळे भारताला सुमारे 1 हजार दशक्ष डॉलर एवढे उत्पन्न झाले आहे. एकेकाळी जगावर राज्य करणाऱ्या व ज्यांचा सूर्य सात समुद्रावर मावळत नव्हता अशा इंग्रजांना सुध्दा आपले उपग्रह भारताच्या श्रीहरी कोटा या अंतराळ केंद्रावरून सोडावे लागत आहेत व त्यासाठी त्यांना योग्य किंमत मोजावी लागत आहे. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या दूरदृष्टीने अंतराळ संशोधन क्षेत्र हे खाजगी उद्योगासाठी खुले केले आहे. चांद्रयान-१ या मोहीमेमध्ये भारतातील 4 ते 5 खाजगी उद्योग समुह सामील झाले होते.**

आता आत्मनिर्भर भारताचा विचार करता आदित्य-एल-वन या मोहीमध्ये सुध्दा सर्व उपकरणे लोद् सर्व सात पेलोद उपकरणे हे अस्सल भारतीय बनावटीची आहेत तेथे कोणताही भाग विदेशी घेतलेला नाही. पुणे येथे काम करणारी आयुका या संसोधन संस्थेने पदार्थ विज्ञान व सौर संशोधनात महत्वाची भूमिका पार पाडली आहे. या अंतराविद्यापीठ संशोधन संस्थेने पेलोव उपकरणांच्या निर्मितीमध्ये महत्वाचा वाटा उचलला आहे. त्यामुळे चंद्रयान 3 प्रमाणौ आदित्य एल-वन या संशोधन प्रकल्पातील देशी संशोधन क्षमतेचे मूल्य वाढले आहे. 2008 पासून आदित्य मोहीमेची आखणी चालू होती. आता सात उपकरणाने युक्त अशा या मोहीमेला यश प्राप्त झाले आहे. त्याचे रहस्य या संस्थेच्या भक्कम वाटचालीस आणि व्यवस्थापनात आहे.

1) सौरमोहीमेचे व्यवस्थापन फ्रेडरिक ट्रेलर यांच्या शास्त्रीय व्यवस्थापन प्रणालीचे तत्वशूद्र या मोहीतमेत काटेकोरपणे विकसीत करण्यात आले आहे. पैलोद ची निर्मिती व आखणी व जुळणी तसेच त्याना अपलोड करताना घेतलेली काळजी पाहता निर्मिती जुळणी नियंत्रण, नियोजन आणि परस्पर समन्वय या कारणांमुळे प्रारंभापासून ते अंतिम चरणापर्यंत या योजनेचे यश अपूर्व राहीले आहे. कुठल्याही अंतराळ संशोधन मोहीमेत काळ, काम आणि वेगाचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करावयाचे असते. त्यामुळे चांद्रयाणच्या अनुभवावरून सौरयान आदित्यची मांडणी करतांना विश्लेषक पॅकेज उत्तम प्रकारे वापरले आहे. ही अंतराळातील भौतिक संशोधन प्रयोग शाळा तयार करतांना सोलार लो एनर्जी एक्सरे स्पेक्ट्रोमिटर, हाय ईनर्जी ऑर्बिटींग एक्सरे स्पक्ट्रोमिटर तसेच मॅग्नोटो मिटर या उपकरणांची निर्मिती करताना श्रेष्ठ गुणवत्ता साध्य करण्यावर भर देण्यात आला. सर्व सातही उपकरणे ही अव्वल दर्जाची असून त्यांचे अंतिम यश हे या यानाच्या रचनेत महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहेत. सतत पाच वर्षे सूर्याच्या कोरोना या बाह्य अवतरणाबाबतच्या सुक्ष्म नोंदी हे यान नियमितपणे पाठविणार आहे.

**2) संशोधन कार्याचे महत्व**

आदित्य एल-वन या मोहीमेतील सूर्याच्या वर्तनाचा अभ्यास तसेच त्याची पृथ्वी आणि आकाशातील वातावरणाच्या बाबतीत होणाऱ्या परस्पर संबंधाबद्दलची पाहणी करून नैसर्गिक आपत्ती व संभाव्य धोके याबाबतची समज लक्षणीयरित्या पुढे नेण्याचे अभिवचन या संशोधनामुळे साध्य होणार आहे. या मोहीमेतून नियोजीत निरीक्षणे ही सुक्ष्म असतील आणि काळजीपूर्वक काटेकोरपणे केलेल्या तथ्य संकलनामुळे सौर आणि हेलिओफिजिकल क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण शोध लागू शकतील व ते आंतरदृष्टीला चालना देवू शकतील. या मोहीमेचे महत्व खालील प्रमाणे सांगितले जाते.

1) कोरोनेल हीटींग मॅकॅनिझम म्हणजे सुर्याच्या बाह्य अवरणात उष्णतेबाबत होणारे बदल हा एक महत्वाचा अभ्यास विषय होय. सौर भौतिक शाखातील कोडे उलगडण्यासाठी कोरोनल हिटींगची समस्या अभ्यासता येईल. सूर्याचे बाह्य आवरण म्हणजे कोरोना पृष्ठ भागापैक्षा जास्त उष्णता का व कशा मुळे आहे. याबाबतचे संशोधन शक्य होईल. या याणामध्ये वापरलेली उपकरणे प्रामुख्याने सोलार ऑस्ट्रो व्हायोलेट इमेजीग टेलिस्को या नावाची दुर्बिन आणि दृश्यमान उत्सर्जन लाइन कोरोग्राफ संक्षेपाने त्याला व्हिईएलसी म्हटले आहे. तसेच कोरोनाची गतीशिलता आणि रचना यांचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी सक्षम करण्यासाठी ही उपकरणे संक्षम संशोधनास सहाय्य करतील, कोरोनाच्या वर्तनाचे बारकाईने परीक्षण करून शास्त्रज्ञांना सुर्याच्या या वाघराला गरम करण्यासाठी जबाबदार असलेल्या यंत्रणेचा उलगड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पृथ्वीर तापमान का वाढत आहे. उष्णतेच्या लाटा का येत आहेत. यांचे शास्त्रीय आकलन होवू शकेल... स्पेस वेदर प्रेडिक्शन म्हणजे अंतराळातील वातावरणाचे भविष्य कथन व अंदाज व्यक्त करण्यासाठी अचूक अंदाच व्यक्त करण्यासाठी या प्रयोग शाळेचा उपयोग होईल. अवकाशातील हवामानाच्या घटकांचा अंदाज लावण्यासाठी सूर्याचे वर्तन समजून घेणे आवश्यक आहे. कारण त्याचा पृथ्वीच्या जीवनावर तंत्रज्ञानावर, आणि पायाभूत सुविधांवर कोणता महत्वाचा परिणाम होवू शकतो याचा शोध घेता येईल. तसेच या मोहीमेतून समोर येणारी आकडेवारी सोलर प्लेयर्स, कोरोनल मास इंजेक्शन आणि सौर उर्जेचे सुक्ष्म कण तसेच इव्हेन्टको नेणाऱ्या प्रक्रियांची अंतरदृष्टी प्रदान करण्यासाठी हे संशोधन पुरक ठरेल अशी आंतरदृष्टी हवामानातील घटकांचे अचूक अंदाज बांधण्यासाठी उपयुक्त संप्रेक्षण प्रणाली विकसीत करण्यास सहायभूत ठरेल. उपग्रह आणि पॉवर ग्रीडवर होणाच्या संभाव्य प्रभावाचे आकलन करण्यासाठी ही तथ्ये दिशा देवू शकतात.

थोडक्यात संभाव्य वातावरण बदल नेमकेपणाने सांगता येतील व पुढील धोके टळतील.

**3) सौर वारा आणि चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास**

या अवकाश यानामुळे प्रयोगशाळा प्रत्यक्ष सूर्याजवळ जावून संशोधन करणार आहे. आदित्य यानाची सर्व साधने म्हणजे पेलोडस किंवा उपकरणे ही सोलर विंडपार्टिकल एक्सपिर्मेन्ट म्हणजे सौर वान्याच्या घटकांबाबत संशोधन करण्यासाठी प्रयोग करेल आणि मॅग्नोटोमिटर या उपकरणाच्या सहाय्याने सौर वान्याचे गुणधर्म तपासले जातील. तसेच अंतरग्रहीत चुंबकीय क्षेत्राचे सर्वसमावेशक दृष्टीने अध्ययन एकाच वेळी केलेल्या अशा अवलोकनामुळे नोंदविलेल्या निरीक्षणामुळे शास्त्रज्ञांना सूर्याच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणाऱ्या जटील प्रक्रियांमध्ये अंतरदृष्टीने बदल करून विविध स्तरांमधील उर्जा आणि अन्य पदार्थांचा प्रवाह शोधण्याची परवानगी मिळेल. या सर्व प्रयत्नांमुळे सरळसमावेशक सौर चातावरणाचे छायाचित्रण करून त्याचे नव्याने



करणे शक्य होईल. सौर वान्याच्या वर्तनाचे अध्ययन करून नवीन प्रतिकृती किंवा (मॉडेल) तयार करणे शक्य होईल, पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचे परस्परावलंनावनाबाबत नवी प्रतिमाने तयार करून जुन्यामध्ये सुधारणा करणे शक्य होईल. अवकाश वातावरणातील गतीशिलतेवर नवा प्रकाश टाकणे शक्य होईल.

**4) पृथ्वीवरील बदलत्या हवामानाचे आकलन**

या यानामुळे सुर्याची क्रिया दिर्घकाळपर्यंत पृथ्वीच्या हवामानावर प्रभाव टाकत असते. यातील बदलाचे आदित्य यान सौर किरणोत्सगाची निरीक्षणे नोंदविल आणि त्यामुळे सुर्याचे वर्तनाचा पृथ्वीच्या वातावरणावर होणारा परिणाम समजण्यासाठी हातभार लागू शकेल. सौर परिवर्तनशिलतेचा पृथ्वीच्या हवामानावर कसा परिणाम होतो हे समजू शकेल हे हवामान संशोधन मौल्यवान माहीती प्रदान करेल त्यामुळे हवामान बदल घडवून आणणाऱ्या नैसर्गिक आणि मानव निर्मितील घटकातील फरक करणे शक्य होईल. त्यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अचूक मार्गदर्शन करता येईल..

**5. सर्वसमावेशक सौर वातावरणाचे प्रतिमांकन (ईमजींग)** आदित्य एल-1 है अंतराळ यान आपल्या सात उपकरणाच्या सहाय्याने सूर्याभोवताच्या वातावरणाचा फोटो स्टीअर पासून ते कोरोनापर्यंत म्हणजे बहुतरंगावलंबी निरीक्षणे पाठवू शकेल. आकलन करणे शक्य होईल.

6. सीएमईएसटी उत्पती व गतीशिलता कोरोना म्हणजे सुर्याचे बाह्य आवरन कोरोनल मास इंजेक्शन हे शक्तीशाली आणि संभाव्य विघटनकारी सौर घटक आहेत. पीएमईएसच्या प्रारंभ आणि उत्नतीबद्दल आदित्य यानामुळे निरीक्षण करून त्यांच्या उत्पत्ती व सर्वनाबद्दल आकलन करण्यात हातभार लागेल. अर्थातच त्यामुळे संभाव्य घटना व परिणामांचा अंदाज लावून सुधारित मंडिल विकसीत करता येतील. हे सर्व प्रमुख लाभ या मोहीमेतून साध्य होणार आहे. शिवाय मानवी आरोग्य प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण रक्षण तसेच पृथ्वीरवरील वाढत्या तापमानाचे संभाव्य धोके टाळण्यासाठी दूरदृष्टीने प्रयत्न करणे शक्य होईल. सौर आवकाश मोहीमेत यापूर्वी अमेरिका, रशिया, जपान, चीन या देशानी काही प्रयोग केले आहेत. परंतु भारताचे या क्षेत्रातील पाऊल अमेरिकेच्या सोलर ऑर्बिटर व प्रोवरपेक्षा भिन्न आहे. त्यामध्ये स्वतंत्र सापेक्ष दृष्टीकोण आहे वर्तमान भौतिक विज्ञान क्षेत्रात त्यामुळे नवी भर पडणार आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषद आणि प्रदर्शनात भारत आता उद्योग परिवर्तन आणि प्रवर्तन या दोन्ही दृष्टीने नवी आशा आंकाक्षा प्रगट करत आहे. शोधाचा नवा दृष्ठीकोण चंद्रमोहीम सफल झाली चंद्रयान उत्तम कार्य करत आहे, आता आदित्य एल 1 है उड्डाण करून भारताने मोठ्या आत्मविश्वासाने सूर्याकडे झेपावण्याचा निर्णय घेतला. भारतीय अंतराळ संशोधन व अन्वेषणात ही एक नवे वळण देणारी घटना होय. जागतिक दृष्टीने पाहता असे दिसते की, कमी खर्चामध्ये अधिक चांगले व उपयोजित संशोधन शक्य आहे. हे भारताते सिद्ध केले आहे. भारताच्या या सर्व प्रयत्नांचे वेगळेपण कशात असेल तर दूरदृष्टी नियोजन आणि प्रगत मनुष्यबळात आहे, नव्या युगामध्ये नवी दृष्टी घेवून सर्वांगीण विकासासाठी दमदार पावले टाकली तर वसुदैव कुटुंबकम हा दृष्टीकोण समोर ठेवून भारत आपल्या अंतराळ मोहीमेद्वारे पूर्व व पश्चिमेकडील सर्व देशांना विकासात सहभागी करून घेत आहेत. अधिकाधिक लोकांना सुरक्षीत व कल्याणकारी जीवन जगण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचे वरदान कशा प्रकारे लाभू शकेल हा भारताचा अंतिम उद्देश होय, आदित्य अंतराळ मोहीमेचे यश केवळ भारताला नव्हे तर मानवी कल्याणाला नवी दिशा देणारे ठरू शकेल, या मोहीमेतून प्राप्त होणारी तथ्ये ही जागतिक हवामान बदलाच्या संकटापासून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शक ठरतील. तसेच उष्णतेच्या लाटा अचानक होणारे वातावरणातील बदल यापासून सुटका करण्यासाठी विविध डावपेच व व्हयूवरचना विकसीत करण्यासाठी ही मोहीम दिशादर्शक ठरेल, समारोप भारताची सौर संशोधनातील ही पहिली मोहीम अनेक यक्ष प्रश्न सोडविण्यासाठी वरदान ठरेल. तसेच आजवर पर्यावरण तसेच प्रदुषणाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची उकल करण्यासाठी नवीन शास्त्रीय प्रयोग आवश्यक आहे हे लक्षात घेवून सुनिश्चित उद्देष्टे समोर ठेवून संशोधन केले जात आहे. आजवरच्या अनुभवाची शिदोरी तसेच भौतिकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र, संगणक व माहीतीशास्त्र, या क्षेत्रातील भारताच्या प्राचीन व वर्तमान परंपरांमध्ये समन्वय साधून हे संशोधन केले जात आहे. भारतीय अंतराळ संशोधन हे अन्य कोणाशी स्पर्धा करणारे नाही, तर महात्मा गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानानुसार बहुजन हिताय व बहुजन सुखाय असा लोक कल्याणकारी दृष्टीकोन समोर ठेवून केले जात आहे. तसेच भारतीय संस्कृतीमधील प्रज्ञा- शिल- करुणा. विज्ञान.. आणि विवेक भाव जागृत ठेवून जय जगतचा नारा देत भारताने सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास या दिशेने प्रयत्न करून जगाचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात भारताला सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थान मिळेल यात शंका नाही....

# मुलांवर दबाव नाही तर प्रभाव निर्माण करणं गरजेचं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मुलांच्या मनात शिक्षाणा विषयी रस निर्माण करण्याचं कौशल्य पालकांना अवगत कराव लागेल असंयमी युगात पाल्य घडवणं हि तारेवरची कसरत आहे. पण हिच कसरत पालकांना आपल्या मुलांवर प्रभाव निर्माण करून यशस्वी करता आली पाहिजे. व्यक्ति दबावाखाली जितकं कार्य करत नाही त्या पेक्षा कितीतरी पट अधिक आणि फलदायी कार्य प्रभावातून करत असतो. लहान वयात तर अनुकरण आणि प्रभाव हा खुप फलदायी ठरत असल्याने दबावा पेक्षा प्रभाव हा खुप महत्वाचा ठरत असतो. पेरणी उत्कृष्ट पद्धतीने केली तरी पिकं व्यवस्थित उगवतं याची जाणीव आपण ठेवायला हवी. उगवण क्षमता ही पेरणीवर अवलंबून असते. म्हणून आपण आपल्या मुलांच्या मनात विचारांची व्यवस्थित पेरणी कशा पद्धतीने करतोय त्यानुसार त्याचं भविष्य ठरत असतं.**

त्यांच्या बाल मणावर आपल्याला व्यवस्थित प्रभाव निर्माण करता आला तर आपोआपच आपला प्रभाव त्यांच्यावर निर्माण होईल आणि कोणत्याही दबावा शिवाय आपल्याला त्यांना व्यवस्थित पणे घडवता येईल. शेवटी घडण आणि घडवणं हेच महत्वपूर्ण असत. अशा अपेक्षा असल्या पाहिजेत पण त्याला एक मर्यादा असली पाहिजे. अशा अपेक्षा यांचं ओझं एवढं मोठं नसावं कि त्या ओझ्याखाली मुलं चिरडली जाऊन बालपण विसरून तणावग्रस्त व्हावीत.शिकलं पाहिजे या बाबतीत दुमत नाही. पण शिक्षण तणावातून नाही तर स्व इच्छेने शिकलं पाहिजे.त्याच्या प्रति गोडी निर्माण करता आली पाहिजे. जो विषय आपल्याला गोड वाटतो भासतो तो आपण स्वतःहून झोकून देऊन पूर्ण करतो. अथवा पुर्ण करण्यासाठी आपली सगळी शक्ती समर्पित करतो. आपली मुलं आपली शक्ती पुर्णपणे शिक्षणासाठी कारणी लावतील यासाठी आपण त्यांना त्या पद्धतीने घडवलं पाहिजे. कोणाच्याही मना विरुद्ध दबावाखाली दबावात आपण फार काही करू शकत नाही. दबावाखाली कार्य करून घेता येत नाही व्यक्ती दबावात मनातुन कार्य करत नाही तो फक्त काही तरी करतोय असं भासवतो. याची खरी जाणीव ही पालकांना असली पाहिजे. आपली मुलं घडविण्यासाठी त्यांना तणावात नाही तर आपुलकीने गोडीने त्यांच्यावर असा प्रभाव निर्माण करा कि शिक्षणाच्या प्रति त्यांच्या मनात गोडी निर्माण झाली पाहिजे. आपली मुलं शिकली पाहिजे त्यांनी प्रचंड मोठं यश निर्माण केलं पाहिजे हि साधारणतः सर्वच पालकांची इच्छा अपेक्षा असते. पण अपेक्षा पूर्ण होण्यासाठी करण्यासाठी मुलांवर दबाव नाही तर संस्कारांचा प्रभाव निर्माण करा आपण त्यांना दबाव निर्माण करून तणावाखाली ठेवण्या ऐवजी मुलांनी स्वतः स्वतःच्या भविष्य बाबत सचेत राहव असा संस्कारांचा प्रभाव त्यांच्यावर निर्माण करा जेणेकरून सशक्त राष्ट्र निर्माण करण्यासाठी आपली मुलं सशक्त होऊन आदर्श व्यक्तिमत्व ठरतील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भुमिका खुप महत्वपूर्ण असते. हिच महत्वपूर्ण भूमिका म्हणजे मुलांवर कोणत्याही प्रकारचा अभ्यास करण्यासाठी दबाव निर्माण न करता प्रभाव निर्माण करा जेणेकरून मुलं स्वतःहून अभ्यासा साठी स्वतःला झोकून देतील.पण दुर्दैव सध्या असं होतं नाही पालकांच्या अशा अपेक्षा चरणसिमेवर आहेत .याच अपेक्षेने पालक मुलांवर दबाव निर्माण करत आहेत त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर याचे दुरगामी परिणाम होऊन अनेक वेगवेगळ्या घटना घडत आहेत. शिक्षण क्षेत्रात दिवसेंदिवस अमुलाग्र बदल होत आहेत त्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होऊन बहुतांश मुलं तणावात आहेत. त्या मध्ये आणखी भर पडते ती पालकांच्या अवाजवी अपेक्षा पूर्ण कशा कारायच्या अशा समस्या मुलांच्या समोर उभा असल्याने याचा परिणाम नकारात्मक होऊन अनेक मुलं मुली या तणावातुन स्वतःला उभा करण्यात कमी पडत आहेत हे अगदी वास्तव आहे.जस जग बदलतंय तसं वेळेसोबत बदलता आल पाहिजे. हल्ली संयम कोणाकडेच नाही त्याचा परिणाम आपण आपल्या आजुबाजूला पाहतोय पण आजुन वेळ आपल्या हातात आहे. आपण अजुनही परिस्थिती व्यवस्थित करू शकतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली प्राध्यापक भरती रखडली

## मुलाखत होऊन महिना लोटला पण निकाल मात्र गुलदस्त्यात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बहुप्रतीक्षित अशी प्राध्यापक भरती प्रकिया गोंडवाना विद्यापीठात पार पडली असली तरी मुलाखती होऊन महिना लोटला तरी निकाल समोर न आल्याने अनेक चर्चा व शंका, कुशंकांना उधाण आले आहे आणि उमेदवार मात्र आस लावून बसले आहेत. नक्षलग्रस्त आदिवासीबहुल भागातील विद्यापीठ म्हणून ओळख असलेले शिवाय स्थापनेनंतर अल्पावधीतच डिजीटल विद्यापीठ म्हणून ओळख निर्माण केलेले गोंडवाना विद्यापीठाची प्राध्यापक भरती प्रक्रीया नुकतीच पार पडली. ४\२\२०२३ ला आलेल्या EMPLOYAMENT NOTICE NO. GUG/150/2023 च्या जाहिरातीच्या आधारे 30 सहाय्यक प्राध्यापक भरतीची प्रक्रीया संपूर्ण प्रक्रीया पार करत मुलाखती पर्यंत आली होती. परंतू महामहीम राष्ट्रपती यांचा विद्यापीठ दीक्षांत समारंभाचा दौरा निश्चित झाल्याने ही मुलाखत प्रक्रीया पुढे ढकलण्यात आली होती. कालांतराने मुलाखत प्रक्रीया पुन्हा सुरु होऊन ती 28/7/2023 ला संपली. त्यानंतर लगेचच दोनचार दिवसात निकाल लागेल आणि कुणाचा भाग्योदय झाला हे कळेल याकडेच सगळ्यांचे लक्ष लागले होते. परंतू आज मुलाखत प्रक्रिया पूर्ण होऊन तब्बल एक महिना लोटला तरी अजूनही कुणाचे सिलेक्शन झाले याचा निकाल समोर न आल्याने आता शिक्षण क्षेत्रात बऱ्याच चर्चा रंगायला लागल्या असून त्यातून शंका कुशंका व्यक्त केल्या जाऊ लागल्या आहेत. या संदर्भात गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर प्रशांत बोकारे यांच्याशी संपर्क साधला असता आधि विषय निहाय आरक्षण होतं . आता संवर्ग निहाय आरक्षण घ्यायचं आहे. त्यामुळे नविन आरक्षण धोरण राबावायचं असल्याने निकालाला विलंब होतोय अस कबुल करीत येत्या चार पाच दिवसात निकाल स्पष्ट होईल असे मत त्यांनी आधुनिक केसरी जिल्हा प्रतिनिधी कडे व्यक्त केले. परंतू आता असा प्रश्न निर्माण होतोय की, आरक्षण धोरण स्पष्ट नसतांना विद्यापीठाची जाहीरात कशी प्रकाशीत झाली ? मुलाखत प्रक्रिया कशी काय पार पडली ? आणि सर्व नियमानुसार प्रक्रिया पार पडली असेल तर अंतीम टप्प्यात असलेल्या उमेदवार निवडीच्या निकालाला इतका विलंब का ?
शैक्षणिक सत्र सुरु झालं नियमित प्राध्यापक नसतील तर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानाला जबाबदार कोण ? शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी भरती प्रक्रीया पार पडली असती तर आज संबंधित विषयातील तज्ज्ञ प्राध्यापकवृंद आज विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करू शकले असते. असं सगळं असतांनाही आता नविन आरक्षण धोरणाचा विषय पुढे करून मुलाखत देणाऱ्या उमेदवारांना ताटकळत ठेवल्यामुळे यात काही चिरीमिरी ची तर प्रक्रिया पार पडत नाहीय ना असा प्रश्न आता आता दबक्या आवाजात सर्वत्र उघडपणे चर्चिल्या जात आहे.

> प्राध्यापक भरती प्रक्रीयेत आधी विषय निहाय आरक्षण होतं. आता संवर्ग निहाय आरक्षण घ्यायचे आहे. त्यामुळेच हे नविन आरक्षण धोरण राबवायचं असल्याने निकालाला वेळ लागतोय. परंतू येत्या चार पाच दिवसात निकाल लागेल.
> **डॉ.प्रशांत बोकारे, कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**



# लाठीचार्ज प्रकरणी मराठा समाजाचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज केल्या प्रकरणी राज्यात ठीक ठिकाणी आंदोलने केली जात आहेत. निवेदने देऊन निषेध व्यक्त केला जात आहे. लोणंद, ता. खंडाळा येथील मराठा समाज मंडळाच्या वतीने निवेदन देत या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात आणि लोणंद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी मराठा समाज मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अंतरवाली सराटी या गावात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संविधानिक मार्गाने आंदोलनास बसलेल्या आंदोनकर्त्यांना पोलिसांनी घेराव घालत अमानुष लाठीचार्ज करण्यात आला. शांततेच्या मार्गाने आपले हक्क मागण्यासाठी जमलेल्या मराठा समाज बांधवांस पांगवण्यासाठी गोळीबार केला. हे कृत्य अत्यंत निंदनीय असून प्रशासनाने तात्काळ खुलासा द्यावा, अन्यथा समाजाच्या रोषास सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला. मराठा समाजाला दिलेल्या या अमानुष वागणूकीमुळे राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला राज्याचे गृहमंत्री व सरकार जबाबदार असेल असे म्हटले आहे.

# भर पावसाळ्यात जाणवतोय उकाडा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यात यंदा भर पावसाळ्यात उकडा वाढला असुण तापमानात मोठी वाढ झाल्याने सद्या उन्हाचे चटके बसत असल्याचे चित्र आहे. यंदा हवामानाने वेगळेच वळण घेतले असुण भर पावसाळ्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने चटके बसत आहे तर उकडा वाढल्याने घामाच्या धारा वाहत आहे. यंदा पावसाळा सुरु होवुन तीन महिने उलटले मात्र जोरदार दमदार पाऊस झाला नाही. मृग नक्षत्राचे एकदोन पाऊस झाले आर्द्रा कोरडा गेला, पुनर्वसु व पुष्य मधे जेमतेम पाऊस झाला तर आश्लेषा मघा ऑगस्ट महिना पार कोरडा गेला. सहा नक्षत्र कोरडे गेले आता पाच नक्षत्र काय करतात यावर लक्ष आहे.यंदाच्या पावसाळ्यात सरासरी ऐवढा पाऊस दाखवला होता परंतु यंदा अद्यापपर्यंत अर्धा ही पाऊस झाला नाही. खरिप पिकातील कापुस मका सोयाबीन बाजरी भुईमूग सोयाबीन भुईमूग पिकांनी आतापर्यंत तग धरून होते परंतु आता पिकांनी मान टाकने सुरु केले आहे.सद्या मका बाजरी भुईमूग सोयाबीन फुलाऱ्यात आहे.त र कापसालाही फुले कैऱ्या लागु लागल्या अशात पावसाने खंड दडी मारल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. सर्वत्र प्रार्थना- दुआ सुरु आहे. परंतु पाउस लांबणीवर पडत आहे व अशात शेतकऱ्यात नाराजी वैफल्य पसरत आहे. वेधशाळा पाऊस येण्याचे अंदाज देत आहे परंतु पाऊस येत नाही व शेतकऱ्यांचे लक्ष आभाळा कडे लागले आहे हे विशेष.



# लम्पी आजारामुळे बैलाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नांदेड जिल्हा लम्पी ग्रस्त म्हणून जिल्हाधिकारी यांनी घोषित केले असले तरी नांदेड जिल्ह्यातील लम्पी ग्रस्त जनावरांना शासकीय पशुवैद्यकीय दवाखाना तर्फे कोणत्याही औषध उपचारासाठी मला मदत मिळाली नाही. गेली १० दिवसापासून मी माझ्या बैलावर खाजगी डॉक्टर कडून उपचार केले यामध्ये माझे १० हजार रुपये खर्च झाला पण मी माझे पशुधन वाचवु शकलो नाही. जून महिन्यात माझा बैल मी विकत घेतला होता अशी खंत व्यक्त करत माय बाप सरकारने लम्पी ग्रस्त जनावरांसाठी औषध उपचारासाठी तातडीने औषध उपलब्ध करून द्यावी जेणेकरून आजारी जनावरांना लाभ होईल. लम्पी आजारामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांच्या मालकांना आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी अमिन खाजामिया शेख यांनी सदरील प्रतिनिधीशी बोलताना केली आहे.



# विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप करून वडिलांचे वर्षश्राद्ध


आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** स्थानिक लोणार येथिल काटे नगर मधिल तिन वर्षापूर्वी कै. प्रभाकर तेजराव नेवरे याचे निधन झाले होते त्यांना आज तिसरे वर्ष श्राद्ध होते. वर्षश्राद्धसाठी होणाऱ्या खर्चाची रक्कम शालेय विदयार्थ्याच्या कामी पडावी व त्याच्या ज्ञानात अधिक भर पडावा, ह्या विचाराने रोहित प्रभाकर नेवरे व त्याच्या परिवाराने हा एक समाजासाठी चांगला आदर्श समोर ठेवला आहे. त्या वर्षश्राद्ध निमित्ताने सविता प्रभाकर नेवरे (पत्नी) व रोहित प्रभाकर नेवरे व त्याचा परिवाराने गरजू विद्यार्थ्यांना जि. प. बेशिक शाळा लोणार येथील विद्यार्थांना शालेय बॅग वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित सविता प्रभाकर नेवरे (पत्नी), रोहित प्रभाकर नेवरे (मुलगा), पंजाबराव मापारी (मुख्याध्यापक), राहूल मोरे (शिक्षक) मित्र परिवार उपस्थित होते.




## महाराष्ट्र Business Katta











प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


# मराठा आरक्षण

आधुनिक केसरी

**मराठा आरक्षणाचा प्रश्न चिघळण्याची अनेक कारणे आहेत. अत्यंत शांततेत निघालेल्या मराठा मूक मोर्चाची शासनाने गंभीरपणे दखल घ्यावयास हवी होती, ती पुरतेपणी घेतली नाही आणि इतर समूहगटांनी संभावना केली हे तर वेगळेच. प्रश्नाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी प्रक्रियेतील लोकही तेवढेच संवेदनशील असावे लागतात. जे की मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिसत नाही. मराठा समाजाच्या तरुणांमध्ये त्यामुळे प्रचंड आक्रोश आहे. हा आक्रोश एकाएकी निर्माण झाला नसून तो सामाजिक दूर्लक्षाची परिणती म्हणून पुढे आलेला आहे. महर्षी वि. रा. शिंदे यांच्या मते मराठ्यांची धंदे दोन, शेतकी आणि शिपाईगिरी. काळ बदलला आणि त्यासोबतच पोटासाठीचा संघर्ष तीव्र झाला.**



स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आपण शेती विकसित करत असताना शेतीवरील अतिरिक्त भार मात्र कमी करू शकलो नाहीत. एकेकाळच्या ऐश्वर्याचे साधन असलेली शेती आमच्या मागासपणाचे लक्षण ठरावी आणि त्यावर काही उपाय सापडू नये, अशा कोंडीत आजचा मराठा तरुण अडकलेला आहे. सबंध महाराष्ट्रात ज्या शेतकरी आत्महत्या झाल्या त्यांची जातनिहाय वर्गवारी केली तर सर्वाधिक आत्महत्या मराठा कुटुंबातील दिसून येतात. शेतीचे एक विलक्षण गणित असते.
जे अलीकडच्या काळात मराठा तरुणांच्या लक्षात येऊ लागले आहे. शेती तुम्हाला मरू देत नाही, पण सुखाने जगूही देत नाही. वाढता उत्पादन खर्च, दुष्काळ, बी-बियाणे, कीटकनाशके, खते यांचा वाढता खर्च, सततचे भारनियमन, शेतीमालास भाव नसणे, पेरणीला काढलेले कर्ज सुगीवरही फेडता येऊ नये अशी परिस्थिती, जुने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा नवे कर्ज, आजारपण, शिक्षणाचा वाढता खर्च, त्यातून येणारी निराशा आणि उद्वेग या सर्वांची गोळाबेरीज म्हणजे आरक्षणाची केलेली मागणी. महाराष्ट्रातील कथित विचारवंत आरक्षण हे काही पैसे कमावण्याचे, गरिबी निर्मूलनाचे साधन नाही अशी मांडणी करतात, परंतु त्यावेळेस आरक्षणामुळे परिस्थितीत सुधारणा झाली आणि होऊ शकते हे मात्र जाणीवपूर्वक बोलायचे टाळतात. आजचा मराठा तरुण हे सर्व बरकाव्यानिशी टिपतो आहे आणि त्याच्या लक्षात आलेले आहे की, ज्या समूहगटाला आरक्षण मिळाले, त्यांच्या परिस्थितीत इतर कोणतेही उत्पादनाचे साधन नसताना सुधारणा झाली आणि आपण मात्र दिवसेंदिवस मागे पडत आहोत. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ज्या समूहगटांनी कधी आरक्षणाची मागणी केली नाही, ज्यांचे कधी प्रचंड मोर्चे निघाले नाहीत, अशांना देखील आरक्षणाचा लाभ शासन देत असेल आणि त्याबद्दल मराठ्यांच्या मनात काडीचीही असूया नसेल तर मराठा समाज जेव्हा आपल्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरतो तेव्हा तेवढ्याच औदार्याने त्याचे म्हणणे ऐकून घावे ही समाज म्हणून त्याची अपेक्षा रास्त आहे. ज्या शेतकीच्या धंद्यात हजारो वर्षांपासून मराठा समाज आहे त्या शेतीची सद्या काय अवस्था आहे, हे अनेक अभ्यासगटांनी दाखवून दिले आहे. शेती म्हणजे धरलं तर चावते आणि सोडलं तर पळते अशी आहे. त्यामुळे धड धरताही येत



## क्षितिजापल्याड

नाही आणि सोडताही येत नाही. आपल्याकडे समाजशास्त्रीय अध्ययने फार कमी होतात. आज कोणत्याही गावात जाऊन साधे अवलोकन केले तरी लग्नाचे वय झालेली तरुण मंडळी किमान प्रमाणाच्या बाहेर आहेत. शेतीच्या तुकडेकरणामुळे शेती नाही. असली तरी अल्पभूधारक पद्धतीची. शिकून सवरून नोकरी नाही. काही व्यवसाय करावा म्हटले तर भांडवल नाही. आपल्यापेक्षा कमी गुणाने उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आरक्षणामुळे नोकरीस लागला आणि केवळ मराठा म्हणून आपण मागे पडलो, ही भावना वाढीस लागली आहे. नोकरीचे समाजात प्रमाण वाढले असते आणि काम करण्याची क्षमता व इच्छा असलेल्या हातास काम मिळाले असते तर हे कोणतेच प्रश्न निर्माण झाले नसते. सामाजिक न्यायाचे तत्त्व राबवत असताना विशिष्ट वर्ग, जात, जमात आणि समूह यांना गृहीत न धरता आर्थिक स्तर गृहीत धरला पाहिजे. सामाजिक न्यायातील पक्षपातीपणा उद्रेकास संधी देत असतो. अनेक वर्षांपासून मराठा समाजात खदखद आहे. ती कोणाच्या विरोधात नाही तर आपल्या उत्थानासाठी आहे. मराठा समाजावर केवळ टीका करून आणि प्रतिमोर्चे काढून हा प्रश्न मिटणार नाही. अशाने आणखी वातावरण चिघळण्याचीच शक्यता नाकारता येणार नाही.

अगदी काका कालेलकरांच्या पहिल्या मागासवर्ग आयोगापासून आरक्षण जात हा घटक गृहीत धरून द्यावे की आर्थिक निकष लावावेत यावर खल होत आला आहे. भारतीय वास्तव हे जातवास्तव आहे हे सर्वमान्य होऊन जातींना प्रवर्गात समाविष्ट करणे आणि आरक्षणाचा लाभ देणे होत आले. त्यावेळेस कोणत्याही मराठा नेत्याने अथवा सामान्य माणसाने त्यास विरोध केला हे ऐकिवात नाही, परंतु आज मराठा समाजाची अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना आणि दुसरा काही मार्ग सापडत नसताना समाज म्हणून तो काही मागणी करत असेल तर त्याकडे इतर समाजांनी द्वेषाने पाहणे आणि शासनाने त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे बरोबर नाही. १९५५ साली इतर मागासवर्गीय प्रवर्गात २३९९ जाती होत्या त्या १९८० पर्यंत ३७४३ झाल्या. या वाढीव जातींनी किती मोर्चे काढले होते आणि त्यांच्या अशा समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेस कोणी विरोध केला का? मग आज मराठा समाज आपल्या परिस्थितीत सुधारणा व्हावी आणि जगणे किमान पातळीवर यावे यासाठी संघर्ष करत असेल तर एक समाज म्हणून आपण त्याकडे सहानुभूतीने आणि गांभीर्याने पाहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत किमान पस्तीस ते चाळीस टक्के असलेला हा समाज आपल्या अस्तित्वासाठी झगडतो आहे. राज्याच्या राजकारणात मराठा वर्चस्व पूर्वीपासूनच राहिले आहे तर मग त्यांना आरक्षण कशासाठी असाही सूर विरोधकांकडून निघतो. परंतु ज्या इतर समाजातील नेत्यांनी आपापल्या समाजाचे प्रामाणिकपणे भले करण्याचा कसोशीने प्रयत्न केला त्याच्या शतांश टक्के जरी प्रयत्न मराठा राजकारण्यांनी केला असता तर ही वेळ मराठ्यांवर आली नसती, हे वास्तव आहे. मोठ्याने मोठेपणानेच वागले पाहिजे, हा संस्कार घेऊन हा समाज राजकारण करत असताना मोठ्यावर जेव्हा वेळ आली तेव्हा मात्र सर्वांनी त्यालाच दूषणे देण्यास सुरुवात केली. नव्हे तो कसा अत्याचारी आणि आपमतलबी आहे हे म्हणण्यापर्यंत मजल गेली. आजमितीला महाराष्ट्रात मराठ्यांच्या बद्दल अकारण एक द्वेष पेरल्या जातो आहे. हे थांबले पाहिजे. शासनाने यातून मार्ग काढून मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळवून देऊन समाजातील तरुणांमध्ये सकारात्मकता निर्माण करावी आणि राज्यातील वातावरण शांत कसे राहील याची तजवीज करावी म्हणजे मिळाले.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# नात्यालाही वय असते

आधुनिक केसरी

**प्रत्येक माणसाचे एक वय असते, ठरलेले आयुष्य असते. आपले श्वास नियंत्रित करणारा नियंता वर बसलेला आहे. आपल्या आयुष्याच्या दोऱ्या त्याच्या हातात. पण आपल्या सारखेच आपण ज्यात गुंततो, गुर्फटतो, बांधले जातो, त्या सर्व नात्याना देखील वय असते.कुठलेही नसते अमर पट्टा घेऊन आले नसते. खरे तर आयुष्य म्हणजेच वेग वेगळ्या नात्याची गुंफण. ती आपल्या जन्मा पासूनच सुरु होते. जन्माने आपल्याला आई बाप मिळतात. हे पहिले नाते.या नात्यातला ओलावा, मायेची ऊब, जिव्हाळा याबाबत नको तितके स्तोम माजवले गेले आहे. सगळ्याच पोरांना श्यामची आई मिळत नाही. किंवा रवींद्रनाथ टागोर यांच्या काबुलीवाला सारखा बाप मिळत नाही.**

पुस्तकातले, कवितेतले आई बाप अन् प्रत्यक्षातले आई बाप यात जमीन आस्मान चा फरक असू शकतो. यातही स्वार्थ असतो.चार बहीण भावात आई बाप दूजाभाव करतात. जो अशक्त, दुबळा, शेंडे फळ त्याला झुकते माप मिळते. थोरल्या च्या पाठीवर अपेक्षांचे ओझे लादले जाते. तो जरा बरा कमावता निघाला की त्याला पैशाचे झाड समजले जाते.ही आपली चालत आलेली परंपरा आहे. त्यात कुणाला दोष द्यायचा नाहीय.
आजकाल मुलाचे आईवडीला शी चे नाते व्यवहारी झाले आहे. केव्हा कधी त्याला तडा जाईल सांगता येत नाही. गैर समज ठरलेले. आपले बोलणे वागणे कोण कसे स्वीकारेल, नाकारेल, काही सांगता येत नाही. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग मध्ये दोन प्रकारचे रिस्पॉन्स असतात.एक न्याचरल अन् दुसरा फोर्सड. पहिला नैसर्गिक.. म्हणजे आपल्या स्वभावाचा, मूळ व्यक्तीमत्वाचा. दुसरा इतरांच्या बळजबरीचा. आपल्यावर बाहेरून लादला गेलेला. आपले एकूण वागणे या दोन्हींचे मिश्रण असते. म्हंजे आपण जे बोलतो, जसे वागतो, ते आपल्याशी कोण कसे बोलले, वागले,त्यावरची प्रतिक्रिया असते.
वय वाढले की मित्र, मैत्रिणी, सहकारी, शेजारी अशी नात्याची माळ वाढत जाते. यातली देवघेव ही क्रीडा खेळा सारखी. हेवे दावे, ईर्ष्या, स्पर्धा, यावर या नात्याचे वय अवलंबून असते. सगळे कच्चा मडक्या सारखे. साधा धक्का देखील पुरेसा मडके फुटायला. जीवा भावाची मैत्री, लंगोटीयार, एक दुजेके लिये, हे सारे तद्दन फिल्मी. अर्थात या प्रत्येक नाते संबंधात अपवाद असतातच. ज्यात नाते टिकवून ठेवण्याची जिद्द असते. धडपड असते. तडजोडीची दोन्ही पक्षी तयारी असते. समजूतदारपणा असतो.विवेक असतो. कुणी एक पडती बाजू घेतो.. कमीपणा वाटून न घेता एक पाऊल मागे घेतो. नात्याचे वय अशा दुतर्फा शहाणपणा वर अवलंबून असते. संसार सुरू झाला की पती पत्नी चे नवे नाते जन्माला येते. हे नाते अग्नी भोवती फेऱ्या, आणा शपथा, साता जन्माची सोबत, अशा संकल्पना तून जन्माला येते. हा प्रेम विवाह असो की पत्रिका पाहून, बैठका घेऊन, चर्चा करून झालेला विवाह असो.. यातले टिकणे, हीक दुसऱ्याला कोण किती टोलरेट करतो, सहन करतो, यावर अवलंबून असते. या नात्यातली गुंफण विश्वास, सामंजस्य, तुमच्या प्रेमाचा खरेपणा यावर अवलंबून असते. हे नाते अतिशय नाजूक असते. या नात्यावर प्रहार करायला तर अवती भवती कौरव सेनाच उभी असते. आग लावायला मुलाचे, किंवा मुलीचे आईबाप टपलेले. त्यापैकी एक मवाळ असेल तर दुसरे आगीत तेल टाकायला सज्ज! नसते गैरसमज, इगो, पैशाचा माज, संपत्तीचा लोभ, स्पर्धा, मान अपमान असे कुठलेही कारण या नात्याला तडा जायला पुरेसे असते. हे युद्ध सावरायला, संपवायला कुणी कृष्ण येईल याची खात्री नसते. एकदा तडा गेलेले काच पात्र पुनः पूर्वी सारखे एकसंघ जुळत नाही.जखमा तशाच राहतात. मग मोठी होत जाणारी आपलीच पोटची मुलं, त्यांचे भविष्य, दिल्या घेतलेल्या आणाभाका साऱ्याचा विसर पडतो.मेरे मुर्गीकी एकही टांग ही हटवादी वृत्ती दोघांचाही ताबा घेते.कोण चुकले, काय चुकले याचा विचार करायला वेळ नसतो. त्याची आवश्यकताच वाटत नाही. फॅशन म्हणून तसेही मंगळसूत्र बंधन नसतेच गळ्यात! मग ते तोडून टाकण्याचा प्रश्नच नसतो. घटस्फोट नावाच्या एका कागदी शस्त्राने या नात्याचे क्षणात तुकडे होतात आजकाल.कुणीही समोर येत नाही हे नाते वाचवायला. पूर्वी प्रयत्न तरी व्हायचे नाते टिकविण्याचे. आता कुणाला तशी गरज वाटत नाही.मध्ये पडावे, उसवलेले शिवावे,जोडावे असे वाटत नाही.कारण प्रत्येक जण आपापल्या नात्यातले ठिगळ चिकटवण्यात व्यस्त आहे. घरातच सावला गोंधळ असेल तर विकतचे श्राद्ध का घ्यायचे उगाच? सगळे नाते व्यवहारी.. कामापुरते.. पती पत्नीच्या नात्याचा बहर कधी कसा ओसरेल सांगता येत नाही. सगळा हिशेबी कारभार.. व्यापार.. कधी या नात्याचे दिवाळे निघेल, सांगता यायचे नाही. वरवर दीर्घायू दिसत असले तरी या नात्यातली आतली ठिगळं, लक्तरं बाहेर दिसत नाहीत. दाखवली जात नाहीत.कारण तोडताना काही वाटत नाही. लपवायची लाज वाटते!आता तर लिव्ह इन् रिलेशनचा जमाना आलाय.इथे कसलेही बंधन नाही. आणा शपथा नाहीत. कमिटमेंट नाही. गुंतवणूक नाही. सारा कोरडा व्यवहार. सारेच अल्पजीवी. तात्पुरती गरज भागविण्यासाठी केलेली तडजोड.. कागदी व्यवहार..
नात्यातली भावनेची ओल संपत चालली आहे. म्हणजे कोरडा दुष्काळ म्हणा सोप्या भाषेत! आधी दोन तीन पिढ्या पर्यंत नाती टिकून होती. सुख दुखात माणसं एकत्र येत होती. संकट काळात धावून येत होती मदतीला, सांत्वनाला. तो खांद्याचा आधार,तो मायेचा धीराचा स्पर्श, खूप मोठे बळ देऊन जायचा. नात्यातल्या दऱ्या वाढविण्या ऐवजी, त्या भेगा बुजविण्याकडे कल होता. आता एक घाव दोन तुकडे करण्यात अघोरी आनंद वाटतो. कशाला कुणाची पर्वा करायची, कशाला कुणाच्या भावनाचा आदर करायचा, कशाला कुणावर अवलंबून राहायाचे, ही बेपर्वा वृत्ती वाढली आहे. तू नहीं ओर सही, अशी बेदरकार वृत्ती वाढीला लागली आहे. आता कुणाचे कुणावाचून अडत नाही. कुणाला कुणाची गरज वाटत नाही. प्रत्येकाचे स्वतंत्र छोटे विश्व.. छोट्या त्रिज्येचे इवलेसे वर्तुळ. त्यातच फेऱ्या मारण्याची कुपमंडूक वृत्ती ! नाती टिकणार कशी? वाढणार कशी ? नाती फक्त आपल्या घरट्या पुरती मर्यादित नसतात. घराबाहेर नात्याचे मोठे जाळे पसरलेले असते. सिने, नाट्य कलावंत दुहेरी नाती निभावतात. एक पडद्यावर,रंग मंचावर.. अभिनायापुरते नाते. खोटे खरे आहे हे नाटक करण्याचे नाते! उत्तम अभिनय असाच असतो. इतके खोटे वागा की अगदी अस्सल खरे वाटले पाहिजे! इतके नाटकी लिहा की हे असेच जग असते असे वाटून, वाचताना डोळ्यात पाणी आले पाहिजे. बाहेर अनेक जण मुखवटे घालून खोट्याचे खरे करतात. फसवतात. आधी भावनेच्या गुंत्यात अडकवायचे. जाळ्यात शिकार फसली की असली रूप दाखवायचे. हे मित्र, हे सहकारी, हे आश्रयदाते, जे देवासारखे मुखवटे घालून येतात. विश्वासघात करून नात्याला तडा देऊन निघुन जातात. अशा नात्याचे वय मोजता देखील येत नाही. वादळ कधी कुठून येते अन् कसे निघून जाते, कसलाच पत्ता लागत नाही. नाते संपल्यावर फक्त हात चोळत बसणे आपल्या नशीबी येते.
सामाजिक नात्याचे तर विचारूच नका. या नात्याला ना बुड ना शेंडा! सगळेच डामाडोल! इथे फक्त खोटी आश्वासने, फरफट, विश्वासघात,धोके अन् फसवणूक. तरी माणसाची गर्दी जमते या नेत्या भवती.. मोर्चे, आंदोलने बघा.. दर दिवसाआड होणाऱ्या सभा बघा.. जाम गर्दी. या तरुणाई ला, बायका माणसांना काम धंदा आहे की नाही हेच समजत नाही. हातात झेंडा घेतला निघाले नारे देत. कोण कुणा बरोबर हेही कळत नाही. कुणाचे कुणाशी काय नाते, कसली निष्ठा, कसली विचारधारा, कसले तत्व, हेच कळत नाही. जनतेचे नाते आपल्याशीच घट्ट हा प्रत्येक पक्षाचा, वर्गाचा दावा.. गर्दीत कोण कुणाचा याचा गर्दीला देखील पत्ता नाही अशी दारुण परिस्थिती! ठिसूळ पायावर उभ्या असलेल्या या नात्याच्या इमारती टिकणार कशा? आता नाते कपाळा वरच्या टिकली सारखे झाले आहे. ती कपाळावर टिकत नाही. आरशाला देखील चिकटत नाही! सगळा नकली कारभार.
नाते निसर्गाने मात्र जपले. जंगलातील झाडे अजूनही हिरवीगार आहेत. तिथे कुणी पाणी द्यायला जात नाही झाडांना तरी! आंब्याची एक कोय जमिनीत लावली तरी भरपूर रसाळ फळं येतात झाडांना. धान्याचा एक कण जमिनीत रोवला तरी त्याचे हजारो लाखो दाणे होतात.झाडांना न मोजता येतील इतकी भरभरून कळ्या फुले येतात. सुगंधाने आसमंत भरून टाकतात.आपण नाती तोडतो.निसर्ग नाती जपतो.आपल्या नात्याला वय असते. निसर्गाचे नाते अमरपट्टा घालून मिरवते. नाते निस्वार्थी लळा जिव्हाळ्याने फुलते,ब हरते..



# जाळा तुम्ही माझें जाणते मी पण। येणे माझा खून मांडीयेला॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**कधीही वर्तमान मोठा सुंदर आणि आव्हानात्मक असतोच. प्रत्येकाला आपला काळ हा खडतरच वाटत असतो. तुम्हीं कोणताही लेखक आणि त्याचे चिंतन वाचा, 'त्याचा काळ मोठा खडतर होता' असेच तो सृजन लिहित असतो आणि ते बरोबरही आहे. याचे कारण म्हणजे आपला भोवताल आपल्याला सतत नवनवी आव्हाने उभी करत असतो. त्यातूनच मग एखाद्या कलाकृतीचा उदय होत असतो. त्यामुळे आपण कोण वाचतो? काय काय वाचतो? वाचलेले किती जीवनात अंगीकार करतो? त्या संदर्भाने काय काय चिंतन करतो? त्याचा वर्तमानात काय कार्यकारणभाव आहे? याचे विश्लेषण कसे करतो? आणि शेवटी यावर एखाद्या चिंतकाचे सृजनत्व कसे आहे(?) हे लक्षात येते.**

त्याच अनुषंगाने जगद्गुरू तुकोबांच्या रत्नांच्या खाणीत एक एक अनमोल हिरा सापडत आहे. त्या हिऱ्यांना पारखणारे अनेक जवाहीर होऊन गेले. तरीही नवीन पारखी त्याचे आणखी नवनवे पैलू पाडतोच आहे! असा तुकोबांचा अनमोल अभंग गाथा म्हणजे खजानाच! एखादा सृजन आपल्या विचार आणि कलाकृतीशी किती एकनिष्ठ असतो? याचे उत्तर मला सोळा आणि सतराव्या शतकातील इटलीच्या महान खगोलशास्त्रज्ञ, भौतिकी, गणितज्ञ, इंजिनिअर आणि तत्वज्ञ गॅलिलीओ गॅलिली आणि त्यांच्या जोडीने सतराव्या शतकातील महान संत तुकारामांची सहज जोड लागतांना दिसते. गॅलिलीओंना 'सूर्य पाहिलेला माणूस' म्हणून ओळखले जाते. त्यांनी लावलेला "पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी नसून सूर्य केंद्रस्थानी आहे आणि त्याच्या भोवती संपूर्ण जग फिरते" निरीक्षणासह हे शाश्वत सत्य-संशोधन मांडले. दुर्दैवाने तत्कालीन धर्ममार्तंडांना ते संशोधन मान्य झाले नाही. या संशोधनाच्या बदल्यात गॅलिलीओंना इटलीच्या चर्चने जन्मठेपेची शिक्षा दिली. संत तुकारामांचे यावेगळे ते काय झाले? त्यांनाही तत्कालीन पारंपरिक धर्म व्यवस्थेने जंग जंग पछाडले, मारले! त्यांचा गाथा पाण्यात बुडवला. तरीही तूकोबांनी कुणाकडे तिळभर तक्रार केली नाही. या उलट आत्मभान जागे करणारे अलौकिक अभंग लिहिले. एवढे होऊनही स्वतःतील विकार आणि त्यासंबंधाने चिंतन मांडणारे

**तुकारामनीती**
**भाग -64**

**जाळा तुम्ही माझें जाणते मी पण। येणे माझा खून मांडीयेला॥१॥ खादले पचे तरीच ते हित। ओकलिया थित पिंड पीडी ॥धृ॥ तरी भले भोगे जोडीले ते धन। पडिलिया खाण जीवनासी ॥२॥ तुका म्हणे मज तारी गा विठ्ठला। नेणता चि भला दास तुझा॥३॥**

असे अनमोल, सखोल, चिंतनशील अभंग लिहिले.

उपरोक्त तुकोबांचा अभंग आणि गाथ्यातील त्या अगोदरचा 'पुसावेसे हेची वाटे। जेजे भेटे तयाशी॥' हा अभंग. हे दोन्ही अभंग सोबत वाचल्यानंतर आपण काय चिंतन केले पाहिजे? त्यातून काय फलित होते? याचा विचार प्रत्येकाने करावा आणि आपले जीवन सुकर-सुखकर करून घ्यावे. तुकोबाराय इथे सरळ देवाशी संवादी होतात. इतर कुणाशीही बोलून काहीही उपयोग नाही. याचे कारण म्हणजे सर्वांना संसाराच्या व्यस्ततेत 'अवघियांचा विसर' झालेला आहे. त्यामुळेच तुकोबाराय देवालाच आपल्यामधील बदल करायला सांगतात. हे देवा, तुम्ही माझ्यातील जाणतेपण आणि मी पण जाळून टाका. हे दिन्हीही शत्रू मला सोडत नाहीत. अक्षरशः हे दोन शत्रू माझ्या विचारांचा आणि त्याच्या जोडीने माझा सुद्धा खून करायला निघाले आहेत. असे होत असेल तर एवढा विचार, एवढे भजन करून आणि अभंग लिहून माझा काय फायदा? याच्या जोडीने तुकोबाराय काही दृष्टांत देतांना लिहितात की; एखाद्याने मनसोक्त जेवण केले आणि पचले तरच ते शरीराचे पोषण करणार आहे, परंतु जेवल्याबरोबर त्याने उलटी केल्यास त्याच्या शरीराचे पोषण कसे होईल? किंवा एखाद्याने प्रचंड कष्टाने संपत्ती कमावली आणि अचानक त्याचा मृत्यु झाला. त्याला त्या कमावलेल्या धनाचा काय उपयोग? त्यामुळे तुकोबाराय शेवटी भगवान श्री पांडुरंगाला शरण जातात आणि म्हणतात, 'हे माय-बापा! मी जाणता नसून नेणता आहे. मला या सगळ्या मायाजालातून तारुण तुझ्या चरणावर जागा द्या!'

तुकोबांचा गाथा आणि त्यातील असे एकएक अभंग घेऊन जर आपण त्यावर सखोल चिंतन केले, तर सर्वकाळ माणसासमोरचे प्रश्न सारखेच असतात आणि त्या अनुषंगाने चिंतनही तसेच होणे अपेक्षित आहे हे लक्षात येते. प्रत्येक ज्ञानी माणसाला इथे जाणते पण आणि मी पण सोडायला तयार नाही. या दोघांनी आपल्या सर्वांच्याच जीवनात अक्षरशः उच्छाद मांडला आहे. जाणते पण आणि मी पणा म्हणजेच अहंकार! तो किती भयंकर आहे? याची प्रतीती आपल्याला श्रीमद् भगवतगीतेतील खालील श्लोकातून येते. श्रीकृष्ण अर्जुनाला उपदेश करतांना सांगतात,

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च । इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥५॥**

अहंकार हा महाभयंकर राक्षस आहे. प्रत्येकाच्या पाठीवर तो आरूढ झालेला असून मन, बुद्धी आणि उर्वरित सर्व दहा इंद्रियांना त्याने करकच्चून विळखा घातला आहे. याच अनुषंगाने माउलींच्या ज्ञानेश्वरीच्या १३ अध्यातील खालील ओव्या अहंकार किती भयंकर आहे( ?) याचे चित्र स्पष्ट करतात.

**तैसी पांचांही गांठीं पडे । जैं देहाकारु उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकारु गा ॥८१॥**

**नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥८२॥**

पंच ज्ञानेंदिये आणि पंच कर्मेंद्रिये यांना अहंकाराचा विळखा आहे. त्यांना तो आपल्या तालावर थयथय नाचवतो आहे. त्यामुळे देह त्याचा कधी गुलाम झाला आहे( ?) हे माहिती सुद्धा होत नाही. दुसऱ्या ओवीत माऊली आणखी एक नवल सांगतात. हा अहंकार किंवा मी पणा किती भयंकर आहे? याचे उत्तर देतांना माऊली म्हणतात, तो अज्ञानी माणसाला काहीच करत नाही, मात्र सज्ञान म्हणजेच ज्ञानी माणसाला सोडत नाही. यामुळे ज्ञानी माणसासमोर अक्षरशः अनंत संकटांचा पहाड उभा राहतो. विशेषतः ज्ञानी माणसाला अहंकार मुक्त जीवन जगणे किती अवघड आणि आवश्यक सुद्धा आहे? हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यासाठी तुकोबांनी आज निवडलेल्या अभंगात सुरुवातीलाच प्रार्थना केली आहे. याच अनुषंगाने तुकोबाराय 'अहंकार गेला। तुका म्हणे देव झाला॥' लिहून माणसाच्या दिव्यत्वाचा मार्ग सोपा आणि खुला करतात. माणसाचा देव व्हायचा सोप्पा मार्ग म्हणजे प्रत्येकाचे मी पण जाणे होय!



सांप्रतकाळी माणसांसमोर अनेक संकटे माणसानेच उभी केली आहेत. अहंकारामुळे माणसामाणसांतील संवाद खुंटला आहे. बरीच माणसे सोबत राहून अनेक दिवस एकमेकांना बोलत नाहीत. पती-पत्नी, भाऊ-भाऊ, बहिण-भाऊ, वडील-मुलगा, मुलगी-आई यांच्यातील संवाद खुंटला आहे. प्रत्येकाच्या मनात एकमेकांविषयी अनेक प्रश्न आणि किल्मिषे ठासून भरली आहेत. माणसाने स्वतःला मनाने ब्लॉक करून घेतले आहे. मनाने ब्लॉक झालेल्या माणसाच्या हृदयाचे ब्लॉकेज वाढले आहेत. म्हणजे आपला हा एक ब्लॉक, एक पाऊल मृत्यूकडे घेऊन जात आहे. त्यासाठी आपल्याला यावर खोलवर काम करावे लागेल. माणसामाणसातील संवाद पुन्हा सुरु करावा लागेल. त्यासाठी अहंकार त्यागावा लागेल. प्रत्येक जण 'मीच का बोलू?' असा प्रश्न स्वतःला करून काय साध्य करणार आहे? आज माणसे एकटी एकटी वाटत आहेत. आभासी पटलावर वाढलेला संवाद प्रत्यक्ष जीवनात खुंटला आहे. याचा परिणाम म्हणजे विनाकारण ताणतणाव आणि त्यातून अशांतता! त्यातून शुगर सारखा महाभयंकर रोग आपल्या सर्वांनाच विळखा घालतो आहे. त्यासाठी आपण सर्वांनी वेळेवर सावध व्हायची वेळ आली आहे. आपल्या अहंकारापेक्षा आपले जीवन असणे जास्त गरजेचे आहे. त्यासाठी संवाद वाढणे गरजेचे आहे. असे झाले तरच येणारा काळ आनंदाने व्यतीत होणार आहे. तुकोबांना त्यावेळी सतावत असलेला अहंकार, मी पणा आज सुद्धा तुम्हा-आम्हाला तेवढाच त्रासदायक ठरतो आहे. त्यासाठी आपण सर्वच मिळून संवाद वाढवूया! असे झाल्यास खऱ्या अर्थाने जगद्गुरू तूकोबांनी लिहिलेल्या अभंगांचे सार्थक होईल. त्याच्या जोडीने मी लिहित असलेले तुकाराम नीती हे सदर फलित झाल्याशिवाय राहणार नाही. जय तुकोबाराय!

# परतफेड



भाग्यश्री लाठकर
संपर्क क्र. 96731 06653

आधुनिक केसरी

**एरवी इतकं कॅलक्यूलेटेड वागणारी अनुष्का आज मात्र जराशी हलली होती. कारण तिच्याच घरात राहून गेलेल्या, हक्काने सर्व कामे करून घेऊन प्रेमानं, नव्या शहरात तिच्या बहिणीला दिलेला आधार होता. पण त्याची यत्किंचितही जाणीव तिने ठेवली नव्हती आणि चोरीचा आरोप केला होता. आपली बहीण शिक्षणासाठी नवीन शहरात आल्यावर तिने तिला राहण्या, वागण्याच्या पद्धती शिकवल्या होत्या. तीची कॉलेज मधील प्रवेश प्रक्रिया, गणवेश, शूज अन् जे काही शिक्षणासाठी लागत होतं ते एक पालक म्हणून केलं होतं. पण आज तिने इतक्या वर्षाच्या नात्याची विण तोडून टाकली होती. इवलीशी मिनी रिना मावशी सोबत खेळत होती.**



मावशीही लहान होऊन तिच्या सोबत खेळत होती. आधी काही दिवस रिना अनुष्काकडेच राहत होती. पण नंतर ती हॉस्टेलवर राहायला गेली. तरी पण ती मिनीशी खेळायला येत असे. मिनीला मावशीचा खूप लळा लागला होता. मावशी आली की मिनी खुश व्हायची. रिनाही येताना काही न काही तरी तिच्यासाठी आणत असे. कधी खेळणी तर कधी खाऊ मिनी खुश व्हायची. आल्यानंतर रिना आपल्या ताईला कॉलेजचा वृत्तान्त सांगत असे. काय घडले ? कोण काय म्हणाले ? सारं मन मोकळं करत असे. कधी तिला रात्री हॉस्टेल वर भीती वाटली की ती फोन करत असे. म्हणत असे ' ताई मला भीती वाटते ग मला घ्यायला ये. वेळ कोणतीही असो. एकदा तर तिच्या हॉस्टेलवरच्या सगळ्या मैत्रिणी निघून गेल्या. अन् रात्री तिला वेगवेगळे आवाज येत होते असं ती सांगत होती. घाबरली होती. तिने १२ वाजता फोन केला ताई मला भीती वाटते आहे तू मला घ्यायला ये नाहीतर भाऊजीना पाठव. अनुष्का ही लगेच जाऊन तिला घेऊन यायची. किती तरी वेळा अस घडत होत. त्यामुळे मिनीला ही मावशीची ओढ वाटत होती. घट्ट मैत्रीचं झाली होती. किती तरी वेळा सर्वांची जेवणं झाल्यावर ती यायची ताई मला भूक लागली ग कर काही तरी. अनुष्का ही आपल्या लहान बहिणीसाठी करायची परत. मग दोघीही गप्पा मारत बसत व मिनीशी खेळत असायचं. असच चालायचं नेहमी. कॉलेज मधील वार्षिक स्नेहसंमेलनात तिला तयार होऊन जायचं होत. मग साडी कोणती घालावी. यावर चर्चा असे. मग अनुष्का तिला म्हणाली 'अग घे ग कोणतीही साडी कपाटातली उघड कपाट अन् आवडली ती घे.' मग अनुष्का तिला तयार करत असे. तिला अनुष्काच्या चारोळ्या वाचन करायचं होत. त्याही अनुष्काने दिल्या. अन् त्यात तिने काव्य वाचनही केले. नंबरही आला. खूप कौतुक झालं तीचं. अन् एक दिवस रिनाचं शिक्षण संपल. त्यानंतर तीचा दाखवण्याचा कार्यक्रम झाला. त्यात मिनी मात्र मध्ये मध्ये करत होती दोघांनाही बोलू देत नव्हती. माझी मावशी मी तुम्हाला देणार नाही म्हणत होती. नंतर रिनाच लग्न झालं. अन् ती परदेशात गेली. खूप छान राहत होती तिथे. मिनीला खूप आठवण येत होती. ती तिला फोनवर बोलत असे, कधी कधी. एक दिवस रिना भारतात परत येणार कळल्यावार मिनी नाचायलाच लागली. मिनीला खूप आनंद झाला. रिना आली मिनी तीच्या गळ्यातच पडली. तिने मिनीसाठी पर्स आणली. खूप खुष झाली मिनी. रिनाने भारतात घर घेतले होते. त्याच्या वास्तुशांती साठी ती येणार होती. तिचे सासू सासरे भारतात राहत होते. वास्तुशांती साठी अनुष्का, मिनी, मिनीचे बाबा असे सर्व जण गेले. अनुष्का अन् मिनी आणि बाकी सर्व जण एका हॉलमध्ये बसले होते. जेवायाला वेळ होता म्हणून. मिनी खेळत होती. खेळताना तिला तेथील सोफ्या खाली एक मोबाईल दिसला. तिने तो उचलला. अन् आईला म्हणाली आई हा मोबाईल रिना मावशीचा आहे न. आपण तिची गम्मत करू या का ? अस म्हणत तीने तो मोबाईल पर्समध्ये टाकला. आई नको म्हणत असताना तिने एक गम्मत म्हणू टाकला. जेवणं झाली अनुष्का घरी आली पण मोबाईल पर्स मध्येच विसरला. आल्यावर तिने रिनाच्या नवऱ्याला फोन केला पण फोन लागतं नव्हता. सकाळी तिने फोन लावला. रिनाला खूप राग आला होता. ती ताईलाच खूप बोलली. तरी अनुष्काने सगळा वृत्तांत सांगितला तरी पण तिचा विश्वास बसत नव्हता. तिने मोबाईल चोरीचा आळ घातला होता. अनुष्काच्या अंगातलं बळच गेलं. तिला काहीच सुचेना, नंतर तिने मोबाईल परत पाठवला. पण रिनाचे शब्द तिला घायाळ करत होते. तिने चोरच ठरवले होते. लहान मुलांनी अनाहुतपणे केलेली एखादी गोष्ट त्याला किती भयानक रूप दिलं गेलं होतं. समजूनही घेतलं गेलं नव्हत. परदेशात गेल्याचा अहंकार किती मोठा होता. तिथं नाती गोती विसर पडतो. माणसांनी जमिनीवर राहायला पाहिजे. कुठे गेलोत तरी आपण आपली जोपासलेली नाती एका क्षणात तोडून टाकुन ती मोकळी झाली होती. यात चूक अनुष्काची नव्हती तरी चोरीचा आरोप तिच्यावर आला. माणसाच्या माणुसकीचा विसर कसा पडतो हेच कळत नाही. अनुष्का विचाराच्या तंद्रीतच होती. तिला वाटले आपण कधीच तिला आपल्या कपाट उघडून घ्यायला नको म्हणालो नाही. त्यात तर किती सोन, चांदीचे दागिने होते. पण आपण कधी असा विचार केला नाही. एका फोन वरून आपण चोर ठरले गेलो. किती जीवघेणी थट्टाच आहे. रिनाने ताईने आपल्यासाठी केलेल्या कर्तव्याची परतफेड मात्र चांगलीच केली होती.

# लढले हक्कासाठी तर मिळेल लाठी...



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारताचा इतिहास हा लोभी स्वार्थी व नितीहीन लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून माणसा माणसात भेद करून विषमता व जातीवाद वाढवून, त्यांना कोणतेही हक्क अधिकार न देता केवळ अंधविश्वास व धर्माच्या नावाखाली गुलाम बनवून पाखंडाच्या माध्यमातून अनेक धुर्त लोकांनी भारतीय लोकांचे आर्थिक, मानसिक शोषण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. स्वतःला च श्रेष्ठ समजून इतरांना कनिष्ठ समजणाऱ्यांची किती घान मानसिकता असेल हे लक्षात येते. इतरांना दुय्यम समजणारी माणसिकता नैतिक दृष्टीने व न्यायीक दृष्टीने कधीच न्यायीक नसते. अन्याय अत्याचार, दिशाभूल करून, अज्ञान, अंधविश्वास यांच्या माध्यमातून लोकांना कमकुवत करण्यात ज्यांना सामर्थ्य वाटते तेच खरे भ्याड लोक असतात.**

बहुसंख्य ताकदवान लोक धर्म, अंधविश्वास व पाखंड यांच्या यामुळे माणसिक गुलाम झाले म्हणून भ्याड लोक आजही गुलामांचे सरदार आहेत हिच बाब लोकांना कळत नाही. ज्यांना हि बाब कळाली, म्हणुन जे लोक अंधविश्वास, पाखंड, विषमता, भोंदुगीरी नितीहीन लोकांचे वर्चस्व लाथाडून समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर बोलताना त्या लोकांना पुरोगामी म्हणून हिनवले जाते. आणि हेच हिनवणे हिणवणारा किती माणसिक गुलाम असून तो विषमता वादी पिळावळीची किती लाचारी करतो हे सिद्ध होते. शिक्षण नाही, नोकरी नाही, विकासाच्या व समतेच्या संधी नाहीत, केवळ भोंदु आणि पाखंडी लोकांनी सांगितले तेच अंतिम सत्य माणुन जगायाचे अशा खितपत पडलेल्या माणवाच्या जिवनाला फुलें शाहु आंबेडकर यांनी सोन्याचे रुप दिले परंतु आजही विषमता, भोंदुगीरी पांखड, फसवेगिरी, अंधविश्वास च्या माध्यमातून मिळालेली गुलामीच चांगली वाटते पण शिक्षण, आरक्षण, समान संधी समता, बंधुतेच्या माध्यमातून दिलेले माणसिक व शारिरीक स्वातंत्र्य आणि हक्क अधिकार देणारे महापुरुष पचत नाहीत याचे कारणच आहे ते म्हणजे माणसिक गुलामी. जोपर्यंत व्यक्तीला फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळणार नाही तो पर्यंत प्रत्येक जण गुलाम म्हणुनच जिवन जगेल. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले ते लोक स्वाभिमानी व समतावादी बनुन अन्याय अत्याचारा विरोधात ठाम पणे उभे राहून आदर्श राष्ट्राची संकल्पना मांडतात. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले नाही ते मात्र विषमता, अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी, धर्माच्या माध्यमातून आजही गुलामच आहेत. आणि गुलाम मालका सोबत प्रामाणिक असतात म्हणून ते कधीच बंड वा आंदोलन करत नसतात. तर मालकाने सांगितलेले काम चोक करत असतात. प्रत्येक वेळी ही पार्श्वभूमी सांगणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पार्श्वभूमीच कळाली नाही तर सद्य परिस्थिती कळणार नाही. हजारो वर्षापासून अज्ञान, हक्क, अधिकार, शिक्षण व विकासासाच्या संधी का नाकारल्या गेल्या याचे उत्तर शोधले आणि समजून घेतले तर धुर्त लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून लोकांना ह्या गोष्टी नाकारण्यात आल्या. फुले शाहु आंबेडकर चळवळीचे संरक्षीत व प्रभावी स्वरूप म्हणजे भारतीय राज्यघटना. हजारो वर्षांपासूनची गुलामी, अज्ञान, विषमता, एकाच झटक्यात नेस्तनाबूत करून स्वातंत्र्य, शिक्षण, समता, हक्क अधिकार व सर्वांना समान संधी निर्माण करून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या धुर्त लोकांच्या हीताची विषमता वादी शोषणवादी व्यवस्था उलथून पाडली. हिच बाब आजही जिवंत असलेल्या धुर्त व नितीहीन लोकांना खटकत आहेत. आजही त्यांना भारतीय संविधान व संविधानाच्या माध्यमातून लोकांचा झालेला सर्वांगीण विकास व स्वाभिमान आणि हक्क अधिकाराप्रती जागृत झालेले लोक सहन होत नाहीत. याचे अनेक उदाहरणे आहेत. परंतु अनेक जन आजही गुलामीचा चष्मा उतरवायला तयार नाहीत. म्हणून आजही धुर्त लोक त्यांचा अजेंडा पुर्ण करताना दिसुन येतात. स्वार्थी आणि पाखंडी लोकांना आपणलेच वर्चस्व कायम असावे व इतरांनी गुलामी करावी एवढेच वाटते म्हणून गुलामांना मालका प्रमाणे राहता येत नाही गुलाम आणि मालक यांच्या मध्ये फरक असतो. आणि हाच फरक दुर करून संविधानाचे सर्वांनाच मालक केले हिच बाब दुर्तांना सहन होत नाही म्हणून त्यांच्या कुरापती सुरू असतात. सत्य बोलणारा, लोकांना जागृत करणारा, हक्क अधिकार मागणारा यांच्या वर कारवाई केली जाते लाठीचार्ज केला जातो. केंद्रात व राज्यात हिंदुत्ववादी सरकार आहे. धर्माच्या नावाचा वापर मत मागताना किंवा राजकारण करताना करता येत नाही असे सर्वोच्च न्यायालयचे जजमेंट असताना ही धर्माच्या नावाचा वापर केला जातो. जे लोक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाहीत ते लोक सर्वसामान्य लोकांचे भले करतील हे बैलासमोर दुधाची बाटली घेऊन दुध देण्याची अपेक्षा करण्या सारखेच आहे. हिंदुचे सरकार हिंदुच्या हिताचे काम करण्यासाठी तयार केले केले. परंतु हिंदू कोणाला म्हणायचे हे अजूनही कोणालाच कळाले नाही आणि एक सरळ सरळ नियम असतो. राजा आपल्याच प्रजेवर कधीच अन्याय अत्याचार करत नसतो. सांगण्याचा उद्देश हा आहे की हिंदुत्वाच्या नावाखाली सरकार तयार झाले आणि वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला. जे वारकरी समता बंधुता नांदावी भेदभाव नष्ट होऊन संताच्या विचारावर आधारित व्यवस्था निर्माण व्हावी त्या वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला जातो आणि सरकार प्रकरण दाबुन टाकते. याचाच अर्थ वारकरी हिंदु नाहीत. कारण सरकार हिंदुचे आहे आणि हिंदू च हिंदुवर लाठीचार्ज करूच शकणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट जी जालना येथे घडली संविधानीक मार्गाने हक्क अधिकार माघण्यासाठी मराठा समाज रस्त्यावर उतरला त्यांच्या मागण्या मान्य न करता त्यांच्या वर लाठीचार्ज करून सरकारने हे दाखवून दिले की सरकार ज्या हिंदुसाठी बनले त्यामध्ये मराठा समाज येतच नाही. जर मराठा समाज हिंदु असता तर हिंदुच्या सरकारने हिंदुवर लाठीचार्ज का केला असता. बर दुसरी बाब बघा जनतेला किती मुर्ख बनवले जाते. ज्यावेळी आताचे गृहमंत्री विरोधी पक्षात होते तेंव्हा ते सांगत होते आमचे सरकार आले तर आम्ही मराठा आरक्षण देऊ. जे कँमेऱ्या समोर सांगायचे मराठा आरक्षण देता येते पण आम्ही सत्ते मध्ये पाहिजे. आता ते सत्तेमध्ये आहेत आणि मराठा आरक्षणाची मागणी होत असताना आंदोलकांवर लाठीचार्ज करून आंदोलन दडपून टाकले जाते. याचा अर्थ सरकार हे मराठा समाजाच्या हिताचे नाही. हिंदु व हिंदुत्वाशी अनेक लोक भावनिक आहेत. हिंदु धर्माच्या चुकिच्या बाबींवर कोणी सत्य बोलले तर धर्म धोक्यात येतो म्हणणारे, हिंदु धर्मासाठी काही ही करतो म्हणणारे, हिंदू बद्दल एकही शब्द ऐकुन घेणार नाही अशी धमकी देणारे, स्वतः ला हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी समजणारे लोक वारकरी व मराठा बांधवांवर लाठीचार्ज होतो तेव्हा एकही शब्द बोलत नाहीत. तेव्हा समजून घ्यायला पाहिजे कि सत्तेतील हिंदु हे वेगळ्या लोकांसाठी आहे आणि सर्वसामान्य लोकांचे हिंदुत्व फक्त समाजात दुफळी निर्माण करून मताची झोळी भरण्यासाठी आहे. वारकरी लाठीचार्ज, मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज या वेळी कोणत्याही हिंदु आमदार खासदार यांच्या भावना दुखल्या नाहीत कोणी ही आमच्या लोकांवर लाठीचार्ज झाला म्हणून राजीनामा दिला नाही. हि गोष्ट समजून घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत हि बाब कळणार नाही तोपर्यंत व्यवस्था कळणार नाही. मार खाणारे आणि मारणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. देणारे आणि माघणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राजा माघत नसतो तर देत असतो. काही भक्त लोकांना वाटत असेल की आमच्या जातीचे लोक आमदार खासदार आहेत म्हणून आम्हाला काही मिळेल. आमदार खासदार असणे म्हणजे सत्ता मुळीच नाही. आपल्या लोकांना काही देण्याचा अधिकार म्हणजे सत्ता असते. मराठा समाज आरक्षण माघत आहे म्हणजेच देणारे मराठा लोक नाहीत. जर मराठा लोकांना देण्याचे अधिकार असते तर आमदार खासदार भरपूर आहेत तरीही ते देऊ शकत नाहीत. याचाच अर्थ मराठा समाज हा सत्तेमध्ये नाही. हक्क माणणाऱ्याला लाठीचा मार दिला जातो व मनोहर कुलकर्णी देशाचा ध्वज, राष्ट्रगीत नाकारून महात्मा फुलेंबद्दल वादग्रस्त विधान करून गांधी यांच्या वडीलांबद्दल संशय घेऊन इतिहासाचे विद्रुपीकरण करतो तर त्याला पोलीस संरक्षण दिले जाते. कुरूलकर देशाची गुप्त माहिती पाकिस्तान या शत्रु राष्ट्राला देतो तरीही त्यांच्या वर राष्ट्रद्रोहाचा खटला भरला जात नाही.



संविधानीक मार्गाने शासकीय शिक्षण व नोकरी मध्ये आरक्षण मागीतले तर मार मिळतो. जर मराठा समाजाने हिंदुच्या मंदिरात पुजाऱ्या साठी आरक्षण मागितले तर काय होईल याचा विचार करा. आणि मंदिरात आरक्षण मागितले तर खरे कळेल नेमके हिंदुत्व व हिंदु यांचा वापर कोणासाठी होत आहे. अंधविश्वास पसरवणाऱ्या भोंदुच्या कार्यकर्माला लाखो लोक आले तर लाठीचार्ज होत नाही, देशद्रोह्यावर होत नाही. पण हक्क अधिकार मागून विकासाची संधी मागीतली तर मात्र मार बसणारच. येथे मराठा समाजाचेच नाही तर माणसाचे हक्क अधिकार धोक्यात आहेत. माणसाला व माणसाच्या हिताच्या लोकशाही ला वाचवायचे असेल तर जाती धर्माचा विचार न करता केवळ मानवहीतासाठी सर्वांनी एकत्र येऊन ईव्हीएमला विरोध करून बँलटपेपर वर निवडणुक घेण्याची मागणी यशस्वी करावी. तरच लोकशाही व लोकांचे हक्क अधिकार वाचतील व कोणावरही अन्याय अत्याचार होणार नाहीत व समता बंधुता न्याय आधारित समाज व्यवस्था कायम राहील.

# मोदींचा मास्टरस्ट्रोक : एक राष्ट्र, एक निवडणूक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने 2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी एक मास्टर स्ट्रोक खेळला आहे. वन नेशन वन इलेक्शनसाठी केंद्र सरकार पुढे सरसावले आहे. 18 ते 22 सप्टेंबर दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. एक देश, एक निवडणुकीबाबत विधेयक आणले जाऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. याबाबत सरकारने एक समितीही स्थापन केली आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना या समितीचे अध्यक्ष करण्यात आले आहे. 2018 मध्ये पहिल्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक देश, एक निवडणूक हा मुद्दा पुढे केला होता. सरकार याबाबत का पुढे सरसावत आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.**

लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचा मुद्दा अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. पंतप्रधान मोदींनीही या कल्पनेला पाठिंबा देत पुढे नेले आहे. निवडणूक आयोग, NITI आयोग, कायदा आयोग आणि संविधान पुनरावलोकन आयोगाने या मुद्द्यावर विचार केला आहे. देशात एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या मुद्द्यावर विविध राजकीय पक्ष, प्रादेशिक पक्ष आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी कायदा आयोगाने अलीकडेच तीन दिवसीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत काही राजकीय पक्षांनी या विचाराशी सहमती दर्शवली, तर बहुतांश राजकीय पक्षांनी विरोध केला. हा विचार लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या कल्पनेवर एकमत झाल्याशिवाय त्याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही, हे उघड आहे.

एक देश एक निवडणूक यासंदर्भात केंद्र सरकार अनेक दिवसांपासून प्रयत्न करत आहे. यामागेही एक कारण आहे. खरे तर कोणत्याही जिल्ह्यात साधारणपणे चार वेळा आचारसंहिता लागू होते. लोकसभा निवडणुका, विधानसभा निवडणुका, नगरपालिका आणि पंचायत निवडणुकांच्या वेळी आचारसंहिता लागू केली जाते. आचारसंहिता लागू झाली की त्याचा थेट परिणाम विकास योजनांवर होतो. देशात सततच्या निवडणुकीच्या परिस्थितीमुळे सरकारला धोरणात्मक आणि प्रशासकीय निर्णय घेण्यात अडचणी येतात. अनेक महत्त्वाच्या कामांवर याचा परिणाम होत आहे. **कायदा काय म्हणतो?**

सरकारला या दिशेने पुढे जायचे असेल, तर त्यासाठी संसदेत घटना दुरुस्ती विधेयक आणावे लागेल. त्याच्या मंजुरीनंतर या दिशेने प्रगती करता येईल. हे प्रकरण समोर येण्याची ही पहिलीच वेळ नाहीये. 1999, 2015 आणि 2018 मध्ये तीन वेळा कायदा आयोगाने यावर आपला अहवाल दिला. त्याचवेळी, यापूर्वी 2016 मध्ये संसदीय समितीनेही आपला अंतरिम अहवाल दिला आहे. 2018 मध्ये जेव्हा ही बाब समोर आली तेव्हा केंद्राने संपूर्ण प्रकरण कायदा आयोगाकडे सोपवले होते. विधी आयोगाने यावर संपूर्ण रोडमॅप तयार केला आहे.2018 मध्ये कायदा आयोगाने आपल्या अहवालात म्हटले होते की देशात विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकत्र घेण्याची गरज असल्याचे वातावरण आहे. आयोगाने आपल्या अहवालात हे मान्य केले होते की, विद्यमान नियमांनुसार एकाचवेळी निवडणुका घेणे शक्य नाही आणि त्यामुळे घटनेत काही सुधारणा आवश्यक आहेत. सरकारला त्याची अंमलबजावणी करायची असेल तर घटनेत किमान ५ दुरुस्त्या कराव्या लागतील, असे या अहवालात म्हटले होते.

**एकाचवेळी निवडणुका घेणे शक्य आहे का?**

देशात लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेणे शक्य आहे का, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. उत्तर होय आहे. यापूर्वीही अनेकदा असे घडले आहे. स्वातंत्र्यानंतर केंद्र आणि राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. यानंतर केंद्र आणि राज्यातील सरकारे पडल्यामुळे त्यांच्या निवडणुकांमध्ये फरक पडला आहे. 2024 मध्ये लोकसभा निवडणुकांसोबत विधानसभा निवडणुका झाल्या तर उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, पंजाब, गुजरात आणि गोवा या राज्यांची सरकारे फार कमी वेळात बरखास्त करावी लागतील.

**एक देश, एक निवडणूक :** सरकारसमोरील समस्या देशाच्या राजकीय व्यवस्थेबाबतही आहे. किंबहुना, केंद्रात भाजप आणि काँग्रेस या दोन प्रमुख राष्ट्रीय पक्षांमध्ये स्पर्धा असताना, राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व दिसून येते. अनेकवेळा राज्यांमध्ये त्रिशंकू विधानसभेची परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत युतीचे सरकार स्थापन होते. अशा स्थितीत सरकार पडल्यास एक देश, एक निवडणूक असा आदेश मोडीत निघेल. यापूर्वी केंद्र आणि राज्याच्या निवडणुका एकाच वेळी होत होत्या. एक देश एक निवडणूक अशी सध्या देशात चर्चा सुरू असली तरी स्वातंत्र्यानंतर देशात केंद्र आणि राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. 1952 मध्ये देशात पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या, त्यानंतर राज्यांच्या निवडणुकाही एकाच वेळी झाल्या. यानंतर 1957, 1962, 1967 मध्येही केंद्र आणि राज्य सरकारच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. 1967 मध्ये उत्तर प्रदेशात चौधरी चरणसिंग यांच्या बंडखोरीमुळे सीपी गुप्ता यांचे सरकार पडले आणि येथून एकाचवेळी निवडणुकांचे अंकगणितही बिघडले. यानंतर 1968 आणि 1969 मध्ये काही राज्यांची सरकारे मुदतीपूर्वीच विसर्जित करण्यात आली. १९७१ च्या युद्धानंतर लोकसभेच्या निवडणुकाही नियोजित वेळेपूर्वी झाल्या. त्यामुळे निवडणुकीचे गणित बिघडले. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत ओडिशात एकाचवेळी निवडणुका झाल्या. एक देश, एक निवडणूक यासाठी निवडणूक आयोगाला मोठी तयारी करावी लागणार आहे. देशात लोकसभेच्या 543 जागा आहेत. या सर्वांवर एकाच वेळी निवडणुका होतात. याशिवाय सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील 4126 जागांवर निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. समस्या अशी आहे की अनेक राज्यांमध्ये काही काळापूर्वी विधानसभा स्थापन झाल्या आहेत. पुढील वर्षी अनेक ठिकाणी निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत काही विधानसभांचा कार्यकाळ मुदतपूर्वी संपवावा लागेल तर काहींचा कार्यकाळ वाढवावा लागेल. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार 2019 च्या लोकसभा निवडणुकीत एकूण 91 कोटी मतदार होते. यावेळी त्यांची संख्या 101 कोटींपर्यंत वाढू शकते. मतदारांसाठी व्यवस्था करण्याचे मोठे आव्हान असेल.



**निवडणुकीवर किती खर्च होतो?** निवडणूक केंद्राची असो की विधानसभेची, त्याचा थेट परिणाम सरकारी तिजोरीवर होतो. लोकसभा निवडणुकीत केंद्र आणि राज्य सरकार निम्म्याने खर्च करतात. दुसरीकडे, विधानसभा निवडणुकीदरम्यान होणारा खर्च राज्ये उचलतात. अशा परिस्थितीत राज्यांना दुहेरी फटका बसतो. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्यांमध्ये एकाच वेळी निवडणुका घ्याव्यात, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. यावर जो काही खर्च होईल तो केंद्र आणि राज्याने समप्रमाणात उचलावा. सरकारी तिजोरीनुसार हे एक चांगले पाऊल मानले जाऊ शकते. सरकारी आकडेवारीनुसार, केंद्र सरकारने 2014 ते 2020 पर्यंतच्या निवडणुकांसाठी 5794 कोटी रुपये जारी केले आहेत. या कालावधीत देशात दोनदा लोकसभा आणि विविध राज्यांमध्ये 50 वेळा विधानसभा निवडणुका झाल्या आहेत. एका सर्वेक्षणानुसार 2019 च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे 60 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यापैकी सुमारे नऊ हजार कोटी रुपये सरकार आणि निवडणूक आयोगाने खर्च केले. आकडेवारीनुसार 1952 च्या निवडणुकीत 10 कोटी 45 लाख रुपये खर्च झाले होते. जर आपण आकडेवारीबद्दल बोललो, तर त्या काळात प्रति मतदार खर्च फक्त 60 पैसे होता, जो 1991 मध्ये वाढून 359 कोटी रुपये झाला आणि प्रति मतदार खर्च 7 रुपये होता. त्यानंतर 2014 मध्ये हा खर्च 3870 कोटी रुपयांवर पोहोचला आणि प्रति मतदार खर्च 46.40 रुपये झाला.

निवडणुकीत झालेला खर्च कुठे? निवडणुकीदरम्यान, ईव्हीएमपासून ते मतदार याद्या तयार करणे, मतदान पक्षांचे प्रशिक्षण, मतदान पक्षांची हालचाल, त्यांची खानपान आणि केंद्रीय दलांची नियुक्ती या सर्व गोष्टींवर निवडणूक आयोग आणि केंद्र खर्च करते. ज्यामध्ये उमेदवार आणि राजकीय पक्षांकडून प्रचारावर मोठा खर्च केला जातो. एका सर्वेक्षणानुसार, कोणत्याही निवडणुकीत होणाऱ्या एकूण खर्चापैकी १५ टक्के खर्च सरकार आणि निवडणूक आयोग, ४० टक्के उमेदवार, ३५ टक्के राजकीय पक्ष, ५ टक्के मीडिया आणि ५ टक्के खर्च करतात.

# संविधान बदलण्याची संघ व भाजपाची पुन्हा दर्पोक्ती




भीमराव सरवदे
संपर्क क्र. 9405466441

आधुनिक केसरी

**संविधान बदलण्याचा आरएसएस व भाजपचा अजेंडा काही नवीन नाही. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागारांनी नुकतीच एका वर्तमानपत्रात लेख लिहून संविधान बदलन्याची दर्पोक्ती व्यक्त केल्याबद्दल काही विरोधकांनी याविरोधात टीकेची झोड उठवली असून भाजपची मनुवादी विचारसरणी समोर आली असल्याचे म्हटले जात आहे. यावर ना आरएसएसकडून ना भाजप सरकारकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष बिबेक देबरॉय यांनी एक लेख लिहिला असून त्यात त्यांनी देशाला नवीन संविधान देण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. देबरॉय यांनी आपल्या लेखात लिहिले आहे की, आपली सध्याची राज्यघटना मुख्यत्वे १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यावर आधारित आहे.**

त्या अर्थाने हा एक वसाहतवादी वारसाही आहे. २००२ मध्ये राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाचा अहवाल आला होता; पण तो अर्धवट प्रयत्न होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष विवेक देबरॉय यांनी राज्यघटनेसंदर्भाने लिहिलेल्या लेखामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. या लेखावरून जेडीयू आणि राजदने भाजपवर हल्लाबोल केला आहे. जेडीयूचे राष्ट्रीय सचिव राजीव रंजन म्हणतात की,बिबेक देबरॉय यांनी जे म्हटले आहे त्यामुळे भाजपची घृणास्पद विचारसरणी पुन्हा समोर आली आहे. भारतातील जनता असे प्रयत्न हाणून पडल्याशिवाय राहणार नाही. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना असून बिबेक देबरॉय सत्ताधाऱ्यांची चमचेगिरी करत आहेत. बिबेक देबरॉय आर्थिक धोरणांवर आपले मत कधीच व्यक्त करू शकत नाहीत, कारण त्यातली त्यांना फारसी जाण नाही; परंतु इतर क्षेत्रांविषयी त्यांचा संबंध नसूनही असे नादानपणाचे विचार मांडत आहेत. या संदर्भात राष्ट्रीय जनता दलाचे ( आरजेडी ) नेते आणि राज्यसभेचे खासदार मनोज झा म्हणतात की, हे बिबेक देबरॉय यांच्याकडून सत्ताधाऱ्यांनी वदवून घेतलेले विचार आहेत. साचलेल्या पाण्यात दगड टाका आणि तरंग उठत असतील तर आणखी टाका आणि मग म्हणा की ही मागणी जनतेमधूनच येऊ लागली आहे. घटनात्मक मूल्य त्यांना निरपेक्ष हुकूमशाहीचा परवाना देत नाही याचे शल्य त्यांना बोचते आहे. घटनादुरुस्ती आणि संपूर्ण राज्यघटनाच बदलने यात खूप फरक आहे. मोदींच्या देशात विषमता शिगेला पोहोचली आहे. राज्यघटनेत नव्हे तर कायद्यात बदल करण्याची गरज आहे. त्यांना असा कायदा करायचा आहे, जिथे सत्ताधीशांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द हा कायदा असला पाहिजे. केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून त्यांचे मंत्री, लोकप्रतिनिधी आणि नेते वेळोवेळी अशी विचित्र वक्तव्य करत आहेत. कधी देशाच्या राजकीय व्यवस्थेबद्दल कुणी काही बोलते, कधी संविधानाबद्दल काही बोलतात, तर कधी समाजातील दुर्बल आणि अल्पसंख्याक घटकांना धमकावतात. अशा प्रकारच्या शाब्दिक अराजकावरील मौन बेजबाबदार लोकांना प्रोत्साहन देत आहे. देशात जणू हुकूमशाही सुरू आहे आणि भाजप नेत्यांना आयुष्यभर येथे राज्य करण्याचा अमरपट्टा बहाल करण्यात आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्या अनावश्यक वक्तृत्वावर कोणाचेही नियंत्रण नाही. पंतप्रधानांनी एकदा यावर टीका केली आहे, पण त्यानंतर ते अनेकदा गप्प बसले आहेत. खरे तर राज्यघटनेचा पुनर्विचार करणे हा आरएसएसचा छुपा अजेंडा आहे. हे वारंवार सिद्ध होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत एकदा म्हणालेच होते की, भारतीय समाजाच्या नैतिक मूल्यांना अनुसरून भारतीय राज्यघटनेत सुधारणा करण्यात यावी. हैदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले होते की,राज्यघटनेतील अनेक भाग परकीय विचारसरणीवर आधारित आहेत आणि ते बदलण्याची गरज आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर याकडे लक्ष द्यायला हवे. याचा अर्थच असा आहे कि राज्यघटनेचा पुनर्विचार हा संघाचा छुपा अजेंडा आहे. संघाला वाटते कि वेळोवेळी राज्यघटना बदलली जाते, त्यात अनेकवेळा सुधारणा केल्या जातात; परंतु प्रश्न असा आहे की संघ कोणत्या प्रकारच्या बदलांबद्दल बोलत आहे, त्यांना धर्मनिरपेक्ष संविधान रद्द करून हिंदुराष्ट्र निर्माण करायचे आहे. त्यांच्या या मनसुब्याला घटनेनुसार अजिबातच परवानगी नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये म्हटले आहे की धर्मनिरपेक्षता हा भारतीय राज्यघटनेचा मूलभूत आधार आहे आणि तो बदलता येणार नाही. त्यांच्याकडे दोन तृतीयांश बहुमत असले तरी मूळ आधार नष्ट होईल अशा पद्धतीने राज्यघटना बदलता येणार नाही. धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेचा मूलभूत आधारस्तंभ मानला गेला आहे; परंतु लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड़ यांच्यासह जयपूरमध्ये विधिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील न्यायालयीन अतिक्रमणाचा प्रश्न ज्या पद्धतीने उपस्थित केला, तो सामान्य नाही. पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेला संबोधित करताना या दोघांनी सांगितले की, जसे विधिमंडळ न्यायालयीन निर्णय देऊ शकत नाही, त्याचप्रमाणे न्यायपालिकेनेही कायदे बनविण्याचे अधिकार हिरावून घेण्याच्या प्रयत्नांपासून दूर राहिले पाहिजे. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड़ हे स्वतः चांगले वकील असून त्यांनी सर्वोच्च न्यायालयात वकिलीही केली आहे. अशा परिस्थितीत राज्यघटनेच्या मूलभूत रचनेच्या अखंडतेशी संबंधित बहुचर्चित केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल चुकीचा आदर्श घालून देतो, या त्यांच्या म्हणण्यात खूप काही दडले आहे. लोकशाहीत संसद सर्वोच्च असते, अशा परिस्थितीत संसदेत संमत झालेला कायदा इतर कोणत्याही संस्थेने अवैध ठरवला तर संसदीय वर्चस्व कुठे राहते? असा त्यांचा युक्तिवाद आहे. दुसरे म्हणजे संसदीय सर्वोच्चतेचे तत्त्व असो वा न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, भारतीय शासनव्यवस्थेच्या संदर्भात या सर्वांचा मूळ स्रोत म्हणजे देशाची राज्यघटना. शासनाचे सर्व महत्त्वाचे अंग संविधानातूनच शक्ती प्राप्त करतात. त्यामुळे राज्यघटनेचे सर्वोच्चत्व निसंदिग्ध आणि निर्विवाद आहे. न्यायपालिका ही या राज्यघटनेची संरक्षक आहे. राज्यघटनेचा अर्थ लावण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर टाकण्यात आली आहे. साहजिकच सरकारचा कोणताही निर्णय किंवा संसदेने बनवलेल्या कोणत्याही कायद्याला संविधानाच्या कसोटीवर केवळ तपासून घेणे हा न्यायव्यवस्थेचा अधिकार नाही, तर न्यायपालिकेची ती जबाबदारीही आहे. कोणत्याही युक्तिवादाने न्यायपालिकेस या जबाबदारीपासून रोखण्याचा प्रयत्न योग्य ठरणार नाही. संविधानाच्या मूलभूत चौकटीच्या तत्त्वावर भर देताना पी. चिदंबरम म्हणतात, समजा संसदेने संसदीय व्यवस्था रद्द करून राष्ट्रपती पद्धतीत बदल करण्यासाठी बहुमताने मतदान केले किंवा अनुसूची तीनमधून राज्यसूची रद्द करून राज्यांचे विशेष कायदेविषयक अधिकार संपुष्टात आणले. अशा परिस्थितीत या सुधारणा वैध ठरतील का? धनखड़ यांच्या वक्तव्यानंतर संविधानावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला पुढील धोक्यांची जाणीव असायला हवी. खरे तर अध्यक्षांचे मत ऐकून घेतल्यानंतर प्रत्येक संविधानप्रेमी नागरिकाला पुढील धोक्यांची जाणीव झाली पाहिजे. मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार स्थापन झाल्यापासून राज्यघटनेच्या अवमानाच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे, ही काही नवी गोष्ट नाही. मोदी सरकारमधील एक मंत्री व उत्तर कन्नडमधून पाच वेळा लोकसभेचे खासदार राहिलेले अनंत हेगडे यांनीही नुकतेच पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केले आहे. बंगळुरू येथे एका कार्यक्रमात बोलताना हेगडे म्हणाले, भाजप केवळ संविधान बदलण्यासाठी सत्तेत आला आहे. त्याचबरोबर स्वतःला सेक्युलर आणि बुद्धिजीवी समजणाऱ्यांना स्वतःची कोणतीही ओळख नसते. जर कोणी अभिमानाने आपण मुस्लिम, ख्रिश्चन, ब्राह्मण किंवा हिंदू असल्याचा दावा केला तर मला आनंद होईल, कारण त्यांना त्यांच्या रक्तवाहिन्यांमधून वाहणाऱ्या रक्ताबद्दल माहिती आहे. पण स्वतःला सेक्युलर म्हणवणाऱ्यांना काय म्हणावे हे मला कळत नाही. आम्ही राज्यघटनेचा आदर करतो, पण येत्या काळात हे संविधान बदलले जाईल. आम्ही संविधान बदलण्यासाठीच सत्तेवर आलो आहोत असे वक्तव्य करून हेगडे यांनी राज्यघटनेच्या प्रस्तावनेवर थेट हल्ला चढवला आहे. राज्यघटनेत आतापर्यंत अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत हे मान्य; परंतु राज्यघटनेची मूळ चौकट बदलण्याचा अधिकार संसदेला नाही. १९७३ मध्ये हा प्रश्न पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयासमोर आला. सरन्यायाधीश एस. एम. सिक्री यांच्या अध्यक्षतेखालील १३ न्यायाधीशांच्या खंडपीठाने या प्रकरणी ऐतिहासिक निकाल दिला होता. हा खटला होता - केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, ज्याची सुनावणी ६८ दिवस चालली. राज्यघटनेच्या कलम ३६८ नुसार संसद घटनादुरुस्ती करू शकते; परंतु त्याला मर्यादा घातलेली आहे? १९७३ मध्ये जेव्हा सर्वोच्च न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली, तेव्हा न्यायाधीशांच्या मतांमध्ये फूट पडली होती; परंतु सात न्यायमूर्तींच्या बहुमताने घटनादुरुस्तीचा अधिकार संसदेला आहे, पण राज्यघटनेच्या प्रस्तावनेची मूळ चौकट बदलता येणार नाही, असा निर्णय देण्यात आला. कोणतीही दुरुस्ती प्रस्तावनेच्या भावनेच्या विरोधात असू शकत नाही. खरे तर हे प्रकरण ऐतिहासिक होते कारण त्यात राज्यघटनेला सर्वोच्च मानले गेले होते. न्यायिक संशोधन, धर्मनिरपेक्षता, मुक्त निवडणुका आणि लोकशाही ही राज्यघटनेची मूलभूत रचना असून संसदेचे अधिकार राज्यघटनेच्या मूलभूत रचनेत व्यत्यय आणू शकत नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यघटनेची चौकट हा त्याचा आत्मा आहे आणि संपूर्ण राज्यघटना त्यावर आधारित आहे.




भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेतही १९७६ मध्ये एकदा सुधारणा करण्यात आली असून, त्यात धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी या शब्दांचा समावेश करण्यात आला आहे; परंतु त्यापूर्वीच प्रस्तावनेत सेक्युलॅरिझमच्या भावनेचा समावेश करण्यात आला होता. म्हणजेच भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्षता नेहमीच राहिली आहे. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना स्वातंत्र्य आणि सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार यापूर्वीच प्रस्तावनेत लिहिलेला आहे. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीत सेक्युलर हा शब्द जोडण्यात आला आणि केवळ या शब्दाचेच स्पष्टीकरण देण्यात आले होते. वास्तविकतः जर देशाचे सत्ताधारी व धोरणकर्तेच सरकारी व्यासपीठावरून अशी भाषा बोलू लागले, तर देशाचे भवितव्य काय असेल? हा विचार सुन्न करून जातो. एकेकाळी एखादा नेता राज्यघटना किंवा व्यवस्थेविरोधात काही आक्षेपार्ह बोलला, तर लोक त्यावर आक्षेप घेत असत; परंतु आता लोकही गप्प आहेत. ही चळवळ अशीच सुरू राहिली तर एक दिवस असा येईल की राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांवर गदा आणण्याचे गांभीर्याने प्रयत्न सुरू होतील, हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. किंबहुना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपला राज्यघटनेच्या भावनेबद्दल विशेष आस्था नाही. त्यांची खरी समस्या ही आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार म्हणून जोडले गेले आहे. ते प्रसंगी दलित वस्त्यांमध्ये समरसता सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करतात; परंतु अस्पृश्यता आणि शोषणाचा पुरस्कार करणाऱ्या जातीव्यवस्थेच्या विरोधात ते गप्प का असतात? हा प्रश्न एकदा तरी या समरसतावाल्यानी स्वतःला विचारावा. राज्यघटनेची समीक्षा करण्याच्या नावाखाली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मूळ दुखणे हे डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार असणे हे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा सर्व हिंदू संघटनांना संविधान चांगले आहे की वाईट याच्याशी काही देणेघेणे नाही. तत्त्वतः संसद मतदारांना फसवू शकत नाही. केवळ बहुमताने निवडून आल्याने कोणालाही संविधान बदलण्याचा अधिकार मिळत नाही. वास्तविक पाहता २५ नोव्हेंबर १९४९ रोजी झालेल्या संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या यशस्वीतेबद्दल बोलताना स्पष्ट शब्दात सांगितले होते की, माझ्या मते संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर नालायक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णतया संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका निर्माण करून देते.( डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड क्रमांक १८ भाग ३, पृष्ठ क्र. १६५ ) संविधान बदलाचा हा आरएसएस व भाजपचा छुपा अजेंडा आता उघडपणे बोलला जात आहे. याविरोधात संविधान प्रेमींनी चळवळ उभी करणे आता काळाची गरज आहे. **(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# मैदान वाचवा...!



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**नेहमी प्रमाणे विनय, अनिल, अब्दुल, सुनील ही मुले कॉलनीतल्या मैदानात खेळण्यासाठी गेले असता तेथे त्यांना, " या जागेवर इमारतीचे बांधकाम होणार आहे." मैदानावर एका बिल्डरच्यावतीने पाटी लावण्यात आलेली होती, हे वाचून खेळण्यास गेलेली मुले विचारात पडली. त्या सर्व मुलांनी हीं माहिती आपापल्या आई-बाबाना सांगितले. विनयचे वडिल विनयला म्हणाले, " मी कालच वर्तमानपत्रात वाचले की, एक बिल्डर तिथे मोठी इमारत बांधु इच्छितो." मग विनय म्हणाला, " बाबा आम्ही खेळायाचे कुठे ?"**

त्याच मैदानावर कॉलनीतले वृध्द दांपत्य रोज सकाळी मैदानावरच्या मोकळ्या हवेत फिरायाला यायची, तर मुले शाळा सुटल्यावर मनसोक्त खेळायची. परंतु कॉलनीच्या जमीन मालकाने आर्थिक स्वार्थासाठी ते खुले मैदान बिल्डरला विकले होते. आणि बिल्डरनेही शासनाकडून तिथे इमारत बांधण्याचा रीतशीर परवानाही काढला होता.

विनयच्या बाबानी कॉलनीतील सर्व रहीवाशी पालकांना सायंकाळी आठ वाजता फोन करून आपल्या घरी बोलावले. त्यांची बैठक आयोजित केली. मैदानाविषयी सविस्तर माहिती दिली. शासनाच्या नियमानुसार खेळाचे मैदानावर कोणालाही बांधकाम करता येत नाही. हे मैदान कॉलनीतील आबाल-वृद्धानाच वापरता येते. काही जणांनी सांगितले की, " मैदान नष्ठ झाले तर आपण सारे मोकळ्या हवेला पारखे होऊ. शिवाय तो बिल्डर जागा वाढविण्यासाठी आजुबाजूची सगळी झाडे तोडणार मग स्वच्छ व शुध्द हवा आपणास कोठुन मिळनांर . त्या सर्वांचे म्हणणे ऐकल्यावर शेवटी असे ठरविण्यात आले की, मुलांच्यावतीने, " मैदान वाचवा मोर्चा, " फक्त मुलांनीच काढायचे. मोर्चा काढण्यासाठी शासनाकडून रीतशीर लेखी परवानगी काढली. शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मैदान वाचवा मोर्चा कॉलनीतल्या सर्व मुलांनी त्यात सहभागी व्हावे.

मैदान वाचवा समितीच्यावतीने मुलांचा सहभाग असलेला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला. यामध्ये विनय, अनिल, अब्दुल, सुनील, प्रकाश, कमल, सायमा, विमल, दीपमाला, आणि कॉलनीतील सर्व शालेय मुले-मुली होत्या. अगदी शिस्तीत- रांगेत, घोषणा देत होते. घोषणेमध्ये, " मैदान वाचवा, मुलांना वाचवा, मुलांना खेळू दया, खेळणे मुलांचा हक्क आहे, ते हिरावून घेऊ नये. मैदान बचाव समितीचा विजय असो." अशा घोषणा देत-देत मैदान बचाव समिती मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाजळ पोहोचला. पोलीसांना वाटले हा मोर्चा मोठया माणसांचा असेल, हे तर सर्व बच्चे कंपणी आहे. तेही या मोर्चाकडे कुतूहलाने पहात होते आणि एवढा तगडा बंदोबस्त कशाला पाहिजे ? असे प्रत्येक पोलीसांना वाटत होते. तशीच समजूत जिल्हाधिकाऱ्याचीसुध्दा झाली होती. पण मुलांना अगोदरच पालकांनी समजावून सांगितले होते की, पोलीस असो कुणीही असो, कुणालाच घाबरायचे नाही. त्याप्रमाणे मोर्चेमधील सर्व मुले कर्तव्य बजावित होते. आणि त्या मोर्चाचा नेतृत्व विनय करीत होता. विनयने निवेदन शासकीय आधिकाऱ्याकडे दिले. जिल्हाधिकारीने हा बच्चे कंपनीचा, ( मैदान बचाव समिती ) चे निवेदन वाचुन जिल्हाधिकाऱ्यालाही गहिवरून आले. " आणि आमची चूक आमच्या लक्षात आली आहे. तुमचे मैदान हिरावून घेऊन बिल्डरला देत होतो. आता तो निर्णय आम्ही बदलत आहोत. बिल्डरला दिलेला परवाना रद्द करण्याचा आदेश मी जिल्हाधिकारी शासनाच्या वतीने जारी करीत आहे." सर्व मुले जिंकली. मैदान बचाव समितीचा विजय असो. अशा घोषणा सर्व मुलांनी दिल्या. आणि मुलांनी जिल्हाधिकारी यांचे आभार मानले. मैदान बचाव समितीतील सहभागी सर्व मुला-मुलांनी आनंद व्यक्त करून आपापल्या घरी परतले.



# ॲड. मंदाकिनी पाटील यांच्या आत्मपीठ काव्य-संग्रहावरील परीक्षण

आधुनिक केसरी

**'हातावरच्या रेषा नि पत्रिकेतल्या ग्रहांना / मी कधीच बधले नाही...', कवयित्री ॲड. मंदाकिनी पाटील यांच्या नुकत्याच आलेल्या 'आत्मपीठ'या काव्य संग्रहातील या ओळी, कवयित्रीची साहित्यिक ओळख देण्यास पुरेशा आहेत. आत्मविश्वासासोबत आत्मभान आणि स्त्रीत्वाचं गान जागतं ठेवणारी ही कवयित्री... 'स्व'शी संवाद साधत काव्य संग्रहातील पानापानांमधून जेव्हा अक्षरांचे काजवे होऊन उतरते तेव्हा तिचं ते बोलणं निव्वळ तिचं राहत नाही. 'अनाहत' या संग्रहानंतर आलेला मंदाकिनी यांचा हा दुसरा काव्य-संग्रह! आपल्या अस्तित्वाकडे भवतालातून पाहण्याच्या सशक्त स्वानुभवाच्या काव्य-शृंखलेतून रसिक वाचकांसमोर ठेवलेलं हे 'आत्मपीठ'एकेका कवितेपरत वाचकालाही या माळेत गुंफत जाते.**

कवयित्री म्हणते - 'आपण अनुभवतो, ते जगून संपत असते, पण मनात मात्र ते जीवंत राहते. आणि अशा अनेक अनुभूतीतून आपलं 'आत्मपीठ' सिद्ध होते'. भवतालाशी एकरुप होणारी आणि नशिबापेक्षा कर्तृत्वावर विश्वास ठेवणारी ही कवयित्री, 'दिवा उजळो देहाचा' (कविता-१) या आपल्या पहिल्याच कवितेतील ओळीत; नकळत वाचकाला आध्यात्माशी जोडते - 'देहाची ही धनुकली स्वतःलाच घाली मिठी / दृष्टअदृष्टाची सृष्टी मृत्यूची जगण्यावर प्रीती / तुटो हा मोहाचा फास सुटो मायेच्या या गाठी / दिवा उजळो देहाचा मनाच्या निरंजन वाती.' या ओळींमधून कवयित्री आपलं मन, अजूनही न उलगडलेल्या त्या 'शाश्वता-सत्याशी' जुळलेलंय हे नकळतपणे सांगून जाते. आपला हा देह नश्वर असला तरी याचा मोह कुणालाही सोडवत नाही, मृत्यूच्या दाराकडे नेणारी वाट अजून तरी कुणाला चुकवता आली नाहीये. 'वकिली'सारख्या अति रुक्ष पेशात काम करणाऱ्या या कवयित्रीच्या ठायी आयुष्याच्या जोडीदाराचे गुणदोष स्विकारणारी प्रगल्भ जाणीव आहे, 'तू तळ्यातले मोती / माझ्या ओंजळीत रिते केलेस / आपल्या समजूतदार हातांनी / मी त्यांचे साज घडवले...', (सोबत-कविता २). आणि हीच जाणीव टोकदार वास्तव होऊन 'सोबत'मधून अलगद उतरलीये -'हे सगळे होताना रागलोभ रुणझुणले / मान अपमान झुमझुमले / घुमले टणत्कार... विरले... / मनाच्या अवकाशात / तनाचे सोहळेही रेंगाळत राहिले...'.आयुष्याचा ऋतू जेव्हा बहरात असतो तेव्हा जीवन खूप सुंदर आहे असं आपल्याला वाटू लागतं. याच अनुबंधाची साक्ष होत कवयित्री म्हणते - 'अंतःकरणभर आपल्या / आपल्याच अस्तित्वाची सळसळ / अंबरझुंबर दिलाचं / रुमझुमू लागतं एकआध दिवस!' हीच तरल रुमझुम कवयित्री पुढे शब्द-सुमनांनी उधळती होते -'उधळून द्यावं स्वतःला / हे अस्सं ! झाडांवर... / फुलांवर... आभाळभर / पसरू द्यावं स्वतःला / पृथ्वीच्या तनमनभर / सामावून घ्यावं स्वतःत / हवंहवसं जे ते लोभस...'(अंबरझुंबर-कविता 3). 'सटवाईचा प्रत्येक शब्द / मी निग्रहाने खोडत गेले / नवाकोरा कागद घेतला / मला हवे ते लिहू लागले.' (मनाच्या ओळी-कविता ५) आयुष्याला भिडण्याची कवयित्रीची निर्भीडता या ओळींमधून उत्फुल्लपणे विहरताना दिसून येते. कवयित्रीचं निसर्गप्रिय मन चराचरांच्या जाणीवा स्वतःत घेऊन आहे. 'अनाम' ही कविता भावनांचा असाच एक हळुवार डहुळ आहे. 'अंतस्थाच्या पटलावरती / अनाम काही हळू डहुळते / सृष्टीत माझ्या गलबल उठते / झुलतो वड मग झुलतो पिंपळ / झुलतो देह सारा / झुलता झुलता देहात फुलतो पारंब्यांचा पिसारा...' अतिशय समर्पक, परिपूर्ण आणि आशयसंपन्न अशा या ओळी! या कवितेत, 'सृष्टीत' हा शब्द कवयित्रीने अतिशय चपखलतेने टाकलाय. या एका शब्दाने ही कविता एका वेगळ्या उंचीवर गेलीये.

या संग्रहातील कविता, त्यातील ओळी या काळजावर एखाद्या शिल्पासारख्या कोरल्या जातात, 'गालावरचा तीळ जरासा / होता खाली झुकला / उगीच उडाल्या हळव्या चिमण्या / अन राघू फडफडला...,'वयात येण्याआधीच लग्न झालेल्या नववधूची व्यथा, भावनिक घालमेल 'नववधू'तून (कविता २१) खूपच प्रभावीपणे उतरलीये. 'कशाला वाचले ते संत अन सानेगुरुजी? / निदान मनाची घालमेल तरी टळली असती / निबर जगात बेफिकिरीने जगताना / फकिराची झोळी तरी आठवली नसती', (घुसमट-कविता १४) फकिराची रिती झोळी आठवणाऱ्या या कवयित्रीला प्लॅटफॉर्मवर पाहिलेल्या भिकाऱ्याच्या तोंडून गळणारी लाळ अस्वस्थ करीत राहते. रंजल्या-गांजल्यांची पोटाची भूक हे सुद्धा तिला स्वतःचं अपराधीपण वाटते. प्रतिकांशिवायची सकस-सहजता, ही मंदाकिनी पाटील यांच्या कवितेतील खासियत! आत्मभान जपणाऱ्या आणि स्वाभिमानाने जगणाऱ्या पार्वतीसारखे आपण का नाही याची कवयित्रीला खंत आहे की काय?... बाईच्या जातीला नेहमी न चुकता, 'तू सीता हो! तू सती सावित्री हो!' असेच आशीर्वाद मिळत राहतात. पण कुणीच असा आशीर्वाद देत नाही की, 'तू पार्वती हो'! यासाठी कवयित्रीच्या लेखणीतून धारदार ओळी बाहेर पडतात 'पार्वते, आम्ही गायल्या फक्त तुझ्या आरत्या ठणठणाट / ना होता आले आम्हाला भिल्लीण, ना दुर्गेचा घेतला अवतार / लक्ष्मी हो! सरस्वती हो! वाटला एकमेकींना प्रसाद / पण कुणीच कसा दिला नाही गं 'पार्वती' हो! असा आशीर्वाद?' 'कशाला म्हणतेस त्याला? / मी फक्त तुझीचंय! / तू तर स्वयंपाकघराची... / शेगडीवरल्या तव्याची... / चुलीमधल्या जाळाची... / उरल्यासुरल्या रॉकेलची... / 'कशाला म्हणतेस त्याला? / तूच फक्त आवडतोस मला / तुला तर आवडतात फुले / तुला आवडतात गाणी / तुला आवडतात पुस्तके / आणि तुला आवडतेस तू ...' (कविता २५) 'फक्त निखळ जाणावं'मधील या काही ओळी. समाजात नांदणारी स्त्री-पुरुष भेदाची दरी कवयित्रीच्या मनाला सतत सलतेय. संसारातील काही कामं ही फक्त स्त्रियांचीच आहेत, या पुरुषी धारणेतून आलेल्या समाजप्रववृतीला कवयित्रीचा टोकाचा विरोध आहे. एक स्त्री म्हणून संसाराचा रामरगाडा चालवताना चांगले संस्कार त्याविरुद्ध बंड करु देत नाही याचं वैषम्यही कवयित्रीला आहे.




समाजात रुजलेल्या अशा चुकीच्या प्रथांविरुद्ध कवयित्रीच्या काळजाला रुतणारे भेदाभेदाचे हे 'कढ' या संग्रहातून धारदार भाष्य करताना दिसतात. या संग्रहातील बहुतेक कविता या मौनातल्या स्वगतातून उतरल्याहेत. कधी त्या स्वतःशी बोलतात, तर कधी आयुष्याला सुनावू पाहतात. आपल्या ऋतू समाप्तीच्या नुसत्या जाणिवेनेही बाई अंतर्बाह्य हलते. बाईपणाच्या सृजन-सृष्टीचे बदल तिला अस्वस्थ करीत राहतात. 'वैशाख' (कविता २९) या कवितेतील अंतराला छळणारे अनुभवांचे कटू डंख,'ऋतू पालटतानांची ती चिडमिड चिडकी / थोपवू पहाते आटू पाहणारी कूस भळभळती...' आणि, 'फिट्ट असते तिच्या मनात बाई म्हणजे सृजन / परतीच्या त्या वादळात समूळ हलते... डळमळते...'. या ओळींमधून कवयित्री मांडतांना दिसते. एक स्त्री म्हणून; स्त्रियांच्या वाटेला आलेल्या अवहेलनांचे पदर संग्रहातील पानापानांवर फडफडतांना दिसतात. आणि ती फडफड वाचकांच्या जाणिवांची सृष्टीही ढवळून काढते. 'आपलं आयुष्य आपलंही असतं' (कविता ३१) सत्तर आशयघन आणि सकस अशा या कवितांमध्ये ही कविता मला जरा जास्तच भावली. स्त्रियांना सजग भान देणाऱ्या या कवितेत जाचणाऱ्या प्रथांविरुद्ध आपलं अंतःर्मन कवयित्रीने कसं धगधगतं ठेवलंय. कवयित्री म्हणते; 'घटस्फोट म्हणजे / आयुष्याला लागलेली ठेच / कर दूर दगड, जा विसरून...' किंवा, 'भर चुडा अथवा जग मोकळी पुन्हा / असू दे फक्त ताठ कणा...' घटस्फोट म्हणजे, निव्वळ दोन जीवांचं आयुष्य उध्वस्त करणारी घटना नाही तर; त्या घटनेचे पडसाद त्या इर्दगिर्द वावरणाऱ्या कितीतरी लोकांच्या जीवनावर, आणि समाजमनावरही पडत असतात. बाईमधल्या स्त्रीच्या आत्मभानाला आणि पुरुषामधल्या माणूसपणाला जागवणाऱ्या या संग्रहातील कविता, त्यामुळेच निव्वळ कवयित्रीच्या लेखणीच्या पाईक उरत नाहीत तर सर्व समाज घटकांशी त्या आपली बांधिलकी सांगतात. ॲड. मंदाकिनी पाटील या कवयित्रीचं मन हे माणसापेक्षा जास्त भवतालातील वस्तूंशी, चराचराशी जोडून आहे. जसं की, घरातली भांडी, उशी, चमेलीची वेल, गच्ची, भिंत, झुंबर, छत, सावली, कवडसे अशा सगळ्यांचंच अस्तित्व कवयित्रीसाठी सजीव रूप आहे. आपल्या अंगणातल्या कदंबाविषयी अतीव माया आणि जिव्हाळा आहे कवयित्रीला!'जेव्हा तुझ्या लांबचलांब फांद्या / फिरतात माझ्या घराच्या छतावरनं / कनवाळू बापानं फिरवावा हात / जसा मुलीच्या माथ्यावरनं...' कदंबाच्या वृक्षात बापाची छबी बघणाऱ्या या कवयित्रीची लिहिण्याची जातकुळी ही स्त्रीवादी कवितांची असली तरी त्यांच्या कवितांमधून नकळतपणे त्यांची लेखणी,पुरुषांचं अस्तित्वही चितारती झालीये.ज्या व्यक्तीला आपल्या देहात दडलेल्या 'स्व'शी संवाद साधण्याची अति उच्चम पातळी गाठता येते त्याच व्यक्तीला आपल्यातल्या 'आत्मपीठा'पर्यंत पोहचता येतं, असं मी म्हणेन! मात्र, अशा मंथनातून 'आत्मपीठा'पर्यंत पोहचल्यानंतरचं 'प्रामाणिक रूदन' त्याला धाडसाने मांडताही यायला हवं. आणि तेच धाडस कवयित्रीने अवघ्या संग्रहात धडाडीनं पेरलंय. आत्मपीठातील ही सगळी स्वयंप्रकाशित अक्षर-काजवे अंधाऱ्या वाटेवर चाचपडणाऱ्यांना प्रकाशाचे दीप, नक्कीच प्रदान करत राहतील यात कुठेही शंका नाही. मा. सुमती लांडे यांच्या शब्दालय प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या संग्रहाची छपाई अतिशय सुबक तेवढीच उत्कृष्ट आहे. जेष्ठ साहित्यिक आणि चित्रकार रामदास खरे यांनी निर्मिलेलं समर्पक असं मुखपृष्ठ आणि पदार्पणातच तीन साहित्यिक पुरस्कारांवर मोहर उमटवणारा हा संग्रह, मराठी साहित्यात आपली आगळी-वेगळी छाप सोडण्यात नक्कीच यशस्वी ठरलाय असं म्हणता येईल.

**"आत्मपीठ"**
**ॲड. मंदाकिनी पाटील, शब्दालाय प्रकाशन, श्रीरामपूर**
**पृष्ठेः १३४, मूल्यः : २६०/-**

# अंधाराच्या कुशीतले अक्षर-काजवे



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195


आधुनिक केसरी

**प्रत्येक जीवाला सुख, समाधान उपभोगायचे असते. आनंद कोणाला नको असतो का? इथे प्रत्येकालाच सुखी व्हायचे आहे. पण प्रत्येकाची सुखाची व्याख्या वेगळी आहे. मानवी मनाला स्थिरतेची सवय राहिलेली नाही. सगळे कसे पटकन मिळावे अशी अपेक्षा असते, त्यासाठी लागणारा संयतपणा मानवापाशी नाही. पूर्वी साधने कमी होती, तंत्रज्ञान विकसित नव्हते, पण सुख - समाधानाने जगण्याची उर्मी होती. हळूहळू प्रगतिपथावर मार्गक्रमण करता करता अनेक सोयी - सुविधा प्राप्त होत गेल्या पण मनाची अस्थिरता वाढत गेली. अनेक गोष्टींचा ताण वाढत गेला आणि त्या त्या क्षणी जगणं राहून गेले.**

वयानुरूप जबाबदारी निभावताना, कार्य करताना बऱ्याच गोष्टी करायच्या राहून गेल्या, याची जाणीव होते. मानवी मनाला जगण्यातील आशावाद अनुभवण्यासाठी अध्यात्माची जोड आवश्यक आहे. जगण्याचे सूत्र यात सामावलेले आहे, याची जाणीव करुन देणाऱ्या पुस्तकाविषयी आपण जाणून घेणार आहोत. लेखक भास्कर राऊत लिखित 'अखंड आनंद- भाग२ ' हे पुस्तक अध्यात्मपर विषयावर आधारित असले तरी माणूस म्हणून आपले वर्तन कसे असायला हवे, नीतिमूल्यांची ओळख आणि स्वार्थापलीकडे पाहण्याची योग्य दिशा देणारे हे पुस्तक आहे. अध्यात्म हा भाग फ़क्त ज्येठांसाठी असतो असे नाही तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणार्थ असतो. पुस्तकात विविध घटक खूप विस्तारित रुपात मांडले असून विविध दाखले, उदाहरणं आणि संत वचनांचा चपखल वापर करुन प्रत्येक भाग लेखकाने उलगडून दाखवला आहे. साधी- सोपी निवेदनशैली, प्रवाही लेखनशैली आणि दैनंदिन जगण्यातील उदाहरणे यामुळे वाचताना मनाला एक प्रकारे स्थिरता लाभते. दुःख कोणालाच नको आहे, प्रत्येकाला आनंद हवा आहे. फक्त असा विचार करून आनंद होतो का ? त्यासाठी आपल्याला प्रयत्न करणं आवश्यक आहे. दुःख आपोआप होतं, आनंद निवडावा लागतो. आपला आनंद नेमका कशात आहे, तो कसा आणि कुठे शोधायचा याचा मार्ग लेखकाने आपल्याला पुस्तकातून दाखवलेला आहे. त्यावर मार्गक्रमण करणं हे आपल्या हातात आहे.

या पुस्तकात 'परमेश्वर' ही संकल्पना किती सुंदररित्या विशद केली आहे. आपण परमेश्वर फक्त मूर्तीत पाहतो पण लेखकाने देवाला आपल्या आजूबाजूच्या निसर्गात पाहा, अनुभवा, ही दृष्टी दिलेली आहे. मानवी शरीर, जन्म, प्रारब्ध, निसर्ग, प्राणी- पक्षी, ऋतु , सूर्य, चन्द्र या सगळ्या गोष्टी ही सृष्टी ईश्वरीय देणगी आहे. या सगळ्यात ईश्वराचा वास आहे. मानवाने कितीही नवनवीन प्रयोग केले, शोध लावले तरी एक अदृश्य अशी शक्ती आपल्या आसपास आहे, परमेश्वर ! या परमेश्वराप्रति, त्याने दिलेल्या प्रत्येक गोष्टीप्रति आपण कृतज्ञ भाव जोपासायला हवा, हा विचार रुजवणारे हे पुस्तक आहे. मानवी जीवनाच्या ज्या अवस्था आहेत, बालपण, तारुण्य, वार्धक्य या अवस्थांतून प्रत्येक जीवाला जावे लागते. ज्याला जन्म मिळाला आहे, त्याचा मृत्यु अटळ आहे. पण यामधील भाग आपण कसा सार्थकी लावायचा आहे, हे मात्र आपल्य हातात असते. कोणतीही व्यक्ती ही परिपूर्ण नसते, चांगल्या - वाईट दोन्ही भाव त्यात असतात. मद, मत्सर, मोह, द्वेष , राग, लोभ, वासना हे घटक प्रत्येक मनुष्यामध्ये नांदत असतात. या षदरिपुंवर नियंत्रण कसे राखावे, याचे सोपे निरूपण या पुस्तकात दिलेले आहे.

मनुष्य जीवनात आपले आचरण कसे असावे, इतरांप्रति आपला व्यवहार , माणुस म्हणून आपली कर्तव्ये अर्थात इतरांना मदत करणे, एकमेकांचा आदर करणे, स्त्रियांचा मान राखणे , दुसऱ्याला आनंद देणं या गोष्टी आपण आचरणात आणायला हव्यात. मानवी मनाचे कार्य कशा प्रकारे सुरु असते, त्यामागील शक्ती कोणती , या सगळ्या प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात मिळतील. मानवाला जीवनातील या प्रवासात योग्य- अयोग्य गोष्टीची पारख नसते, म्हणून आपल्याला मार्ग दाखवणारा गुरु असायला हवा. आजकालच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रगती वेगाने होत आहे, पण मानवातील हिंस्रता कोणत्या टोकाला पोहचली आहे, हे आपण जाणतो. खून, दरोडे, चोरी, मारहाण, अत्याचार, अपहरण असे गुन्हे वाढत चालले आहेत.मानवातील ही नकारात्मक वृत्ती थोपवण्यासाठी मनाची मशागत करायला हवी. सारासार विचार करण्याची सवय करायला हवी. योग साधना आवश्यक आहे. यासोबतच आध्यामिक अधिष्ठान गरजेचे आहे. विचारांना योग्य दिशा देण्यासाठी चांगले वचन कानावर पडले पाहिजेत. हे संस्कार मानवी मनावर होणे गरजेचे आहे. या पुस्तकाच्या शीर्षकातील आनंद हा शब्द अत्यंत महत्वाचा आहे. मानवी मनातील नैराश्य, ताण, दुःख, वेदना कमी करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात करण गरजेचे आहे. आणि नकारात्मकतेने ग्रासलेल्या जीवनातील आनंद परत मिळवण्यासाठी अशा पुस्तकांची खरेच गरज आहे.




आपला एक विचार कोणाचं तरी आयुष्य बदलू शकते, या शक्यतेने जगणं सुकर होऊ शकते. लेखक भास्कर राऊत यांना त्यांचे गुरु परमसंत श्री. कृपालसिंहजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने इतकी सुंदर दृष्टी लाभली, त्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी लेखनास प्रारंभ केला आणि त्याचा परिणाम या पुस्तकाच्या माध्यमातून दिसून येत आहे.

सुख म्हणजे नेमके काय ? समाधानाची व्याख्या काय ? आपला आनंद कसा शोधावा ? तसेच मनाला स्थिरता,शांतता लाभावी म्हणून काय करायला हवे, या प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात मिळतील. मनाचे आरोग्यही जपणं आवश्यक आहे. आजकालच्या तरुण पिढ़ी खूप संवेदनशील आहे. एखादी घटना घडली कि त्यावर व्यक्त न होता आत्महत्येचा पर्याय स्वीकारतात. इतके मानवी मन कमकुवत होत चालले आहे. मनाची तटबंदी मजबूत करायची असेल तर, अशा सकारात्मक विचारांची गरज आहे. आपल्या आनंदात खंड पडू न देता अखंड आनंद कसा जोपासावा , हे जाणून घेण्यासाठी 'अखंड आनंद - भाग २ ' हे पुस्तक वाचायलाच हवे. मानवी जीवनात मनोरंजन महत्वाचे आहे तसेच समाधान, आनंदही महत्वाचा आहे. मानसिक आरोग्य जपायला हवे, ही शिकवण या पुस्तकात मिळते. शारदा प्रकाशन या प्रकाशन संस्थेने ह्या घडीला आवश्यक असलेला विषय पुस्तकरुपात आणला. पुस्तकाचे सुरेख मुखपृष्ठ संदेश सावंत यांनी साकारले. तसेच लेखिका, कवयित्री डॉ. सुचिता पाटील यांनी यथार्थ प्रस्तावना लिहिली आहे. प्रत्येकाच्या संग्रही हे पुस्तक असायला हवे.

**अखंड आनंद - भाग २ / लेखक भास्कर राऊत / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १५० रूपये**



## रक्षाबंधन...!

राखी पौर्णिमेला तुला
ओवाळीते भाऊराया,
आयुष्यात माझ्यावर
असू दे तुझीच माया.

लहाणपणी आपण
दोघे खूप भांडायाचो,
राग शांत झाल्यावर
पुन्हा एकत्र खेळायाचो.

बाबा, तुला मारतांना
रडू मला येत होते,
आई, मला मारतांना
रडू तुला येत होते.

ईश्वरा ! माझ्या भावाचा
बळकट कर हात,
येणाऱ्या संकटावर
तो सदा करीन मात.

हे प्रभु ! माझ्या भावाच्या
दुःख- यातना सरू दे,
त्याच्या कमाईत सदा
बरकत ही उरू दे.

पवित्र राखी बांधून
करते मी आराधना,
भावाला माझ्या सुखी ठेव
देवा ! हीच माझी प्रार्थना...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## चाहूल दुष्काळाची...

दुष्काळाची लागली चाहूल
शेतशिवार समशान झाली,
नेत्यांना हवा हवा वाटे दुष्काळ
दलालीची वाट मोकळी झाली.
कुणी काढील चारा छावण्या
कुणाचे पाण्याचे टँकर भरतील,
टेंडर निघतील कोटींचे
जनावरे पाण्यावाचून मरतील.
मंत्री संत्री काढतील दौरे
बगल बच्चे ढोल बडवतील,
आश्वासनांचे गाजर देऊन
जागोजागी रस्ते अडवतील.
होईल श्रेयवादाची लढाई
हमरीतुमरी वर येतील,
तुमच्या आमच्या गावगाड्यात
आग लावून जातील.
रेशनवर फुकट अन्नधान्य
होईल काळाबाजार,
गोरगरीब बसतील लायनीत
ट्रक रातोरात फरार.
खरा वंचित राहील बाजूला
वशिल्याचा लागेल नंबर,
मतदारसंघावर ठेवून डोळा
करतील नेहमीचे अवडंबर.
आयुष्यभर ज्यांनी केला
हातावर भरोसा,
ध्रुवीकरण करत बसले
हिंदू रडले ढसाढसा.
बाळासाहेबांचा ढाण्या वाघ
झालाय कधीच मांजर,
घड्याळाचे काटे सुद्धा
उलटून झाले खंजर.
कलाम अटलजींच्या देशात
हुकूमशाही डोकू लागली,
शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून
पावले अडाणीकडे झुकू लागली.
निसर्गाला नाव ठेवू नका
तुम्ही किती नीतिमत्ता पाळली?
आमदारांना घेऊन गाडी
रातोरात गुवाहाटीकडे वळली.
हे विठ्ठला मायबापा
तूच आहे जळी स्थळी,
दया कर तुझ्या लेकरांवर
भरू दे पावसाने झोळी...
भरू दे पावसाने झोळी...

कवी - ज्ञानेश्वर तासकर

## अंधारातून प्रकाशाकडे

एकटीचीच चाल माझी,
काळोख्या अंधारातची..
कधी तरी दाखव देवा,
मज वाट प्रकाशाची..

पायवाटेवरी माझ्या आहे,
किर्रर काळोख दाटलेला.
जीवघेणा हुंदका ओठीचा,
भीतीने होता उरात साटलेला.

अंधाऱ्या वाटेवरी एकटी,
कुठं कधीपर्यंत चालू देवा..
आतातरी मिळेल का मज,
चाखाया आयुष्याचा मेवा..

विखुरलेली माझी ही वाट,
तिला मिळेल का नवी दिशा.
अंधारमय माझ्या आयुष्याची,
सांग कधी दूर सरेल निशा..

सरता दूर अज्ञानाचा अंधार,
मिळेल दिव्य ज्ञानाचा प्रकाश.
कोमेजलेल्या छोट्या आयुष्याचे,
होईल स्वच्छंदी मोकळे आकाश.
कु.ज्योती जयंत पवार
(परी) रत्नागिरी



## ए चांदोमामा...

चांदोमामा चांदोमामा आम्ही
येणार रे तुला भेटायला.
चला जाऊ चला जाऊ दूर
दूर फिरायाला.

सूर्रर.. सूर् र.. करत भुर्र..
भुर्र.. जाऊया मामाच्या गावाला.
मामा आम्ही आलो किन्ई रे
बघ आज तुला भेटायाला.

तूप रोटी नि शेवयांची खीर
आणली तुझ्यासाठी तुला रे
खायला,
मामा आम्ही आज आलो
किनई रे बघ तुला भेटायला.

रुसू नकोस रे ,नाहीस रे तू
एकटा रुसायाला.
मामा आम्ही आलो तुझ्या
संगती खेळायला.
मामा आम्ही आज आलो
किनई रे बघ तुला भेटायाला...

लपाछपी खेळता खेळता
बघआता कसा सापडला.
मामा आम्ही आज आलो
किनई रे तुला भेटायाला...

लपाछपी खेळण्यासाठी
मामा अंगणात तुझ्या आलो
लिंबोणीचे झाड एक लावायाला.
नाही नाही म्हणता म्हणता
मामा आम्ही आज आलो
किनई रे तुला भेटायला..

तुझी नि आमची जमेल गट्टी
छान उधाण येईल आनंदाला.
चांदोमामा चांदोमामा बघ
आज आलो किनई रे तुला
भेटायाला.
सौ. वैशाली इंदुमती जाधव
-महाडिक.
संपर्क क्र.- ९७६७४३७९२३.



## रक्षा बंधन

रक्षा बंधनाचा सण आज आला पुनवेचा
हाती भावाच्या बहीण
बांधी धागा रेशमाचा..॥१॥

भाऊ करतो रक्षण जीवा पल्याड जपतो
बहिणीच्या सुखासाठी
जीवं त्याचा हो तुटतो..॥२॥

नांदे बहीण सासरी उध्दरण्या दोन कुळा
दु:खा दडवी अंतरी माया ओसंडत डोळा..॥३॥

सुखी राहो भाऊ माझा हेच मागणं मागते
नको धन पैसा तुझा औक्षं देवाला मागते..॥४॥

लावीयल्या औक्षणासीं निरांजनीं डोळीयाच्यां
नको दृष्ट आनंदासी
कधी जीवनी भावाच्या..॥५॥
हेम:ज्योती, लातूर

## त्यांनी

त्यांनी केल्या बंद, वाटा साऱ्या जगण्याच्या
अजूनी मरणाचा, माझा विचार नाही.

ते भुंकत आहे रोज,उगाच माझ्यावरती
मौन सोडण्याचा, माझा विचार नाही.

त्यांनी ओकली खूप, गरळ ती विषारी
तरी साप होण्याचा, माझा विचार नाही.

त्यांनी तोडले झाड,हिरवे रानातले
तरी जळून वाळण्याचा,माझा विचार नाही.

ते देतात आता रोज, शिव्याशाप मजला
तरी मध होण्याचा, माझा विचार नाही.

होरपळ जगी झाली, उभ्या आयुष्याची
अजूनी थकण्याचा, माझा विचार नाही.

त्यांनी पेरले काटे,वाटेत बाभळीचे
अनवाणी चालण्याचा,माझा विचार नाही.

त्यांनी रचले डाव. जिंकून घेण्या मजला
चक्रव्युहात अडकण्याचा, माझा विचार नाही.

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
मो.९४०३३८४८८९

## सणांचे दिवस



नववर्षाचा पहिला सण तो म्हणजे गुढीपाडवा
पुरणपोळीने वाढतो घरोघरी गोडवा
नागमंचमीला एकत्र जमती वारुळाजवळ आया-बाया
नागोबाला वाहती गुळ, फुटाणे, लाह्या
बहीण बांधते भावाला रेशमी राखी हाती
राखीपौर्णिमा सांगते जपा प्रेमाची नाती
बैल सजविण्याचा सण मग येतो पोळा
वाजत गाजत मंदिराजवळ होतात सारी गोळा
उत्साहाच्या वातावरणात गणपतीबाप्पा येतात घरी
दहा दिवस मोदक खाण्याची लयलुट असते भारी
घटस्थापणेला सुरु होते नवरात्राचे आगमण
भक्तिमय वातावरणात दुर्गामातेचे पूजन
घेऊन येतो दसरा प्रेम आणि बंधुभाव
द्वेष आणि मत्सर यांचे नको नाव
दिवाळीच्या सणाला आनंदाला नसतो तोटा
दारी दिप लावूनी खुशाल आनंद लुटा
तिळगुळाचा गोडवा मकरसंक्रांत घेऊन येते
एक दुसऱ्यास प्रेम करा संदेश आपणास देते
रंगांची उधळण करीत सण येतो होळी
वाईटाला दूर सारुनी खाऊया पुरणाची पोळी
सणासुदीच्या दिवसात आनंदाला येते भरती
नव चैतन्याने न्हाऊन निघती धरती
- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ

## सांजवात

शांतावती दशदिशा
स्थिरावते वेळ काळ
विसाव्याच्या दो क्षणांची
एकमेव आहे संध्याकाळ
तीळ तेल, कापूस वात
मांगल्याची सांजवात
तुळशीच्या कोनाड्यात
पावित्र्याची मंद ज्योत
गंधातून बोलू लागे
मंद रातराणी कळ्या
शुभं करोती स्तवन
बाळ मुखात कोवळ्या
माजघराच्या शांततेत
मिणमिणावे वातीने
गंध आल्हाद, उत्साह
द्यावा पणती मातीने
सुख, वात्सल्य, प्रीतीची
जीवनात सांजवात
दुःख, वेदनेची नको
उभ्या आयुष्यात साथ
रजनीच्या छातीवर
चांदण्याच्या दुग्धधारा
सांज वतीने उजळवावा
सत्य शांतीचा गाभारा
कल्पना मापूसकर
90826 46494



## आले आभाळ भरून



आले आभाळ भरून
पण पाऊस पडेना
निसर्गाचे हे अजब
कोडे उलगडेना

का रे रुसला पावसा
काय तुला रे जाहले
वाट पाहुनी पाहुनी
डोळे भरुनिया आले

वाट तुझी पाहतांना
जीव होई कासावीस
तू यावास म्हणुनी
केले नवस सायास

आता बरस बरस
दया दाखव रे जरा
आनंदाने करू दे रे
आम्हा दिवाळी दसरा

उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मोबाईल: ८८८८९२५४८८

## गुरु...!

विश्वामध्ये चोहीकडे दिसती सारे गुरू, सन्मानाने सगळे त्यांना वंदन करू.
सूर्याकडून प्रकाश घ्यावा, अंधार सारा तुडवित जावा.
चंद्र -ताऱ्यांची शितल प्रिती, दया, क्षमा, शांती देई निती.
चांदण्यांचे पीक घेण्यास, ताऱ्यांची पेरणी करू.
आभाळाकडून माया घ्यावी, साऱ्या जगाला छाया दयावी.
मेघांचा धर्म जीवन दयावे, तहानलेल्यांना तृप्त करावे.
आभाळ आणि मेघामध्ये, इंद्रधनुष्याचे रंग भरू.
सागर देतो पाऊस- पाणी, पर्वत गातो हिरवी गाणी.
नदी फुलविते शेती-माती, मानवास अन्न खाया देती.
या उपकारांची जाणीव, साऱ्यांच्या मनात धरू.
गुरु चालवितो ज्ञानपोई, आयुष्यभर स्वतःस वाहून घेई.
सुसंस्कारी पिढी घडवितो, अनुभवांची शिदोरी वाटतो
या देवदूताला, हात जोडूनिया नमन करू...!
- अय्युब पठाण लोहगांवकर, मो. ९७६४३५०३७४

## शरदाचं चांदणं

रानातल्या पाती विसावल्या वाती पौर्णिमेच्या राती शरदाचं चांदणं ! वृक्ष, वेली, पानं सजविली काजव्यानं उगवते ढगाआडून शरदाचं चांदणं ! संध्येलाही लाजविते दिवसाढवळ्या उगवते काळोखात चमचमते शरदाचं चांदणं ! दिसे माळरानावर भासे नदीतीरावर निळ्या आभाळावर शरदाचं चांदणं ! गावरान राघू मैनेचं गुटरगू किमया किती सांगू शरदाचं चांदणं ! मनातलं गाणं ओठांवर रांधणं कपाळी गोंदणं शरदाचं चांदणं !
प्रदीप बडदे, नवी मुंबई, मो .9594027995

## मनमोहक श्रावण

मनमोहक श्रावणाच्या, रिमझिम आल्या सरी...
चिंब -चिंब अंगण सारे, चिंब चिंब गं ओसरी...!!धृ!!
बहरली ही वनराई, लेवून हिरवा पाचू रंग...
किलबिल पाखरे ही, बागडती होऊन दंग...
पारिजातकाचा सडा,दरवळे माझ्या दारी...!!१!!
मनमोहक श्रावणाच्या...
बाई लाडाची गं लेक, आली -आली माहेराला...
झोका पंचमीचा तिचा, भिडे -भिडे आभाळाला...
हसु लेकीच्या गं ओठी, माय सुखावते उरी....!!२!!
मनमोहक श्रावणाच्या...
रक्षाबंधनाचा सण, भावा- बहीण भेटते...
आठवतां बालपणं, पाणी डोळ्यांत दाटते...
राहो असाच जिव्हाळा, हीच आस व्हावी पुरी...!!३!!
मनमोहक श्रावणाच्या... बैलपोळ्याच्या सणाची,
बळीराजाला ओढ न्यारी... जोडी मोत्या- पवळ्याची,
कितीं-कितीं शोभे भारीं... त्यांच्यामुळेच सुखाचा,
घास खातो शेतकरी....!!४!! मनमोहक श्रावणाच्या,
रिमझिम आल्या सरीं....
सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे,
परभणी .९८२३०६६६०६




# मोदींनी तत्काळ शिंदे, फडणवीस, पवारांचे राजीनामे घ्यावे

## हिंदवी जन क्रांती सेनेचे अध्यक्ष अजय पाटील साळुंके यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील लोणीखुर्द येथे हिंदवी जन क्रांती सेनेचे अध्यक्ष अजय पाटील साळुंके यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला होता. आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाच्या बापाच या शिंदे, फडणवीस, पवार, सरकारच करायच काय खाली मुंडक वर पाय या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

जालन्यात मराठा आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला आहे. मराठा आंदोलकांचं आरक्षणासाठी आंदोलन सुरु होतं. आंदोलकांनी जो मंडप उभारला होता त्यात पोलीस घुसले आणि पोलिसांनी लाठीचार्ज सुरु केला.

जालना जिल्ह्यातल्या अंतर्वली गावात ही घटना घडली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील या कार्यकर्त्याने काही सहकाऱ्यांसह उपोषण उपोषण आंदोलन सुरु होतं. मात्र मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांना उपोषण सोडण्याची विनंती करण्यात आली. मात्र त्यांनी उपोषण मागे घेतलं नाही. त्यानंतर आज पोलिसांनी लाठीचार्ज सुरु केला. लहान मुलं, महिला कुणालाही पाहिलं नाही. प्रचंड लाठीचार्ज केल्यानंतर आम्ही शांत का बसायचं असं मराठा आंदोलकांनी म्हटलं आहे. एवढंच नाही पोलिसांनी आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अजय पाटील साळुंके यांनी केला आहे. मराठा आरक्षणाबाबत सातत्याने भूमिका हिंदवी जन क्रांती सेनेचे अध्यक्ष अजय पाटील साळुके यांनी रस्ता रोको करून निषेध व्यक्त केला. हिंदवी जनक्रांती सेना संस्थापक अध्यक्ष अजय पाटील, प्रा. प्रशांत निकम, पंडीत साळुंके, संतोष गोरे, एन डी निकम,पमोद मगर, नितिन निकम, सरपंच राधाकृष्ण सोणवणे पोलीस पाटिल रावसाहेब सोमासे, आप्पासाहेब मगर, अर्जुन जाधव, कल्याण निकम, बाबासाहेब निकम, शंकर निकम, जनार्दन जाधव, सदाशिव मोईम, काकासाहेब सोनवणे, कल्याण नागे हिंदवी जनक्रांती सेना महिला आघाडी अर्चना अजय पाटील, वालहुबाई सुरासे, रेखा रविंद्र थोरात अल्का सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना अजय पाटील म्हणाले अंतरवाली सराटी या गावात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संविधानिक मार्गाने आंदोलनास बसलेल्या आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी घेराव घालत अमानुष लाठीचार्ज केला व शांततेच्या मार्गाने आपले हक्क मागण्यासाठी जमलेल्या मराठा समाज बांधवांस पांगवण्यासाठी गोळीबार केला. हे कृत्य अत्यंत निंदनीय असून कुणाच्या आदेशाने हे सर्व घडले याचा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ खुलासा द्यावा,अन्यथा तुम्हाला समाजाच्या रोषास सामोरे जावे लागेल नरेंद्र मोदी साहेब 2024 मध्ये जर तुम्हांला या महाराष्ट्रात जर फिरायचे आसेल तर शिंदे फडणवीस, पवार यांचे त्वरित राजीनामे घ्या अंन्यथा रस्त्यावर फिरुन देणार नाहि आसेल खुल आवाहन अजय पाटील साळुंके यांनी दिल. यावेळी प्रमोद मगर बोलतांना म्हणाले छत्रपतीचा वारसा असलेले मराठे अजून ही तलवार चालवायचे विसरलेले नाहि.मराठा समाज आरक्षण साठी अहिसेचा मार्ग निवडूण शांततेत अनंदोलन करताय यांचा अर्थ असा नाही की मराठा षंड झालाय. मराठा पेटाला तर सर्व उधवस्त करुनच थांबेल याची सरकारे नोंद घ्यावी. हिंदवी जनक्रांती सेना महिला आघाडी अर्चना पाटील, एन.डि. पाटील, प्रमोद मगर यांची भाषणे झाली शिऊर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सदिप पाटिल, जिलोकचंद पवार, विशाल पैठणकर, विजय गायकवाड यांनी बंदोबस्त देऊन दोन किलोमीटरपर्यंत लागलेल्या वाहणांच्या रागांची वाहतूक सुरळीत केली.



# पाल येथे गुटख्याच्या ५० गोण्या जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल गावात गुटखा विक्रेता चोरून अवैध गुटखा विक्री साठी शेतातील शेड मध्ये अनाधिकृत गुटखा साठवला असल्याची माहिती गुप्त बातमी दारामार्फत मिळाल्याने औरंगाबाद ग्रामिण स्थानिक गुन्हे शाखा पथकांनी छापा मारत पाल येथुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गोवा १००० गुटख्याचे ५० गोण्या एकुण ७ लाखा पेक्षा जास्त रुपयांचा गुटखा पकडून अरोपी विरुद्ध कार्यवाही केली .

दि. 31 ऑगस्ट रोजी सतिष वाघ, पोलीस निरीक्षक, स्था. गु.शा. औरंगाबाद ग्रामीण यांना त्यांचे गुप्तचातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पोलीस ठाणे फुलंब्री हद्दीतील पाल येथील एका व्यक्तीने त्याचे शेतामधील पत्र्याचे शेड मध्ये गोडावून तयार करून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा हा चोरटी विक्री करण्यासाठी साठवून ठेवला आहे. यावरुन पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सतिष वाघ, पो.नि. स्थागुशा यांनी स्थागुशाचे पथक तयार करून पाल शिवारातील शेत गट क्रमांक ६ मधील शेतातील पत्र्याचे शेड नजिक दबा धरून सापळा रचला. यावेळी पथकाने छापा मारला असता तेथे संतोष तेजराव जाधव हा मिळुन आला त्या शेडमध्ये गोणपाटमध्ये पॅकिंग केलेल्या गोण्या ठेवण्यात आलेल्या होत्या. या गोण्याबाबत त्यास विचारपुस करता तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देवु लागल्याने त्याचेवर अधिक संशय बळावल्याने त्यास विश्वासात घेवून अधिक विचारपुस करता त्यांने सांगितले कि या पांढ-या गोण्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गोवा १००० नावाचा गुटखा असुन या सर्व ५० गोण्यामध्ये गुटखा भरलेला आहे. यावरुन आरोपी नामे संतोष तेजराव जाधव वय ३७ वर्षे रा. पाल ता. फुलंब्री यांने बेकायदेशिर रित्या, चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गोवा १००० गुटख्याचे ५० गोण्या एकुण 7,32,000/- रुपयांचा साठवण करून त्यांचे कब्जयात बाळगतांना मिळुन आला. नमुद मुद्देमाल हा पंचासमक्ष जप्त करण्यांत आला असुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे फुलंब्री येथे भादंवी कलम ३२८,१८८,२७२,२७३ सह कलम ५९ अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास फुलंब्री पोलीस करित आहेत.

# राजूर बंद : मराठा समाजावरील हल्ल्याचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मागील चार दिवसांपासून मराठा आरक्षणसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन चालू होते. शासन आणि प्रशासन यांच्याशी आंदोलनकर्ते वेळोवेळी संवादही साधत होते, असे असताना काल दुपारच्या सुमारास अचानकपणे आंदोलनाच्या ठिकाणी बळाचा वापर करून आंदोलन चिरडण्याच्या उद्देशाने पोलिसांनी आंदोलकांवर अमानुषपणे लाठीचार्ज केल्याने त्यामध्ये अनेक महिला व पुरुष आंदोलक गंभीररीत्या जखमी झाले होते. घटनेच्या निषेधार्ह मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने जिल्ह्यात बंदची हाक देण्यात आली होती. त्याच्या निषेधार्थ राजूर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. या हाकेला उस्फुर्तपणे प्रतिसाद देत व्यापारी महासंघाचे पदाधिकारी, सकल मराठा समाजातील कार्यकर्ते सर्व घटकातील समाज बांधव, विविध राजकीय पक्षातील कार्यकर्ते यांनी आंदोलनात सहभाग घेऊन राजूर येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. सर्वप्रथम व्यापारी महासंघाचे पदाधिकारी व ग्रामस्थ छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय,एक मराठा लाख मराठा,जय जिजाऊ जय शिवराय अशा घोषणा दिल्या.नंतर पायी चालत जाऊन व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. यास व्यापाऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. मराठा समाज बांधवांच्या वतीने हसनाबद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांना निवेदन देण्यात आले.दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून आंतरवाली येथे घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध केला. यावेळी जगन्नाथ थोटे, विठ्ठलराव टेपले, सारंगधर बोडखे, रामेश्वर कळढवणे, सुखानंद पारवे, भगवान नागवे, रामचंद्र नागवे, भीमाशंकर दारूवाले, मुकेश अग्रवाल, भाऊसाहेब भुजंग, आप्पासाहेब पुंगळे, प्रा.बाळासाहेब बोराडे, रतन ठोंबरे, दत्ता पुंगळे, नामदेव पुंगळे, आकाश पुंगळे, विनोद पुंगळे, सचिन सावंत, लहू शेजुळ, सचिन पुंगळे, उमेश पुंगळे, प्रवीण गावंदे, दिलीप जैन, भगवानराव नागवे, रामेश्वर नागवे, राम पारवे, कैलास गबाळे, प्रभूराम पवार, प्रकाश पुंगळे, रामभाऊ कुमकर,संदीप भूमकर,सुदर्शन कव्हळे यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.




# विद्यार्थ्यांच्या रस्ता सुरक्षिततेसाठी मुख्याध्यापकांनी दिला उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले आहे, असे असलेतरी रस्त्यावर वाहने आणि अतिक्रमण झाल्याने अपघाताची दाट शक्यता आहे. पादचारी व शाळकरी मुले जीव मुठीत धरून ये-जा करीत आहेत. याबाबत संबंधितांना अनेक वेळा लेखी तक्रारी देवूनही तोडगा निघाला नाही. अखेर येथील शाहू विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी यावर त्वरित निर्णय घ्यावा अन्यथा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी ऊपोषण करण्याचा इशारा दिला आहे. संबंधित विभाग कोणती भूमिका घेतली याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. प्रारंभी शहरातील प्रमुख रस्ते अरुंद होते. कालांतराने बाजार पेठेत नागरीकाची गर्दी वाढली नव्हे तर याच रस्त्यावर रेल्वे गेट बंद झाले की वाहतुकीची समस्या निर्माण होत असे. विशेष म्हणजे शहरातील रस्ता हा दक्षिण भारताला जोडणारा असल्याने वाहनाची आवक वाढली. रस्त्याच्या लगत अतिक्रमण झाल्याने वाहतुकीची कोंडी झाली. सदरील रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग रस्ता म्हणून घोषित करण्यात आले.त्यानंतर ररस्ता रूंदीकरण, पुलाचे बांधकाम, सूशोभीकरण करण्यात आले. शहराबाहेरून बाह्यवळण रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. तरी शहरातील वाहतूक व्यवस्था सूधारली नाही. रस्त्यावर दूचाकी, फळविक्रेते, अवैध वाहतूक,अतिक्रमण झाल्याने पादचाऱ्यांना नाहक त्राससहन करावा लागतो आहे. शहरातील मूख्य चौकात नुतन शाळा आहे तर सुमारे पाचहजार विद्यार्थी संख्या असलेले शाहू विद्यालयातील विद्यार्थी याच मूख्य रस्त्याने येजा करतात. वाहतूकिची नेहमीच डोकेदुखी असल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन संबंधित विभागाला अनेक वेळा लेखी स्वरूपात तक्रारी दिल्या आहेत.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**1. वंध्यत्व आणि नपुंसकता :** पुरुषांमध्ये ज्या लैंगिक समस्या प्रामुख्याने आढळतात त्यामध्ये शीघ्रपतन, नपुंसकता, वंध्यत्व ही एक मोठी समस्या आहे. या समस्यांमागे आपल्याला अनेक कारणे आढळून येतात जसं की ताणतणाव, व्यसनं, अनियमित आहार, फास्ट फूड. शारीरिक संबंधानंतरही जेव्हा गर्भधारणा राहात नाही त्याला वंध्यत्व असं म्हटलं जातं. वंध्यत्व हे फक्त स्त्रियांमध्येच असते असे नाही तर ते पुरुषांना सुद्धा असते. पुरेशा प्रमाणात शुक्राणू तयार न होणे, त्यांचा आकार आणि वेग योग्य नसणे या कारणांमुळे पुरुषाला वंध्यत्व येते. नपुंसकतेबद्दल सांगायचं झालं तर समाधानकारक शरीरसंबंध प्रस्थापित करण्यासाठी पुरुषांच्या शिश्नामध्ये कठोरता न येणे किंवा वीर्यस्खलनापूर्वीच शिथिलता येणे म्हणजे नपुंसकता. नपुंसकता आणि वंध्यत्व या दोन भिन्न बाबी आहेत. नपुंसकतेची तीन महत्त्वाची कारणे सांगता येतात.

1. मानसिक (सायकोजेनिक) 2. रक्तवाहिन्यांचे आजार (व्हासक्युलोजेनिक)

3. मज्जासंस्थेचा आजार (न्यूरोजेनिक) वय वर्षे २० ते वर्षे ९० या काळात हा आजार कोणालाही आणि कधीही होऊ शकतो. नपुंसकतेवर इलाज निश्चितपणानं उपलब्ध आहेत. नियमित व्यायाम, व्यसनांपासून मुक्ती आणि तणावपूर्ण जीवनशैलीतून बाहेर पडणे. यामुळे नपुंसकता ५० टक्क्यांहून अधिक प्रमाणात बरी होईल आणि मग उरलेलं काम डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषध, गोळ्या, मलम यांचा वापर तसेच इंजेक्शन थेरपी, पेनाईल इम्प्लांट व स्टेम सेल सारख्या थेरपीने करता येईल. हे सर्व प्रकारचे उपचार आमच्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. सर्व प्रकारच्या गोळ्या, इंजेक्शन, मलम या सर्व गोष्टींचा वापर करूनही जर नपुंसकता दूर झाली नाही तर त्यावर पेनाईल इम्प्लाट नावाची उपचार पद्धती उपलब्ध आहे. पेनाईल इम्प्लांट हे सिलिकॉनचे असतात आणि शस्त्रक्रियेच्या माध्यमातून ते लिंगामध्ये बसवता येतात. अतिशय लाभदायक अशा पद्धतीची ही शस्त्रक्रिया असून या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला अगदी नैसर्गिक पद्धतीने संबंध ठेवता येतात. या शस्त्रक्रियेचा संवेदना, वीर्य यावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. वंध्यत्व आणि नपुंसकता या समस्यांमुळे अनेक संसार तुटतात, गोष्ट घटस्फोटापर्यंत पोहोचते. नाही नैराश्य येऊन रोज भांडणं, वाद, मारहाण अशा वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. या दोन्ही समस्यांवर ठोस आणि कायमस्वरूपी उपाय उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी योग्य डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार घेणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा मी असं पाहिलेलं आहे की या समस्या केवळ संकोचापोटी दाबल्या जातात. कोणत्या तरी भोंदू वैद्याकडून कसले तरी रानटी उपचार घेतले जातात आणि समस्या सुटण्याऐवजी ती जटिल होत जाते. माझ्या वाचकांना माझी नम्र विनंती आहे की अशा फसव्या जाहिराती, भोंदूबाबा यापासून सावध राहावे.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# कापूस, सोयाबीन करपण्याच्या मार्गावर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ऐन पावसाळ्यात १५ दिवसापासून पाऊस गायब झाल्याने चंद्रपूर शहरात उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. तापमानाने ३५ ते ४० अंशाचा पारा गाठला आहे. ऐन पावसाळ्यात नागरिकांना कुलर व वातानुकूलित यंत्रणेचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांना पावसाळा कि, उन्हाळा असा प्रश्न पडला आहे. पावसाअभावी कापूस, सोयाबीन, धानपिके करपण्याच्या मार्गावर आहे. सर्वाधिक तापमानाचे शहर म्हणून चंद्रपूरला ओळखले जाते. ऐन पावसाळ्यात जिल्ह्यात पावसाने दीर्घ काळ उघडीप दिल्याने चंद्रपूर शहरात चक्क उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. तापमान ३५ ते ४० डिग्रीच्या घरात गेले आहे. शहरातील तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. दिवसा कडक उन्ह व चिडचिडी गरमीने नागरिक हैराण झाले आहे. पावसाळा लागताच बंद करून ठेवलेले कुलर नव्याने लावावे लागत आहे.



# पोलिसांना राख्या बांधून भाजपा महिला मोर्चाने जोपासला बंधुत्वभाव

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका भाजपा महिला मोर्चा च्या वतीने फुलंब्री व वडोदबाजार पोलीस स्टेशनमधील पोलीस बांधवांना रक्षाबंधन निमित्त राख्या बांधून बंधुत्व भाव जोपासला आहे.

रक्षाबंधन सण हा बहीण भावाचे नाते जोपासणारा सण आहे. यातच समाजात विविध क्षेत्रात सेवा बजावणाऱ्या सर्वांना बंधुत्वाच्या नात्यात जोडण्यासाठी भाजपा महिला मोर्चाने पाऊल उचलले असून त्यानुषंगाने फुलंब्री व वडोदबाजार पोलीस स्टेशन मधील पोलीस बांधवांना महिला पदाधिकाऱ्यांच्या वतीने राख्या बांधून वतीने रक्षाबंधन साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्षा सौ. ऐश्वर्याताई अभिषेक पा. गाडेकर, ज्येष्ठ नेत्या मंगलाताई वाहेगावकर, छत्रपती संभाजीनगर ता. अध्यक्षा सरसाताई वाघ, ता. सोशल मीडिया प्रमुख सविताताई नवले, ता. उपाध्यक्षा जानकीताई काळे, ता. उपाध्यक्षा राणीताई सोनवणे आदी महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# ताडोबातील वाघ घेणार मोकळा श्वास; रानतळोधीचे पुनर्वसन अंतिम टप्प्यात

आधुनिक केसरी

संपूर्ण जगात पट्टेदार वाघांसाठी सुप्रसिद्ध असलेले ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प म्हणजे वन्यजिव व जंगल पर्यटकांची पहिली पसंती असलेला व्याघ्र प्रकल्प. दिवसेंदिवस वाढत चाललेली वाघांची संख्या आणि सहज दर्शन देणारा वाघोबा हे या प्रकल्पाचं मुख्य वैशिष्ट्य. अशा या व्याघ्र प्रकल्पातील वाघोबा आता मोकळा श्वास घेणार आहेत.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोअर भागातील शेवटचे गाव असलेले रानतळोधी या गावाचे पुनर्वसन आता अंतीम टप्प्यात आले असून रस्ते , नाल्या व विज या मुलभूत गरजांची पुर्णता झाली की आम्ही लवकरच आमच्या नविन घरात जाऊ असं येथिल गावकरी आता आनंदाने सांगतात. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात जामनी , पळसगाव, बोटेझरी, नवेगाव, कोळसा व रानतळोधी असे एकूण सहा गाव येतात. यातील पाच गावांचे पुनर्वसन आधिच झालेले असून आता रानतळोधी या गावाचेही पुनर्वसन करण्यासाठी वनविभागाकडून जिल्हा पुनर्वसन समिती व गाव पुनर्वसन समिती च्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. वरोरा चिमूर मार्गावरील सालोरी या गावाला लागूनचं 650 हेक्टर जागेवर रानतळोधी या गावाचे पुनर्वसनाचे काम आता अंतीम टप्प्यात आले आहे. ग्रामपंचायत, शाळा , प्राथमिक आरोग्य केंद्र , समाजभवन ही सर्व काम पुर्ण झाली असून नागरिकांच्या घरांचे बांधकामही आता पुर्णत्वाला आले आहेत. रस्ते व नाल्यांचे बांधकामही पावसाळा असल्याने पुर्ण करण्यात आले नाहीत तेही काम लवकरच पुर्ण होईल आणि सर्व गावकरी वरोरा चिमूर मुख्य मार्गालगत असलेल्या या गावात लवकरच आपल्या परिवारासह राहायला येतील असा आशावाद मुख्य वनसंरक्षक डॉक्टर जितेंद्र रामगावकर यांनी व्यक्त केला. केवळ 500 च्या जवळपास लोकसंख्या असलेल्या या गावात आजवर साधं एक प्राथमिक आरोग्य केंद्र ही नव्हते. औषधोपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात जायचे असल्यास 27 किलोमीटर दुर असलेले मुधोली किंवा 21 किलोमीटर दुर अंतरावर असलेले नवरगाव या ठिकाणी जावं लागायचं. आणि म्हणूनच म गावातील सुन किंवा मुलगी गरोदर असल्यास आम्ही दोन महिने आधीच बाहेरगावी कुठेतरी नातेवाईकांकडे नेऊन देतो अस गावकरी सांगतात. तेव्हा या गावाचं पुनर्वसन किती आवश्यक आहे हे लक्षात येतं. 100 % बीपीएल ( दारिद्र्य रेषेखालील ) असलेले हे गाव प्रचंड व्यसनाच्या आहारी गेले असुन जवळपास 95 % पुरुष मंडळी ही व्यसनांच्या आहारी गेलेली आहे तर जवळजवळ 98 % पुरुष हे खर्रा, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन करतात.

100 % अनुसूचित जमातीचं असलेल्या या गावात तरुणांची संख्या ( वयोगट १९ ते ३५ ) १५९ एवढी असुन यातील केवळ तीन विद्यार्थी हे पदवि चं शिक्षण घेत असून आजवर एकही मुलगा पदव्युत्तर शिक्षणापर्यंत पोहोचलेला नाही. कारण या गावात फक्त पहिली ते पाचवी पर्यंतच शाळा असून पुढील शिक्षणासाठी बोर्डा, पळसगाव, सरडपार, देलनवाडी अशा काही किलोमीटर अंतरावर असलेल्या आश्रमशाळेत जावं लागतं. त्यामुळेच शिक्षणाप्रती या गावात प्रचंड उदासीनता असुन शेती व्यतिरिक्त कोणताही व्यवसाय नसल्याने येथिल तरुणाई आजही शिक्षण व रोजगार तथा स्वयंरोजगाराच्या परिघाबाहेर आहेत. तर पुनर्वसन होत असलेलं सोलोरी हे गाव वरोरा चिमूर मुख्य मार्गालगत असल्याने अवघ्या चार किलोमीटर अंतरावर आनंदवन येथे शिक्षणाच्या अद्ययावत सोईंसह कृषी विद्यालय देखील असल्याने आता आमच्या मुलाबाळांना तरी आम्ही आता शाळा कॉलेज मधे पाठवू शकू अस आता गावकर्यांच मत होत चाललंय व ते पुनर्वसनासाठी आता आतूरतेने वाट पाहात असल्याचं गावकर्यांशी बोलतांना जाणवतं. रानतळोधी गावातील पुनर्वसनाचे लाभार्थी संख्या ही २११ एवढी असुन यातील विकल्प एक चे लाभार्थी ७९ तर विकल्प दोन चे लाभार्थी संख्या १३२ ईतकी आहे. यातील जवळपास २० कुटुंबियांनी नविन गावात आपला संसार थाटला असुन अनेकांनी येथे शेती करण्यास सुरुवात केली आहे. नविन गावात राहायला गेलेल्यांमधे ०६ कुटुंबियांनी विकल्प एक चा स्विकार केला असून विकल्प दोन चा स्वीकार करणाऱ्या कुटुंबियांची संख्या १४ एवढी आहे.

विकल्प एक मधे संपुर्ण पैसे देण्यात येतात तर विकल्प दोन मधे घर आणि शेतजमीन असा पर्याय उपलब्ध आहे. एकूणच गावकऱ्यांनी स्वेच्छेने आपआपल्या आवडीनुसार, सोईनुसार शासनाच्या पुनर्वसन प्रस्तावाचा आनंदाने स्विकार केला असून शासनातर्फेही स्वेच्छेने पुनर्वसनासाठी तयार असणाऱ्या गावकऱ्यांना सर्वोत्तम पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. शिवाय सर्व मुलभूत सोयीसुविधाही या नागरिकांना मिळतील असा प्रयत्न शासनाच्या पातळीवरूनही करण्यात येत आहे. यात गावकऱ्यांना काही अडचणी असल्यास त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा व मोकळ्या मनाने चर्चा करावी असं आवाहनही मुख्य वनसंरक्षक डॉक्टर जितेंद्र रामगावकर करतात. व लवकरच सर्व मुलभूत सोयी उपलब्ध होतील आणि गावकरी आनंदाने येथे येतील असा आशावाद ही ते व्यक्त करतात.

एकिकडे गावकऱ्यांच्या पुनर्वसनाची तयारी अंतिम टप्प्यात असली तरी तब्बल ६२५ किलोमीटर कोअर क्षेत्र व 1127 किलोमीटर बफर क्षेत्रात असे एकूण 1752 किलोमीटर एवढ्या अवाढव्य क्षेत्रात विस्तीर्ण पसरलेल्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या ही दिवसेंदिवस जोमाने वाढते आहे. त्यात म गाव जर राहिलं तर मानव वन्यजिव संघर्ष ही अटळच होत जातो . त्यामुळेच म आता शेवटचं गाव असलेल्या रानतळोधी चं ही पुनर्वसन होत असल्याने वाघांचं त्यांच्या हक्काच्या मालकीचं असलेलं क्षेत्र ही आता मोकळं होईल आणि येथील वाघोबाही आता मोकळा श्वास घेतील यात शंकाच नाही. मुख्य मार्गालगत शेतजमीनीसह होत असलेलं गावकर्यांच पुनर्वसन यामुळे तेही आनंदात आणि वाघोबाला संचार करायलाही मोकळा परिसर त्यामुळे वाघोबाही आनंदात आणि वन्यजिवांवर प्रेम करणारे वनविभागाचे कर्मचारी व वन्यप्रेमीही आनंदात अस आनंदीआनंदगडे अस एकूणच वातावरण दिसतंय.







शाम हेडाऊ, चंद्रपूर
मो. 9822469436





## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424




आधुनिक केसरी

**नारळी पोर्णिमा विशेष :**
नारळी पौर्णिमेला दरवर्षी पारंपारीक पद्धती प्रमाणे नारळी भात , खीर ,नारळाचे लाडू..वड्या , असे पदार्थ करतोच .यावर्षी जरा हटके नारळाची खास डिश बनवून भाऊराया ,कोळी बांधव यांच्यासह सर्वांनाच खुश करूया .चला तर मग ..

**साहित्य :** 5..6 ब्रेडचे स्लाईस , दीड वाटी खोवलेला नारळ , पाव वाटी खवा , पाउण वाटी गूळ किंवा साखर , 1 चमचा वेलची पूड , 1 चमचा चारोळी जिलेबीचा रंग , 1 चमचा साजूक तूप , ड्रायफ्रुट्सचे काप .

**कृती :** प्रथम नारळ व गूळ किंवा साखर वेळ असेल तर आधी अर्धातास मिक्स करून जाड बुडाच्या कढईत ठेवावे .म्हणजे गुळाला पाणी सुटून नारळात छान मुरते. चारोळी पाण्यात ,व केशर किंचित दुधात भिजायला ठेवावेत. आता गॅसवर छोटी कढई ठेवुन खवा छान परतुन घ्यावा. मग गॅसवर कढई ठेवून मध्यम आचेवर हे नारळ व गुळाचे मिश्रण शिजायला ठेवावे.मध्ये मध्ये बुडापासून सतत परतावे म्हणजे बुडाला लागणार नाही. सुरुवातीला गुळाचा पाक झाल्यामुळे पातळ होते, पण हळू हळू जसेजसे शिजेल तसे तसे आळून घट्टपणा येण्यास सुरुवात होईल. आता त्यात रंग घालून खवा घालावा. कडेने सुटून गोळा होत आला की त्यात वेलचीपूड,चारोळी ड्रायफ्रुट्स घालून थंड होऊ द्यावे. आता ब्रेडच्या कडा काढून मधल्या भागावर साजूक तूप लावून त्यावर मध्यभागी थंड झालेले नारळाचे सारण घालावे व त्याच्या बाजू एकमेकांवर गुंडालून त्याचा रोल बनवावा . आवश्यक असेल किंवा जास्तवेळ ठेवायचा असेल तर लवंगा किंवा टूथपिक्सने घट्ट बंद कराव्यात. वरून केशर काड्या, ड्रायफ्रुट्स चे काप यांनी सजवून छान डिशमध्ये सर्व्ह करावे.

**वैशिष्ट्य :** ही नाविन्यपूर्ण स्वीट डिश दिसायला रंगीत, आकर्षक तर आहेच पण चवीलाही अप्रतिम लागते. सजावटीसाठी वर्ख सुद्धा लावू शकतो.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळणार : डॉ. कुटे

आधुनिक केसरी न्यूज



**कासम सुरत्ने**
**संग्रामपूर :** २२ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीचे शेतकऱ्यांच्या खरडून गेलेल्या शेतीचे, खचलेल्या विहिरींचे, वाहून गेलेल्या साहित्यांचे व पिकांचे सविस्तर पंचनामे तहसील स्तरावरून पूर्ण करून घेतले असून त्याबाबत मंत्रालयामध्ये अपर मुख्य सचिव अनुपकुमार व मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिव सोनिया सेठी यांचे सोबत गेल्या तीन दिवसात पूर्ण पाठपुरावा करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी येत्या सात दिवसात त्याबाबतचा शासन निर्णय काढण्यासंदर्भात प्रयत्न केला असून, तसा शासन निर्णय सात दिवसात निश्चित काढण्याबाबत सचिवानी आश्वस्थ केले आहे, अशी माहिती आ. डॉ.संजय कुटे यांनी दिली.

शासन निर्णय निघाल्यानंतर त्या नुसार सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेसाठी प्रयत्नरत असणार आहे. तसेच जळगाव जामोद व नांदुरा तालुक्याच्या प्रस्तावातील त्रुटींचे निराकरण करून घेण्यास मान्यता मिळालेली असून त्यांच्या याद्या अपलोड करण्याचे काम सुरु असून त्यांना सुद्धा लवकरच मदत मिळणार आहे. येत्या १५ दिवसात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सोबत बैठक घेऊन शेतकऱ्यांना तत्काळ मदत मिळणेबाबत निर्णय घेण्यात येईल त्याबरोबरच दोन्ही तालुक्यातील नदी खोलीकरण, त्यावर आवश्यक संरक्षण भिंत याबाबतचा जलसंपदा विभागामार्फत आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून त्याबाबतही जलसंपदा मंत्री व विभाग यांचे समवेत बैठक घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

प्रचलित निकषांच्या बाहेर जाऊन शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. या माध्यमातून संग्रामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार आहेत. सततच्या पावसामुळे पात्र १२२३५ शेतकऱ्यांपैकी १०६६३ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये ७ कोटी ८३ लक्ष इतका निधी आतापर्यंत जमा करण्यात आला असून ११३७ शेतकऱ्यांचे ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) प्रलंबित होते त्यापैकी ५२५ शेतकर्यांनी ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) केल्याने येत्या ७ दिवसात त्यांच्या खात्यामध्ये २१ लक्ष रुपये इतका निधी जमा होणार आहे, उर्वरित शेतकऱ्यांनी तत्काळ ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) केल्यास त्यांच्या खात्यात सुद्धा लवकरच मदत जमा करण्यात येईल. ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) बाकी असलेल्या शेतकरी बांधवांनी महाईसेवा केंद्र मध्ये जाऊन तात्काळ ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) करून घेण्यासाठी प्रशासनाच्या मदतीने केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत मनुष्यबळ देऊन ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदरील रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात दोन दिवसांच्या आत जमा होईल.

यामध्ये ज्यांना शेतकऱ्यांना मदत करायची आहे त्यांनी सहभागी होऊन शेतकरी बांधवांचे प्रमाणिकरण करून घेण्यासाठी मदत करावी ही अपेक्षा आहे तसेच शेतकऱ्यांनी सुद्धा आधार लिंक असलेले खाते क्रमांक ई-प्रमाणीकरण (ई-केवायसी) करण्यासाठी द्यावा. त्याचबरोबर गेल्या वर्षीच्या पीकविम्याबाबत मंत्रालयामध्ये सातत्याने पाठपुरावा सुरु होता, परंतु प्रस्तावातील त्रूटीमुळे शेतकऱ्यांना मिळण्यास अडचण येत होती, काही शेतकऱ्यांनी त्रुटीची पूर्तता केल्याने त्यातील सुमारे ३ कोटी रुपये लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरवात होईल. केवायसी न केल्याने दुरुस्ती अभावी प्रलंबित असलेले पिकविम्याचे साडेचार कोटी येत्या १५ तारखेपर्यंत बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा होतील. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाबतीतील प्रलंबित पीकविमा, सततच्या अतिवृष्टीची मदत व दि.२२ जुलैच्या अतिवृष्टीची मदत हे सर्व संवेदनशील प्रश्न मार्गी लागल्याने समाधान वाटत आहे.

# मराठा समाजाच्या वतीने राज्य सरकार तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संविधानिक मार्गाने आंदोलनास बसलेल्या आंदोलन कर्त्यांना पोलिसांनी घेराव घालत अमानुष लाठीचार्ज, गोळीबार केला व शांततेच्या मार्गाने हक्क मागण्यासाठी जमलेल्या मराठा समाज बांधव पांगविण्यासाठी गोळीबार व लाठीचार्ज केला या निषेधार्थ आज सकल मराठा समाजाच्या वतीने माननीय तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले...!

हे कृत्य अत्यंत निंदनीय असून कुणाच्या आदेशावरून हे सर्व घडले याचा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांनी तात्काळ खुलासा द्यावा. अन्यथा तुम्हाला समाजाच्या रोषास सामोरे जावं लागेल. व गृहमंत्री ह्यांनी कोणतीही चौकशी न करता मराठा समाजाने आधी दगडफेक केली, म्हणून लाठीचार्ज करण्यात आला. असे वक्तव्य केले. या वक्तव्याने मराठा समाजाच्या भावना दुखावल्या त्यांचा सुद्धा निषेध करण्यात आला तसेच त्यांनीं तात्काळ मराठा समाजाची माफी मागावी व येत्या सोमवार पर्यन्त जर चौकशी करून दोषींवर कारवाई नाही केली तर आम्ही आमच्या स्टाईलने उत्तर देऊ.

मराठा समाजाला दिलेल्या या अमानुष वागुनुकिमुळे राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वार्थ राज्याचे गृहमंत्री व सरकार जबाबदार असेल....! तरी या घटनेचा सकल मराठा समाजाच्या वतीने जाहीर निषेध अशा मजकुराच निवेदन सादर करण्यात आले....! यावेळी सकल मराठा समाज जळगाव जामोद तालुका उपस्थित होता. सोबतच महाविकास आघाड़ी तथा वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने सुद्धा राज्य सरकारचा तसेच गृहमंत्री देवेंद्र फड़नवीस यांच्या वक्तव्याचा निषेध करुन जालना येथे झालेल्या घटनेची चौकशी करुन संबधीतांवर तात्काळ कार्रवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच उद्या दिनांक ३/९/२०२३ रोजी बुलढाणा जिल्हा तसेच जळगांव जामोद तालुक्यात रास्ता रोको आंदोलनाची हाक राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांनी महाविकास आघाडी व समविचारी पक्षाच्या वतीने दिली. यावेळी शिवसेना सहसंपर्क प्रमुख दत्ता पाटिल, शिवसेना तालुकाध्यक्ष गजानन वाघ, राष्ट्रिय कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष अविनाश उमरकर, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ, वंचितचे सुनिल बोदडे, भिमराव पाटिल, समाधान दामधर, एम.डी. साबिर, आसिफ़ ईकबाल, पराग अवचार, महादेव भालतडक, शुभम पाटिल, श्रीकृष्ण केदार, आशिष वायझोडे, ईरफान खान, प्रकाश भिसे, पवन वाघ, दादाराव धंदर, स्वप्निल आटोळे, वकील खान, सिध्दार्थ हेलोडे यांच्यासह शेकड़ो कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठा आरक्षण आंदोलकांवर लाठीहल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** अंतरवाली सराटी ( ता.अंबड) जालना येथे मराठा आरक्षण सह अन्य मागण्यासाठी सुरु असलेल्या अंदोलनाला शुक्रवारी दि.१ सायंकाळी हिंसक वळण लागुण आंदोलक व पोलिसांमध्ये धुमश्चक्री झाली यात दगडफेक व लाठीमार झाल्यांने याचे सर्वत्र तीव्र पडसाद उमटले. आंदोलकांना लाठीमार मारहाण झाल्याने खुलताबाद तालुक्यातील काटशेवरी फाट्यावर ही फुलंब्री -खुलताबाद मुख्य रस्त्यावर मराठ्यांकडून रस्ता रोको करण्यात आला तर फाट्यावर सर्व प्रतिष्ठान ( दुकाना) व्यवसाय व्यवहार बंद ठेवण्यात आले होते. तर रस्ता रोको करुन अनेक मान्यवरांचे भाषणं मार्गदर्शन झाले. विलास चव्हाण,अनिल श्रीखंडे, शंकर अधाने, माजी सभापती अधाने गणेश अधाने, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सदस्य, कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सोयगावात मराठा समाजाकडून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** सोयगाव जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर शुक्रवारी पोलिसांनी लाठीचार्ज करत गोळीबार केल्याची घटना घडली. या लाठीचार्जमध्ये महिलासह शेकडो आंदोलनकर्त गंभीर रित्या जखमी झाले.

या घटनेचे पडसाद राज्यभर उमटण्यास सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि.०२) सकल मराठा समाजाच्या वतीने सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात या घटनेच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येऊन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला होता.
राज्य सरकारच्या निषेधार्थ एक तास निषेध करण्यात आला. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज आणि गोळीबार कुणाच्या सांगण्यावरून केला यांच्या चौकशीसाठी विशेष उच्च समिती गठीत करुन या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्यावर कठोर कारवाईची अशी मागणी आंदोलनकर्तानी सोयगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या कडे केली. सरकारच्या विरोधातील घोषणाबाजी करून या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी रवी काळे, विजय काळे, विजय चौधरी, भैय्या जुनघरे, सुनील ठोमरे, बंडु कळवत्रे, मयुर मनगटे, अरुण काळे, दत्तु निकम, दत्तु सोणवणे, दिपक पाटील आदींसह सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांचेसह अजय कोळी राजू बर्डे रवींद्र तायडे आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता. यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवारी (दि.०५) सोयगाव तालुक्यात मराठा समाजाला आरक्षण मिळविण्यासाठी साखळी आंदोलन करण्यात येणार असल्याचे मराठा मोर्चा समन्वयक विजय काळे यांनी सांगितले त्यामुळे आता सोयगाव तालुकाही साखळी पद्धतीने जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावाच्या आंदोलनात सहभागी होणार आहे. यावेळी तालुक्यातील सर्वच गावात शांतता व परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी दिली आहे. तालुक्यातील सोयगाव आणि फर्दापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांना शांततेचे आवाहन सोयगावचे पोलीस निरीक्षक अनमोल केदार व फर्दापुरचे सहायक पोलिस निरीक्षक भरत मोरे यांनी केले आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शाळा, महाविद्यालय, कोचिंगमध्ये मूल्य शिक्षण रुजवा

## विद्यार्थ्यांना स्वप्नांच्या ओझ्याखाली दाबणे थांबणार का? आधुनिक केसरी जनचर्चेत मान्यवरांच्या प्रतिक्रिया



आधुनिक केसरी

**औरंगाबाद : कोट्यामध्ये (राजस्थान) मागील आठ महिन्यात 23 विद्यार्थांनी आणि मागील आठ वर्षांत 110 विद्यार्थ्यांनी परीक्षा आणि अभ्यासाचा ताण असह्य झाल्याने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. स्वप्नांच्या ओझ्याखाली दबून गेलेली ही "टयुशन फॅक्टरी " थांबायचे नाव घेत नाही. यामुळे शाळा,महाविद्यालय आणि कोचिंग क्लासेस यांच्यातील मूल्य शिक्षणाचे काय? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. म्हणूनच हे अस्वस्थ वर्तमान थांबणे येत्या काळाची गरज असल्याच्या प्रतिक्रिया आधुनिक केसरी जनचर्चेत विविध मान्यवरांनी दिल्या..**

आधुनिक केसरी जनचर्चा



### पालकांनी स्पर्धा आणि इर्षेसाठी विचित्र वागू नये...

कोवळ्या वयातील मुले, मुली पालकांच्या अपेक्षांच्या अतिरिक्त ओझ्यामुळे दबली जात आहेत हे अस्वस्थ करणारे आहे. हसण्या बागडण्याच्या खेळण्याच्या वयात त्यांच्यावर फार मोठ्या अपेक्षा थोपवल्या जात आहेत व त्यांची मने चुरगळली जात आहेत. सर्वांनीच डॉक्टर ,इंजिनियर होऊन खूप खोऱ्याने पैसा ओढावा असे काही शक्य नाही आणि तसे होतही नाही. वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रापेक्षा इतरही खूप क्षेत्रे महत्त्वाचे व उज्वल आहेत. पण मुलांपेक्षा पालकांच्या लक्षात ही बाब येणे अतिशय आवश्यक आहे. पालक हे स्पर्धा आणि इर्षा या दोषामुळे विचित्र वागत आहेत. हातातून वेळ गेल्यावर मग पुन्हा पश्चाताप करण्यात काही अर्थ नसतो. कोटा काय किंवा इतर कोणत्याही शहरांमध्ये, तसेच ग्रामीण भागात सुद्धा काही काही मुले आत्महत्या करत असलेली पहावयास मिळतात. हा शिक्षणाचा दोष एखाद्या संस्थेमुळे झालेल्या नसून पालकांच्या अतिरिक्त अपेक्षा मुळे झालेला आहे असे मला वाटते.

**– प्रा. डॉ. गोपाळ चौसाळकर, शिक्षणतज्ज्ञ अंबाजोगाई.**

### टयुशन फॅक्टरींचा वाढता प्रभाव विद्यार्थ्यांसाठी घातक...

टयुशन फॅक्टरींचा वाढता प्रभाव विद्यार्थ्यांच्या आयुष्यात घातक ठरतो आहे. स्पर्धेत उतरताना स्वतःची स्वप्नं, ईच्छा आकांक्षा सगळं बाजूला ठेवून यशाच्या मृगजळामागे विद्यार्थी आणि पालकदेखील धावताना दिसत आहेत. त्यांना हवं ते पुरवणारे क्लासेस मुल्य शिक्षणाच्या नुसत्या पोकळ बाता मारतात. शेवटी बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या हातात उरतो तो भला मोठा शून्य. त्यामुळे अशा कोचिंग क्लासेसच्या आहारी न जाता मुलांना ज्यात आवड आहे, त्यात करीअर करु द्यायला हवं. **–डॉ.ज्योती कदम साहित्यिक तथा शिक्षण समुपदेशक नांदेड.**

### सन्मानजनक जीवन जगण्याची स्थिती निर्माण करा...

ज्ञान मिळवण्यासाठी किंवा व्यक्तिमत्व घडवण्यासाठी शिक्षण घेतलं जात नाही. पुस्तकी ज्ञान मिळवलं की सातव्या वेतन आयोगाचे लाभार्थी होता येते आणि केवळ तेवढ्यासाठी शिक्षण घेणे असा विचार रुजल्याने पुस्तकी ज्ञानाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच सर्वोत्तम गुण मिळवणे हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे एकमेव उद्दिष्ट झाले आहे. कमी गुण मिळाल्यास आपण स्पर्धेबाहेर फेकले जाऊ आणि आपले आयुष्य उध्वस्त होईल अशी जर विद्यार्थ्यांना भीती वाटत असेल तर ती अनाठाई नाही. पुस्तकी ज्ञानापेक्षा अंगभूत कौशल्याला महत्त्व प्राप्त होत नाही किंवा कमी मार्क्स मिळवले तरी सन्मानजनक जीवन जगता येऊ शकते अशी जोपर्यंत स्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत यातून सुटका नाही. **– गंगाधर मुटे, शेतकरी चळवळ नेते, छोटी आर्वी, जि. वर्धा**

### मानवी मूल्याची जोपासना करणे गरजेचे...

अतिशय हुशार असलेले विद्यार्थी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल का उचलतात ? याचा पालकांनी व समाजाने विचार करणे गरजेचे आहे. समाजात जेव्हा विशिष्ट शिक्षणाला उच्च दर्जाचे समजले जाते तेव्हा त्याचा चांगला व वाईट परिणाम शिक्षण क्षेत्रात उतरतो. मग शिक्षणाचा बाजार सुरू होतो. त्या बाजारात स्पर्धा सुरू होते. त्या स्पर्धेत प्रत्येक पालक आपल्या पाल्यांना उतरवितो व जिंकण्याचे स्वप्न पाहतो. त्यासाठी पालक लाखो रुपये खर्च करतो. त्याचा परिणाम पाल्याच्या मानसिकेतेवर होतो. त्या जीवघेणे स्पर्धेत यशस्वी झालो नाही तर समाज आपणाला काय म्हणेल? ह्या विचारात नकारात्मक विचारसरणी तयार होते व त्यातूनच अशा आत्महत्या सारख्या घटना घडतात .त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्याचे बीजारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे . बालकांमध्ये मूल्य नाही रुजवली तर भविष्यात अनेक गंभीर परिणाम होऊ शकतात. मूल्यशिक्षणला जास्त महत्व दिले गेले पाहिजे. मूल्य शिक्षणाद्वारे सक्षम समाज निर्माण होतो. त्यातच व्यक्तीचे हित दडलेले असते. आजच्या शिक्षण पद्धतीत मूल्य शिक्षणाचा अभाव हा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मूल्यशिक्षण हे घरातून , समाजातून व शाळेतून पाल्यांना मिळत असते पण त्याचा अभाव सर्वत्र दिसून येतो. मूल्यशिक्षण हे विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकसित करण्याचा प्रयत्न करते विद्यार्थ्यांच्या भावनिक ,सामाजिक ,नैतिक आणि अध्यात्मिक विकासास आकार देते. शिक्षणाचा मूलभूत उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास विकास आहे. बंधुत्व, मैत्री सहानुभूती ,प्रेम ,मोकळेपणा ऐकणे ,स्वीकृती ,मान्यता ,प्रशंसा, प्रामाणिकपणा निष्पक्षपणा , निष्ठा, एकता, सभ्यता, आचार विचार ही सामान्य मानवी मूल्य आहेत. ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे गरजेचे आहे. पण सध्याच्या शिक्षण प्रणालीत याकडे पालक, विद्यार्थी व शिक्षक दुर्लक्ष करताना दिसत आहे, त्यातूनच विद्यार्थ्यांच्या अंगी नकारात्मक विचार येतात .पालक समाज व शैक्षणिक क्षेत्रातील काही त्रुटी याला कारणीभूत आहेत विद्यार्थ्यावर कुटुंब व समाजाचे प्रचंड दडपण असते. त्यामुळे मुलाची आतल्या आत घुसमट चालू असते. सतत दडपण व तणावाखाली अभ्यास करत असतात. त्यासाठी विद्यार्थ्यांबरोबर मन मोकळे बोलणे व मानवी मूल्य शिक्षण रुजवणे गरजेचे आहे.

**– अनुराधा प्रमोद कुलकर्णी, सहशिक्षिका, वाडा, जि. पालघर**

**विद्यार्थ्यांच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा विचार व्हावा :** आजचे बहुतांश पालक आपल्या पाल्यांच्या कलागुणांचा, प्रज्ञा आणि प्रतिभेचा विचार न करता पालकच मोठी स्वप्न पहात आपल्या पाल्यांना महागड्या महाविद्यालयात आणि शिकवणीसाठी अत्यंत वेगाने धावत आहेत. याचे दुष्परिणाम मात्र आजच्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर होताना दिसतात. भरमसाठ शिकवणीच्या वर्गात मूल्यांची पार घसरण होत चालली असून शिकवणी घेणाऱ्या शिक्षकांनाही मूल्यशिक्षण द्यायला फारसा वेळ मिळत नाही.त्याचे कारण वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणाचा अभ्यासक्रमाच इतका मोठा असून त्यातून मूल्य शिक्षणाची पेरणी करण्यासाठीचा वेळ त्यांच्याकडे क्वचितच मिळत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा विचार करूनच पालकांनी व्यवसायाभिमुख क्षेत्र निवडावे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर ताण पडणार नाही. आणि पुढचे प्रसंग टळतील. **– शिवा कांबळे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक, नांदेड.**

# वन नेशन, वन इलेक्शन, ये तो है मोदी मिशन



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**लोकशाहीप्रधान असलेल्या आपल्या देशात निवडणुक प्रक्रिया सर्व स्तरावर एकच असावी अशा प्रकारचा अचानक निघालेला सुर नविन वाटत असला तरी वन नेशन, वन इलेक्शन ये तो है मोदी मिशन देशाच्या सर्वांग प्रगतीसाठी अत्यंत महत्वाचा ठरणार. केंद्र सरकारने प्रक्रियाचा अभ्यास करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असुन पुढच्या महिन्यात पाच दिवसाचे विशेष अधिवेशन देखील बोलावण्यात आले. लोकसभा, राज्यसभेत सर्वानुमते ठराव पास होईल. यासाठी राज्याची लागणारी सहमती मिळुन घेण्यात केंद्र सरकार मागे पडणार नाही.**

370 कलम, प्रभु रामचंद्र मंदिर बांधकाम यासारखे ऐतिहासिक प्रकरणे निकाली काढल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात एकाच वेळी सर्व निवडणुका घेण्याची सुरू केलेली प्रक्रिया ज्याचे स्वागत समाजातल्या विशेषतः युवा पिढीत आणि सुशिक्षित वर्गासह शेतकरी,कष्टकरी, गोरगरीब जनतेमधुनसुद्धा होवु लागलं. कदाचित 2024 च्या पुर्व संध्येला हा निर्णय झाला तर मग राज्यात विधानसभा देखील लोकसभेच्या सोबत झाल्या तर आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. कोणत्या वेळी काय निर्णय घेतील ?हे पंतप्रधान नरेंद्र मोदीचं गुप्तगु न कळे कुणा ? देशाच्या हितासाठी जे काही करायला हवं त्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकत मोदीजींचं गतिमान सरकार वेगवेगळ्या ऐतिहासिक निर्णयाला मागे कधीच राहिले नाही. भाजप परिवाराचा वर्षानुवर्षे असलेला अजिंडा आणि निवडणुकीतले दिलेले आश्वासन पुर्णत्वाकडे नेताना ज्या पंतप्रधानांनी काश्मिरमध्ये लावलेले 370 कलम सुधारणा करून दाखवले. वास्तविक पहाता स्वातंत्र्यानंतर नेहरू नितीने केवळ मतांसाठी लांगुनचालन म्हणुन 370 कलम काश्मिरमध्ये लागु केले. याला तत्कालीन काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जनसंघाचे संस्थापक डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांच्यासह अनेकांचा विरोध होता. भाजपाने या प्रश्नावर कितीतरी वर्षे संघर्ष केला. जहाँ हुए बलिदान मुखर्जी, वह काश्मिर हमारा है हा राष्ट्रवादाचा नारा ज्याची गुंज परिवाराच्या घराघरात आजही ऐकु येते. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी तर कायदा हातात घेत दिल्ली ते काश्मिर प्रवास केला. अर्थात तिथे जावुन झालेला मृत्यू देशासाठी बलिदानच होता. कधी कधी काँग्रेसवाले जेव्हा म्हणतात की, देश उभारणीत भाजपवाल्याचा संबंध नाही त्यावेळी डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनपाठाच्या पुस्तकाचे वाचन खऱ्या अर्थाने काँग्रेसवाल्यांनी करायला हवे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाची पद्धत आणि देश चालवण्यामागची दुरदृष्टी पाहिल्यानंतर हे नेतृत्व अचाट शक्ती आणि ईश्वरी अंश असल्यासारखंच वाटतं. ज्यांनी शत्रुला सर्जिकल स्ट्राईक सारखे हल्ले करून नामोहरम करून टाकलं. भारत मातेच्या अस्मितेचा असलेला प्रभु रामचंद्र मंदिर बांधकामाचा प्रश्न ज्याचा संघर्ष चारशे वर्षापेक्षा अधिक चालु होता. तो सोडवला. केवळ मार्गी लावला असं नव्हे तर आयोध्येत भव्यदिव्य राममंदिर उभारणी ज्याचे लोकार्पण देखील लवकरच झाल्याशिवाय रहाणार नाही. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी क्रांतीकारक निर्णय घेतले. वंचित, उपेक्षित, दिव्यांग, महिला वर्ग एवढेच नव्हे तर देशाच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक शस्त्र सामुग्रीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करत बलवान भारत जगासमोर ताकद निर्माण केली. येथे पाहिजे जातीचे, येरा गबाळ्याचे काम नोहे. ज्या भारताकडे जगाच्या पाठीवर असलेले देश हिनवादाने पहायचे तो भारत आज मोदीजींच्या नेतृत्वाखाली जगाच्या पाठीवर डंका वाजवु लागला. अमेरिका, जर्मन, फ्रान्स, रशिया, जपान किंवा इतर देशात भारतीय पंतप्रधानाच्या मिरवणुका कधी निघाल्या नाहीत. सर्व शक्तीशाली म्हणुन अमेरिकेकडे पहातो. त्याच देशात पंतप्रधान मोदीजी यांचा होत असलेला गवगवा भारतीय नागरिकांची कॉलर टाईट करणाराच म्हणावा लागेल. नऊ वर्षाच्या काळात देशाचा कारभार करताना घेतलेले जनहिताचे निर्णय सबका साथ, सबका विकास या त्यांच्या भुमिकेवर देशवासियांचा इतिहास बसलेला असुन त्यामुळेच घर घर मोदी, हर हर मोदी हा नारा पुढे येतो. विरोधकांनी कितीही अकांडतांडव करून हॉटेलमध्ये हयात घालवली तरी 2024ला मोदी रथाला कुणी रोखु शकत नाही. त्यांचे एक एक निर्णय देशातील लोकांना पटणारे असतात. जे लोकांना पाहिजे तेच मोदीजी देवुन जातात. म्हणुन त्यांच्यावर 138 कोटी लोकांचा विश्वास बसला. वन नेशन, वन इलेक्शन अर्थात एक देश, एक निवडणुक ही बातमी काल अचानक पुढे आली. एव्हाना केंद्र सरकारने या निर्णयासाठी समिती गठीत केली. माजी राष्ट्रपती कोविंद यांना अध्यक्ष पद दिलं. सप्टेंबर महिन्यात पाच दिवसाचं विशेष अधिवेशन बोलावलं. राज्याचे मतं मागवण्याची प्रक्रिया सुरू झाली. याचाच अर्थ खरा काढायचा झाला तर 100 टक्के 2024 लोकसभा निवडणुक वन नेशन, वन इलेक्शन प्रयोगानुसारच होईल यात तिळमात्र शंका नाही. खरं तर हा निर्णय ऐतिहासिक आणि देशहिताचा आहे. विरोधक कदाचित राजकारणाचा भाग म्हणून विरोध करण्यासाठी पुढे येतील. पण अशा विरोधकांना मोदीजी कधीच जुमानत नाहीत. कारण लोकांना जे हवं ते करून दाखवतात. तुम्ही बघा, पाच वर्षात वेगवेगळ्या निवडणुका अगदी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर पालिका, महा नगरपालिका, विधानसभा आणि मग लोकसभा यावर राज्या राज्याचा होणारा स्वतंत्र खर्च शिवाय सतत येणारी आचारसंहिता ज्यामुळे सत्ताधाऱ्यांना विकासकामाला खिळ बसतो. केंद्र सरकारच्या निती आयोग असो किंवा विधी आयोग यांनी देखील सकारात्मक दुजोरा देताना केवळ निवडणुकावर होणारा पैशाचा चुराडा खऱ्या अर्थाने वायफळ असुन एक देश, एक निवडणुक देश प्रगतीच्या मार्गाला घेवुन जाण्यासाठी फायद्याचे ठरेल. सततच्या निवडणुकामुळे शासकिय कर्मचाऱ्यांनी देखील वैतागुन जातात. सारासार विचार आणि देशहित लक्षात घेता हा ऐतिहासिक निर्णय खऱ्या अर्थाने केंद्र सरकारने घ्यायलाच हवा अशा प्रकारची मागणी 80 टक्यापेक्षा जास्त लोकांची आहे.वर्तमान राजकिय व्यवस्थेत व्यक्तिनिष्ठ राजकारणाला आलेलं महत्व पैशाच्या जीवावर राजकारण आणि निवडणुका त्याही पुन्हा पुन्हा ही सारी वैतागवाडी थांबवायची असेल तर हा निर्णय अत्यंत महत्वाचा असल्याची प्रतिक्रिया समाजातील सुशिक्षित आणि युवकांच्या मधुन मोठ्या प्रमाणावर येते. वेगवेगळे नैसर्गिक संकटे त्यावर निवडणुक प्रक्रियेचा खर्च वाचला तर आपत्तीसारख्या संकटात कामाला येवु शकतो. अर्थात अधिवेशन होईल, विरोधक याचा बाऊ देखील करतील. पण मोदी मिशन पिछे कभी हाटता नही, जिसका नाम नरेंद्र मोदी. देशातील बहुसंख्य राज्यात भाजपाचे सरकारे आहेत. तेलंगणा असेल किंवा अन्य राज्यात देखील चांगल्या निर्णयात ते राज्य केंद्र सरकारच्या सोबत नेहमीच राहिलेले दिसतात. त्यामुळे अपवाद बिहार, राजस्थान, कदाचित यांचा विरोध काँग्रेसच्या रेट्यामुळे होवु शकेल पण विरोधकाला न जुमानता पुढे चालत रहाणं आणि निर्णय घेणं हे मोदीजींनी करून दाखवलेलं आहे. त्यामुळेच वन नेशन, वन इलेक्शन हा निर्णय खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही सदृढ करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो हे मात्र नक्की.त्याहुन अधिक सांगायचं झालं तर 2024 लोकसभा निवडणुकीत हीच प्रक्रिया पुढे आल्याशिवाय रहाणार नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे.या निर्णयाचं महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी जोरदार स्वागत केलं असुन हा निर्णय घ्यायलाच हवा असं मत बोलुन दाखवलं.एकीकडे मुंबईच्या हॉटेल हयातमध्ये इंडियाची बैठक सुरू असताना केवळ खुर्ची मिळाली नाही म्हणून ममता दिदी संतापल्या आणि बैठक सोडून निघाल्या. इंडियाला लोगो देखील सादर करता आला नाही. अंतर्गत वादामुळे संयोजक पद राहिलं. त्याच दरम्यान वन नेशन, वन इलेक्शनची आलेली बातमी विरोधी पक्षाच्या बैठकीपेक्षा महत्वाची आणि चर्चेची ठरली हे मात्र नक्की.

# मराठा आंदोलन पेटले; जालना जिल्ह्यात कडकडीत बंद

## भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध : अनेक ठिकाणी जाळपोळीच्या घटना

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**जालना :** अंतरवाली सराटी येथील मराठा समाजातील आंदोलकांवर झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात कडकडीत बंद ठेवण्यात आला. सकाळपासूनच मराठा समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. पोलीस प्रशासन आणि सरकार यांच्याविरोधात त्यांच्या मनात रोष दिसत होता. या आंदोलनादरम्यान अनेक ठिकाणी जाळपोळीच्या घटना घडल्याचे वृत्त हाती आले आहे.त्यामुळे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून मराठा आंदोलन पेटल्याचे चित्र दिसून आले. पोलिसांनी केलेल्या लाठीमार आणि गोळीबारच्या निषेधार्थ आता सकल मराठा समाज रस्त्यावर उतरला आहे. या भ्याड हल्ल्याचा सर्व स्तरातून निषेध होत असून जालना जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आल्याचे चित्र दिसून आले. जालना जिल्ह्यातील व अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागील चार दिवसापासून अमर उपोषण सुरू होते.मात्र काल दुपारी आंदोलनादरम्यान पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज केला. त्यामध्ये मराठा समाजातील अनेक तरुण व महिला गंभीर जखमी झाल्या होत्या.पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला. या हल्ल्याच्या निषेधार्थ  सकल मराठा समाजाच्या वतीने जालना जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते.जालना शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. मुख्य रस्त्यावर शुकशुकाट होता. अंबड चौफुली येथील अशोका धाब्यासमोर आंदोलकांनी ट्रक जाळण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे मंठा चौफुली येथे भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करण्यात आला. जाफराबाद तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर घोषणाबाजी व टायर टायर जाळून लाठी हल्ल्याचा निषेध केला. बदनापूर येथील महामार्गावर आंदोलकांनी रस्तारोको करून निषेध नोंदवला. परतूर आणि मंठा तालुक्यातही मोठ्या प्रमाणात आंदोलक रस्त्यावर उतरले होते. अंबड, घनसावंगीमध्ये आंदोलक रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले. भोकरदन तालुक्यातही ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले.  छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. राजूर येथे व्यापारी महासंघ व सकल मराठा समाजाच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला. आंदोलनादरम्यान अनेक ठिकाणी टायर व वाहने जाळण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले. लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन चालू असताना पोलिसांनी लाठीमार का केला, असा प्रश्न मराठा समाजाच्या वतीने विचारला जात आहे. मराठा समाज गुन्हेगार किंवा दहशतवादी नाही. लाखोंच्या संख्येने शांततेच्या मार्गाने मराठा क्रांती मोर्चे काढले परंतु कुठेही गालबोट लागले नाही. असे असताना देखील पोलिसांनी आमच्यावर गोळ्या का झाडल्या याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे समाजाच्या भावना दुखावल्या असून त्याविरुद्ध मराठा समाज रस्त्यावर उतरला आहे. दरम्यान जिल्ह्यातील आंदोलकांवर पोलीस लक्ष देऊन होते. जिल्हात सर्वत्र पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला होता.

**विविध नेत्यांनी दिली आंदोलनस्थळी भेट, ग्रामस्थांचे केले सांत्वन :** मराठा समाजातील आंदोलकावर लाठीचार्ज केल्यानंतर या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले . जालन्यातील अंतरवाली सराटी येथे विविध नेत्यांनी भेटी देऊन ग्रामस्थांचे सांत्वन केले . आंदोलकांशी चर्चा केली . यामध्ये छत्रपती संभाजीराजे भोसले, छत्रपती उदयनराजे भोसले, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, आ .रोहित पवार, आ .संदीप क्षीरसागर जयंत पाटीलयांसह अनेक नेत्यांनी भेटी दिल्या . छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले की लाठीहल्ला करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून जखमी झालेल्या कार्यकर्त्यांच्या उपचारांचा खर्च शासनाने करावा , अशी मागणी खासदार उदयनराजे भोसले यांनी केली .



# सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची मदत अडकली केवायसीच्या फेऱ्यात

## वर्ष झाले तरी शेतकऱ्यांना मदत मिळेना बळीराजा झाला हैराण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना बरेच शेतकरी वंचित आहेत गेल्या वर्षी सततच्या पावसाने तालुक्यातील खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने पंचनामे करुण मदत जाहीर केली. मात्र याला आता वर्ष होत आले तरी अद्याप शेतकऱ्यांना ही मदत मिळालेली नाही. याद्या ऑनलाईनचे काम जवळपास पूर्ण झालेले असून केवायसीचा आट घातल्याने शेतकरी सेतु सुविधा केंद्रांवर चकरा मारत आहे. यात अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याने सततची मदत केवायसीच्या फेयात अडकल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात तालुक्यात परतीच्या पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. यात डाभा मोलखेडा घाणेगांव तांडा पिंपळवाडी जामठी रवळा जवळा नांदा तांडा टिटवी -पळसखेडा व सावळदबारा, सोयगाव या मंडळातील ४१ हजार हेक्टरवरील मंडळात अतिवृष्टी झाल्याने ३० हजार हेक्टर पिकांचे नुकसान झाले होते. शासनाने हेक्टरवरील पिके बाधित झाली होती. पंचनामे करुण मदतही जाहीर केली तर सततच्या पावसामुळे यात पहिल्या टप्पात दोन महिन्यांपूर्वी अतिवृष्टीची मदत देण्यात आली.तर काही तांत्रिक अडचणी, केवायसीच्या घाटामुळे बरेच शेतकरी अद्यापही वंचित आहे. सततच्या मदतीच्या याद्याचे ऑनलाईन करुण महिना झाला. तरी केवायसीचा नंबरच अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही. तर केवायसी करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. सततच्या मदतीचे शेतकऱ्यांना मिळणार आहे. तालुक्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असून शेतकरी हवालदिल झालेला आहे. रिमझिम पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. त्यात अद्याप दमदार पाऊस झालेला नसल्याने नदी नाले, धरणे कोरडी पडली असून पाण्याच्या तसेच चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. पावसआभावि उभी पिके वाळत आहे. अशा अडचणीत सततच्या मदतीचे चार पैसे हातात आले तर शेतकऱ्यांना काही अंशी दिलासा मिळेल.

**मदत थेट खात्यावर :** सततच्या मदतीच्या याद्या ऑनलाईनचे काम पूर्ण झालेले आहे . शेतकऱ्यांनी तातडीने केवायसी करुण घ्यावी . केवायसीनंतर मदत थेट खात्यावर जमा केली जात आहे . ज्या जमिनीचे समाईक क्षेत्र आहे . अशा शेतकऱ्यांनी बाँडवर शपथपत्र करुण द्यावे . त्यातील एका शेतकऱ्याच्या खात्यावर ही मदत जमा होईल . कुणीही वंचित राहणार नाही, याची आम्ही दक्षता घेत आहोत असे सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी सांगितले .



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर